# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १४/०८/२०१९ (दि. ९/०८/२०१९ रोजीची तहकुब सभा)**

मा. महासभा शुक्रवार दि. ०९/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ३३ ते ५३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दिनांक १४/०८/२०१९ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महापालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | व्यास रवि वासुदेव | सभापती, स्थायी समिती |
| ४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ५) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ७) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ८) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ९) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १३) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १४) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १५) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १७) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २७) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २८) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २९) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३०) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३१) | परदेशी गिता हरीश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३३) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३४) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३८) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३९) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४०) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४१) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४२) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४३) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४४) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४५) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४६) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४७) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५०) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५१) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५२) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५३) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५४) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५७) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५८) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५९) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६१) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६२) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६३) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६४) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६५) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६८) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६९) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७०) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७१) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७२) | भावसार वंदना संजय | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| **७३)** | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| **७४)** | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| **७५)** | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| **७६)** | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| **७७)** | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| **७८)** | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| **७९)** | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| **८०)** | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **८१)** | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| **८२)** | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| **८३)** | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| **८४)** | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| **८५)** | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| **२)** | **पाटील प्रविण मोरेश्वर** | **विरोधी पक्षनेता** |
| **३)** | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| **४)** | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| **५)** | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| **६)** | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| **७)** | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| **८)** | **पारधी सुजाता यशवंत** | **सदस्या** |
| **९)** | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| **१०)** | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |

**रजेचा अर्ज - निरंक**

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०९/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करीत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्या अगोदर मी मा. आयुक्तांना एक पत्र दिले आहे. आयुक्त महोदय कॉंग्रेसचे शिष्ट मंडळ भेटून एक पत्र दिलेले आहे. त्या पत्राचा मजकूर आजची परिस्थिती जी आहे ती आहे. सांगली, कोल्हापूर, सातारा, कोकण ह्या परिसरामध्ये झालेली अतिवृष्टी त्याच्यामुळे लोकांचे झालेले नुकसान खरी परिस्थिती तर अशी आहे की कोल्हापूर सांगलीची परिस्थिती झालेलीच आहे. अजून तिथले पाणी ओसरले नाही. ओसरल्यानंतर काय चित्र डोळ्यांच्या समोर येणार आहे ते भयंकर आणि भयानक असणार आहे. कितीतरी लोक अजून सावरत नाही. ते कदाचित जलसमाधी घेतली असावी. साहेब तुम्ही त्या परिसरातले आहेत तुम्हाला परिस्थिती माहित आहे. अशा परिस्थितीमध्ये दिलेला विरोध स्पष्ट होता. वर्षा मॅरेथॉन रद्द करण्यात यावी. ती रद्द करुन तो निधी जो आपण वापरणार २५ लाख निधी तरतुदीप्रमाणे महापालिकेकडे उपलब्ध आहे. ती कोल्हापूर, सांगली पूरग्रस्तांना पालिकेने पाठवावी. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आमचा स्पष्ट निर्णय आहे. कॉंग्रेस पक्षाचे जितके प्रतिनिधी इथे उपस्थित आहेत. त्यांचे प्रत्येकांचे एक महिन्याचे मानधन पुरग्रस्तांना पाठवण्यासाठी तुम्ही नियोजन करावे. आमची महापौरांना स्पष्ट मांग आहे ह्या परिस्थितीमुळे वर्षा मॅरेथॉन रद्द करावी रद्द करुन हा निधी महापौर मॅडम तुम्ही

मोठेपणा दाखवा कारण वर्षा मॅरेथॉन महापौर मॅरेथॉन हे चित्र उभे करण्यात आले आहे ते चित्र तुम्ही तो निर्णय घेतला पाहिजे. परिस्थिती समोर असताना आपल्याला करमणूकीचे विषय क्रिडा असला तरी तो करमणूकच आहे असे विषय करणे योग्य नाही. आज आपल्या देशासमोर एवढा प्रसंग उभा राहीला असताना आपण अशाप्रकारे पैशाची विल्हेवाट लावणे नासधूस करणे योग्य नाही. त्याच्याऐवजी तो निधी पूरग्रस्तांना पाठवा ती एक मदत होईल. पालिकेचे नाव होईल. तुमचे नाव होईल. पूर्ण महाराष्ट्रामध्ये नाव होईल. माझी आपणांस विनंती आहे आपण ह्याच्यावर विचार करावा आणि काय ते सभागृहाला सांगावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त महोदय मी दि. ०९/०८/२०१९ रोजी पूरग्रस्तासंबंधी दोन पानाचे एक लेटर दिले आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली पश्चिम महाराष्ट्रात जी अवकळा उपस्थित झालेली आहे त्याबद्दल दोन पानाचे निवेदन मी आयुक्त साहेबांना दिलेले आहे. मी त्यामध्ये मॅरेथॉनचा उल्लेख केलेला नाही. परंतु ही जी मिरा भाईंदर महानगरपालिका आहे ह्या महापालिकेने प्रत्येक वेळेस महाराष्ट्रात जिकडे दुष्काळ आला इतर महापालिकेमध्ये जेव्हा दुष्काळ आला तेव्हा ह्या महापालिकेनी भरघोस मदत केली आहे. माझी आपणाला विनंती आहे मी त्या विभागातला एक सदस्य आहे. मी कराडचा आहे. कराड, कोयना, कृष्णा नदीचा संगम कराडला होतो. कराडमध्ये २० फुट पाणी शिरले. त्या कराडचा खालचा भाग आहे. सांगली, कोल्हापूर खालच्या साईटला गेल्यावर वारणा नदी मिळते. कोल्हापूरला पंचगंगा जुळते ह्या २-३ जिल्ह्यामध्ये भयाण अवस्था आहे. ते आपण तोंडाने सांगणे उचित ठरणार नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने किती तरी मदत केली तरी भरपाई पूर्ण होणार नाही अशी अवकळा आहे. मा. महापौर, मा. आयुक्त आणि सर्व सन्मा. सदस्यांना हात जोडून विनंती करेन भरघोस मदत करावी. मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब हा निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. सदस्यांचा विरोध असेल असे मला वाटत नाही. शिवसेनेचे गटनेते आमगावकर ते देखील निवेदन करतील. मानवतेच्या दृष्टीकोनातून मी तुम्हाला दोन पानाचे लेटर दिले आहे. त्यामध्ये सर्व उल्लेख केलेला आहे. याच्या पलीकडे जाऊन स्वतःचा जीव वाचवू शकत नाही. सर्व घर पडून मातीमोल झाले. सर्व जनावर वाहून गेले अशी अवकळा पश्चिम महाराष्ट्रात आलेली आहे. सर्वात जास्त मदत आपल्या महापालिकेतून जावी अशी माझी स्वतःची अपेक्षा आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब विषयाचे गांभिर्य लक्षात घ्या. आम्ही दिलेल्या पत्राला उत्तर दिले नाही की तुम्ही काय करणार आहात. ४ लाख लोक ह्या पूरामुळे उध्वस्त झालेले आहेत. हजारो संसार उध्वस्त झालेले आहेत. २५ हजार कोटीचे नुकसान फक्त घरात राहणाऱ्या लोकांचे झाले आहे. इतर उद्योगधंदे वेगळेच. सांगलीमधल्या घरापर्यंत अजून मिडीया आणि सरकार पोहोचले नाही. ह्या स्वयंसेवी संस्था पोहोचल्या आहेत. १०-१५ फुट पाणी त्या घरामध्ये आहे. कित्येक लोकांनी जलसमाधी घेतलेली आहे. कित्येक लोक गुदमरुन मेले आहेत. कितीही मदत महाराष्ट्र सरकारने आणि एन.जी.ओ. आणि इन्डीव्ह्यूज्वल केली असेल तरी ती कमीच पडणार आहे. कारण हा पूरच महाभयंकर होता. ८ दिवस लोकांच्या घरामध्ये १०-१५ फुट पाणी होते. आज पाणी निघाल्यावर सगळीकडे चिखल आहे. जवळ जवळ एक वर्ष कित्येक हजारो हेक्टर ह्या जमिनीवर शेती होणार नाही. सुजलाम सुफलाम सांगली, कोल्हापूरचा परिसर एक वर्षामध्ये तिथे कुठलीही शेती होणार नाही. अशी त्या ठिकाणी परिस्थिती आहे. आज आम्ही आपल्याला निवेदन दिले होते ह्यापूर्वी देखील वर्षा मॅरेथॉनच्या बाबतीमध्ये झालेले आहे. एवढी काही घाई नाही आहे. महापालिकेनी तो फंड तिकडे खर्च करु नये आणि नंतर तुम्ही धुम धडाक्यामध्ये मॅरेथॉन घ्या. आज मॅरोथॉनमध्ये जेवढे प्रश्न उत्पन्न झाले आहेत त्याचे समाधानकारक आपण उत्तर देऊ शकले नाही. शहरामध्ये देखील तीच परिस्थिती आहे. गेल्या पावसाळ्यात काही लोकांच्या घरामध्ये पाणी शिरले होते, दुकानामध्ये पाणी शिरले होते. महापालिकेनी एवढी सुध्दा संवेदनशिलता दाखवली नाही की तिथे जाऊन सर्व्हे करावा. नुकसान भरपाईचा वेगळा विषय. आज संपूर्ण महाराष्ट्र त्यानंतर केरळ, कर्नाटका, आंध्रप्रदेश, गुजरात, उत्तराखंड ह्या सर्व राज्यामध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे आणि महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त आहे. आमचे आपल्याला नम्र निवेदन आहे की महापौर निधीमधून जो २५ लाख खर्च होणार आहे आणि ज्यावेळी वर्षा मॅरेथॉनचा ठराव झाला त्यावेळी त्या ठरावामध्ये पण असे नमूद केले आहे की जर पैसे कमी पडले डोनेशन जमा झाले नाही आम्ही कालपर्यंत ऑफिरसना विचारले तर ते बोलले एक पैसाही अजून जमा झालेला नाही. तर झालेला खर्च रिॲप्रोप्रिएशन करुन इतर खात्यातून वर्ग करावा असे त्या ठरावामध्ये नमूद झालेले आहे. त्यामुळे पालिकेच्या पैशाचा लोकांनी भरलेल्या टॅक्सचा दुरुपयोग करु नये तो निधी आणि काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या मानधनाचा निधी आपण पूरग्रस्तांना द्यावा ही आमची आपल्याला कळकळीची विनंती आहे. सभा सुरु व्हायच्या अगोदर कारण आज १४ तारीख आहे ३ दिवसांनी मॅरेथॉन आहे. तो निर्णय आम्हाला आज कळला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम आम्ही मागणी केलेल्या विषयावर निवेदन करावे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सभागृहात दोन विषय चर्चेत आहेत. एक मॅरेथॉनचा विषय आणि दुसरा कोल्हापूर, सांगलीमध्ये महाराष्ट्राच्या क्षेत्रामध्ये जो महापूर आला आहे त्या संदर्भात काँग्रेसच्या सदस्यांनी आपली भुमिका मांडली. तसेच शिवसेनेच्या सदस्यांनी भुमिका मांडली. आमच्याही पक्षाची भुमिका आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

कोल्हापूर, सांगली, कोकण ह्या परिसरामध्ये अतिवृष्टी झाली आहे. आम्ही शिवसेनेच्या वतीने आमच्या नगरसेवकांचे जे एक महिन्याचे मानधन आहे द्यायचे जाहिर करतो. आमचे मा. आमदार श्री. प्रताप सरनाईकांनी कोल्हापूरचे गाव दत्तक घेतलेले आहे. तिथे आमचे सर्व नगरसेवक जाऊन आम्हाला जी मदत करता येईल ती करणार आहोत.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या पावसाळ्यामध्ये संपूर्ण भारतामध्ये एक भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्नाटक, गुजरात, असाम, केरळ ह्या सर्व राज्यामध्ये नद्यांना पूर आलेला आहे. महाराष्ट्रात, कोल्हापूर, सांगली, सातारा ह्या भागामध्ये पूर आहे. अतिशय भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा भयानक परिस्थितीमध्ये मुख्यमंत्र्यांनी चांगली कामगिरी केली आणि मुख्यमंत्री निधीतून चांगला फंड त्या सर्व जिल्ह्याना दिला आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रत्येक सदस्य, प्रत्येक जिल्हाप्रदेशचे अध्यक्ष, सदस्य, नगरसेवक महापालिकेचे आमदार, खासदार ह्यांनी आपआपल्या परीने गटनेता हसमुख गेहलोत आणि मा. महापौर डिम्पल मेहता ह्यांनी सचिवांनी सांगितले की संपूर्ण भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे वेतन घ्यावे. तसेच मा. महापौरांनी मा. आयुक्तांशी चर्चा केली आणि आयुक्तांनी सुध्दा आपल्या सर्व कर्मचाऱ्याचे क्लास १, क्लास २ चा १५ दिवसाचा पगार आणि क्लास ३ क्लास ४ चा ५ दिवसाचा पगार असे जवळ जवळ एक करोड रुपये निधी मिरा भाईंदर महापालिकेमार्फत आयुक्त आणि महापौर ह्यांनी दिलेली आहे. संवेदना आमच्या मनात सुध्दा आहे. पण आम्ही ती दाखवत नाही. आमचे आमदार नरेंद्र मेहता ह्यांनी ७ लाख ११ हजाराचा चेक मुख्यमंत्री निधीमध्ये दिलेला आहे. कुठे प्रेस नोट दिली काहीच नाही. काही गाजावाजा केला काहीच नाही. संवेदना आमच्या मनामध्ये आहे आम्हाला ही वाटते परिस्थिती अतिशय भयानक आहे. अशा भयानक परिस्थितीमध्ये आपल्याला मदत केली पाहिजे. भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ता ती मदत करतो. राहीला विषय महापौर मॅरेथॉनचा महापौर मॅरेथॉन हा २ महिन्यापासून हा प्रोग्राम आयोजित केला आहे आणि हा पूर्वनियोजित प्रोग्राम असल्यामुळे त्याची संपूर्ण प्लानिंग झालेली आहे. जवळ जवळ ८५०० ते ९००० लोकांनी ह्याच्यात रजिस्ट्रेशन केलेले आहे. २५०० लोकांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे. हे सदस्य महाराष्ट्रातले आहेत. महाराष्ट्राच्या बाहेरचे आहेत. अशा परिस्थितीत महापौर मॅरेथॉन कॅन्सल केली तर थोडासा प्रॉब्लेम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण एवढ्या सगळ्या लोकांना त्यांचे पैसे परत देणे इट्स व्हेरी डिफिकल्ट टास्क आणि अशावेळी समजा आपण त्यांना पैसे परत दिले आपण काही स्पॉन्सर शोधलेले आहेत. आपण जी मॅरेथोन करतो त्यासाठी आपण प्लानिंग करतो. टी-शर्ट छापणे, मेडल छापणे आणि बाकीची इतरही तयारी केली आहे. आज त्या लोकांना आपल्याला काहीना ॲडव्हान्स द्यायला लागतो अशा परिस्थितीमध्ये जर महापौर मॅरेथॉन कॅन्सल केली तर आपल्याला फायदा न होता महापालिकेचे नुकसान होणार. कारण त्यांचे पैसे द्यावे लागणार ज्या लोकांची आपण स्पॉन्सरशिप घेतलेली आहे ते स्पॉन्सर आपल्याला स्पॉन्सरशिप देणार नाही. म्हणजे आपण काय करायला जातो आणि काय होते. हा विचार पण आपल्याला करायला लागेल. स्पॉन्सर आहेत त्यांना देखील पैसे परत द्यायला लागतील. जे टी शर्ट, मेडल त्याची तयारी केली आहे. त्यांना आपण पैसे देणार आहोत. ते आपल्याकडून पैसे परत मागतील. पुन्हा हे नुकसान होणार आहे. हा मनोरंजनाचा खेळ नाही. हा आपण फिटनेससाठी अव्हेरनेस आणि आपले सोशल कॉस्ट सेव्ह वॉटर आहे. प्लान्ट ट्री असे काही सोशल कॉस्ट घेऊन मॅरेथॉन करतो त्याच्यामुळे तसे काही गैर नाही. तरी माझी मा. महापौरांना विनंती आहे की आपण जो काही फंड ट्रान्सफर करतो. ह्याच्या व्यतिरिक्त सुध्दा आपल्याला तुम्ही काही मदत केली तर मिरा भाईंदर शहरामध्ये आणखी चांगला निधी महापालिकेमार्फत आपण पुरग्रस्तांसाठी देऊ. अशी माझी मा. महापौरांना विनंती आहे. त्यांनी पण खुलासा केलेला आहे. मी पण खुलासा केला आहे.

**जुबेर इनामदार :-**

पारदर्शक राज्य शासनानी पुरग्रस्तांना काय मदत केली आहे आणि त्याचे काय झाले त्याचे ताशोरे माध्यमातून ओढले जातात. संविधान हा शब्द वापरताना गिरीष महाजन साहेबांनी सेल्फी काढताना फोटो काढलेला हा पूर्ण वायरल झालेला विषय आहे. बर झाले तुम्हीच बोलला महापौर मॅरेथॉन आम्ही तेच बोलतो महापौर मॅरेथॉन आहे की वर्षा मॅरेथॉन आहे की मिरा भाईंदरनी आयोजित केलेली क्रिडा स्पर्धा आहे. ह्या विषयावर निर्णय घेतला पाहिजे. मी काल तुमच्या क्रिडा अधिकाऱ्यांना ११०० रुपये देत होतो. मला ह्याची रिसीप्ट द्या. ते बोलले माझ्याकडे तसे नियोजन नाही. मला माहित नाही पैसे कुठे घ्यायचे. हिशोब सभागृहामध्ये तुम्हाला देतो. मला त्याची रिसीप्ट द्या. झालेल्या तांत्रिक त्रुट्या आहेत त्याच्यावर चर्चा केली तर संध्याकाळपर्यंत विषय संपणार नाहीत. कोणाकडून स्पॉन्सरशिप घेणार आहेत त्याचा कुठे उल्लेख नाही. त्याचे रिसीप्ट कोण देणार ते कोणत्या खात्याने देणार? तो रेव्हेन्यू कुठे जमा होणार त्याची कोणाला काही माहिती नाही. क्रिडा अधिकाऱ्यांना काहीच माहिती नाही. अशाप्रकारे नियोजित केलेला अनियोजित वर्षा मॅरेथॉन रद्द करा. मा. महापौर मॅडम आम्ही तुम्हाला परत परत विनंती करु अशा परिस्थितीत १८ तारखेला मॅरेथॉन आयोजित करण्यात आलेले आहे. पाणी अजून ओसरलेले नाही. अजून तरी त्या शहरामध्ये पाणी आहे. कितीतरी देह तिकडे सापडणार. ज्या दिवशी तुम्ही इकडे लोकांना घेऊन धावणार त्यांची सर्व काही लक्षात घेतले पाहिजे. लोकांनी रजिस्ट्रेशन केले आहे. आम्ही कुठे बोलतो रजिस्ट्रेशन रद्द करा. पुढे कधीतरी ह्या नियोजन झाल्यावर हा देश कुठल्या बाजूने बघतो आणि आम्ही कुठल्या बाजूने चाललो. माणूसकी नावाची वस्तूच आमच्यात राहिली नाही. ते व्हिडीओ बघितल्यावर डोळ्यातून अश्रू येतात. तिकडच्या लोकांची काय वाईट परिस्थिती आहे. साडेचार लाख लोकांना स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. खाण्यापिण्याचे त्यांचे हाल झालेले आहेत आणि आपण इकडे क्रिडा स्पर्धा करत फिरायचे. कोल्हापूर सर्वात श्रीमंत जिल्हा होता. श्रीमंत लोक आज त्यांच्याकडे पूढचे वर्षभर खाण्यापिण्याचे हाल होणार आहेत. शेती राहिली आहे पण शेतकरी काय करणार? त्याच्यामध्ये कर्मचारी काय काम करणार? लोकांच्या घरामध्ये १०-१०, १५-१५ फुट पाणी आहे. ही वस्तूस्थिती आहे आजही आहे आणि आपण हे सगळे लक्षात घेऊन मा. महापौर मॅडम आमची आपल्याला परत एकदा विनंती आहे तुम्ही वर्षा मॅरेथॉन हा विषय कुठेतरी थांबवा. परत चांगल्या परिस्थितीत करता येईल. चांगल्या काळामध्ये केला पाहिजे. अशा परिस्थितीत केल्यावर आम्ही वर्षा मॅरेथॉनचा निषेध करत आहोत. हा वर्षा मॅरेथॉन आज रद्द झाला पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही परत परत का बोलता.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मॅडम ह्यांना केवढ दुःख होते. ह्यांना किती वेदना आहेत ह्यांनी सभागृहाला सांगितले ह्यांचे आपण गप्प ऐकून घेतले. ह्यांना पुरग्रस्तांना मदत करायची आहे तर ह्या सभागृहात दुःख आणि वेदना कोणासमोर मांडत होते. तुमच्यासमोर मांडल्या मग आता आमचे पण ऐकून घ्या. आमच्या काय वेदना आणि दुःख आहे ते ऐकून घ्या. आमच्या ज्या भुमिका आहेत त्या आम्हाला स्पष्ट बोलू द्या. आम्हाला ह्यांच्याशी बोलायचे नाही. ह्यांनी इतकी वर्ष काय केले त्याचा लेखाजोखा माझ्याकडे आहे. पण आम्हाला ते दाखवायचे नाही. त्यावेळी आम्ही त्याच्या मागे लागले नाही. आम्हाला ते दाखवायचे नाही. हे ज्या विभागाबद्दल बोलतात सांगली, सातारा, कोल्हापूर ह्यांचा त्याच्याशी काडीमात्र संबंध नाही. हे कधी त्या साईडला गेले नाहीत आणि आमच्या सरकारने काय केले ते ह्यांनी आम्हाला शिकवायचे नाही. आम्हाला बोलून दाखवायचे नाही. आमचे सरकार आमचा पक्ष काय करतो मा. महापौर मॅडम आज मिरा भाईंदरच्या जनतेला आम्हाला किती दुःख किती वेदना झाल्या आहेत. सर्व आपआपल्या घरी सण साजरे करतात. कोणी बोलत नाही. आम्ही असे म्हटले नाही की तुम्ही सण साजरे करु नका.

**जुबेर इनामदार :-**

सण साजरे होतात पण लोकांच्या पैशाने नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

पुरग्रस्तांना मदत करण्याबात जुबेर इनामदार पूरग्रस्तांना काय मदत करणार ते तुम्हाला ऐकायचे आहे म्हणून जागेवर बसा. महापालिका पुरग्रस्तांना काय मदत करणार आहे ते तुम्हाला सांगितले जाणार आहे. सदस्यांना विनंती आहे आपआपल्या जागेवर बसा. आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम फोटो काढून घ्यायचे हा एकमात्र उद्देश आहे. माझा ह्यांच्यावर आरोप आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

जुबेर इनामदार फोटोग्राफी झालेली आहे. फक्त तुम्हाला हे ऐकायचे आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम जेव्हा आपण ही मिटींग स्थगित केली त्यावेळी ह्यांच्याकडून सांगण्यात आले की १४ तारखेला पण घेऊ  नका. आम्ही ३ दिवस ईद साजरी करतो. ह्यांना ३ दिवस पाहिजे होते. त्यावेळी पुरग्रस्तांसाठी काही योजना नव्हत्या का?

**मा. उपमहापौर :-**

जुबेर इनामदार आपण चांगली चर्चा केली पाहिजे.

**मा. महापौर :-**

आमची भुमिका धृवकिशोर पाटीलनी सांगितली आहे. रद्द होणार नाही सर्वांनी जागेवर बसा आणि सभेला सुरुवात करावी.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला निर्णय पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. अनिल सावंतनी उल्लेख केला.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सदस्य अनिल सावंत आपण उल्लेख केला. सन्मा. गिरीष महाजन ह्यांनी सेल्फी घेतला. एका ठिकाणी एन.डी.ए चे जवान होते आणि गिरीष महाजन मंत्री महोदय पोहत त्या गावात गेले. काल मुख्यमंत्र्यांनी डिक्लेरेशन दिले. तुम्ही पण संवेदनशिल आहात ह्यांची जाणीव आहे.

**मा. आयुक्त :-**

माझी सन्मा. सदस्यांना विनंती राहील आपण जागेवर बसून चांगली चर्चा करु.

**मा. उपमहापौर :-**

आपण जागेवर बसा विनंती आहे. आम्ही संवेदनात डिक्लेर करतो. महाराष्ट्र सरकारची जबाबदारी महाराष्ट्र सरकारला माहिती आहे त्यांनी आपली भुमिका केंद्राकडे घेतली आहे. भरीव निधीची मागणी घेतली आहे. आज संध्याकाळपर्यंत त्याचे अनाऊन्समेंट होईल. तुम्ही आम्ही नव्हे हा महाराष्ट्र जेव्हा देशात संकट ओढावते तेव्हा हा महाराष्ट्र उभा राहिला आहे आणि महाराष्ट्रात संकट ओढवेल तेव्हा महाराष्ट्र उभा राहणार नाही का? प्रत्येक मंडळ, गणेशोत्सव मंडळ, छोटी छोटी मंडळ, संस्था, महापालिका, जिल्हापरिषदा, एन.जी.ओ. सगळेच जण कामाला लागले आहेत. तुम्ही सांगितले महापौर मॅरेथॉन रद्द करा. त्याच्याने कितपत मदत करुन शकू. सगळे प्रश्न आहेत. परंतु धृवकिशोर पाटील साहेबांनी सांगितले की ह्यासाठी आवश्यक त्या पूर्तता आपण केल्या आहेत. पूर्तता पैकी एक गोष्ट नक्की की ह्या स्पर्धेसाठी लागणारी सर्व व्यवस्था ही पूर्ण झालेली आहे त्यांची टीशर्ट लागणारे नंबर पेन्टींग, कम्प्यूटर चीप, रस्त्याच्या दुरुस्त्या, लागणारे सर्व नियोजन हे एक महिन्यापासून सुरु होते. सगळ्या गोष्टी झाल्या आहेत. मेडल तयार आहेत. सर्टिफिकेट प्रिंट झाले आहेत. त्याच्यावर तारखा आहेत. ह्या स्पर्धेसाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरुन नामवंत धावपट्टू येणार आहेत. अशा वेळेला प्रत्येकांनी पैसे भरले आहेत. आपण कशाला विरोध करतो एखाद्या गोष्टीसाठी विरोध म्हणून विरोध करतो. तुम्हाला उदाहरण देतो. आपण वेळ काढण्यासाठी भांडण करतो. विषय काढतो आणि भांडतो. त्या विषयाचा अनेक लोकांना लाभ होणार असतो ते वंचित राहतात ह्या सभागृहातले उदाहरण आहे. गेल्यावर्षी १०० गरजू महिलांना रिक्शा द्यायचा ठराव केला आणि त्यातल्या १० रिक्शा दिल्या परंतु त्याचे एवढे अवडंबर केले गेले की ९० महिलांना त्या अधिकारापासून वंचित रहावे लागेल. त्या गरजू महिलेचे संसार उभे रहिले असते. पण आपल्या एका चर्चेमुळे आपल्या बोलण्यामुळे आपण ९० लाभार्थ्यांवर अन्याय केला. आता धावपट्टू आहेत स्पर्धा मॅरेथॉनच्या

होतात, वर्षा मॅरेथॉन आहेत. परंतु पहिली मॅरेथॉन स्पर्धा मिरा भाईंदरमध्ये अशी आयोजित होते की ज्याच्यामध्ये जसे वसई विरार महापालिकेच्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये जे भाग घेतात ते अनेक स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी पात्र ठरतात. पात्रता फेरी त्यांची पूर्ण होते. तशी पात्रता फेरी ह्या मिरा भाईंदर मॅरेथॉनमध्ये धावल्यानंतर ते अनेक स्पर्धांना पात्र होणार आहेत. ह्या धावपट्टू बरोबर आपण काही स्पेशियर्स आणलेले आहेत. जे धावत आहेत ते आपल्याला प्रात्साहित करतील त्यांचे नियम आणि ह्या सगळ्या काही फन रन नाही. स्पर्धात्मक स्पर्धा आहेत त्याचे संपूर्ण नियोजन झाले आहे. आपली मागणी रास्त आहे. पण ह्या स्पर्धा थांबल्या नाही पाहिजे. ह्या मताचा मी आहे. हे सभागृह आहे असे मी मानतो. १८ तारीख आहे सगळ्या गोष्टी झाल्या त्यासाठी ह्या शहरातून अनेक स्पॉन्सर शोधले. अनेक लोकांनी त्याला मदत केली आणि पेमेन्टची कसे काय जिथे मंडप बांधायचे आहे जिथे स्टॉल बांधायचे आहे त्याच्यासाठी मंडप वाल्याची ऑर्डर झाली, टिशर्ट प्रिंट झाले. आपल्याला लागणारे मेडल, सर्टिफिकेट ह्या सर्व गोष्टी तयार झाल्यानंतर आज त्या बासनात गुंडाळून ठेवण्याची वेळ तुम्ही आणून देऊ नका. दुसरा प्रश्न आहे ह्या शहराने भरीव मदत केली पाहिजे. भारतीय जनता पक्षाची भुमिका स्टेटमधून आलेली आहे की प्रत्येक लोकप्रतिनिधीनी आपले मानधन द्या. मा. आयुक्त साहेब महापालिकेचे कर्मचारी काय देणार ते त्यांचे निवेदन करणार आहेत. आमच्या आरोग्याच्या कर्मचाऱ्यांनी अनेकांची मदत जमा केली आहे आणि आमचे भारतीय जनता पक्षाचे ६१ नगरसेवक हा आमचे एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करणार आहेत. त्या व्यतिरिक्त आमची एक सुचना आहे. आमचा निर्णय झाला आहे. तुमची कळकळ आणि भावना आमच्या लक्षात आहेत ह्या महापालिकेनी सांगली, सातारा, कोल्हापूरच्या पुरग्रस्तांना एक करोडची निधी महासभेनी द्यावी अशी मी विनंती करतो. आणि त्याचा ठराव घ्यावा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य जुबेर इनामदार, अनिल सावंत, दिनेश नलावडे, गटनेते आमगावकर, धृवकिशोर पाटील सन्मा. सदस्य, सन्मा. सभापती महोदय विहित सदस्यांना उपमहापौर, महापौर ह्यांनी विषय मांडला आहे. निश्चितच महाराष्ट्रावर आसमानी संकट आलेले आहे. आपण प्रत्यक्ष अनुभवले आहे. दुरदर्शनवरुन बघताना मनाला व्यथा होतात. एखादे घर पडले, एखादी व्यक्ती पुरात गेली. पशुपक्षी, शेती, जनावर मोठ्या प्रमाणात वित्त हानी झालेली आहे. ह्याचे इस्टीमेट काढणे फार अवघड आहे. निश्चित राज्यशासनाचा जो मोठा विषय आहे राज्यशासन त्यामध्ये काम करत आहे आणि सहाजिकच आपण एक महाराष्ट्रीयन आणि भारतीय म्हणून आपण मनाच्या संवेदनावर आले त्याच्यावर प्रतिक्रीया देणे ते स्वभाविक आहे आणि आपले आद्य कर्तव्य मी प्रत्यक्ष समजतो. उत्तम चर्चा ह्या सभागृहात सुरुवातीला घडून आली. प्रशासकीय निर्णय उपमहापौरांनी संबोधल्याप्रमाणे आपल्याला सांगायचे मी स्वतः एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या सर्व कलीग अधिकाऱ्यांना मी काल विनंती केली आहे. क्लास ४ प्यूनपर्यंत मोठा भरीव निर्णय करण्यापर्यंत आलो आहोत. वर्ग ३-४ चा पाच दिवसाचा पगार, वर्ग १-२ चा १५ दिवसांचा पगार आम्ही तत्वतः मान्य केला आहे. ही रक्कम सव्वा ते दीढ कोटीच्या जवळपास महापालिका कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून राज्यशासनाला आम्ही ह्या महिन्याच्या एंडला तो चेक आम्ही ट्रान्झीट करणार आहोत. मा. उपमहापौर ह्यांनी भूमिका मांडली आहे की आपल्याला अनुदान देण्यामध्ये लिमीट आहे. कायदे प्रणालीमध्ये आपल्याला शासनमर्यादा टाकून दिलेल्या आहेत. महाराष्ट्रावर आलेले संकट आणि आपल्या सर्वांच्या भावना विचारात घेता मी जरी प्रशासकीय अधिकारी असलो तर आपल्या शहराचा उत्पन्नाचे मुख्य स्तोत्र आहे. तर आपण ह्याला राज्य शासनाची मान्यता घेऊ आणि महापालिका फंडातून एक भरीव मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ठराव झाला तर मी राज्य शासनाची मान्यता घेऊन तो निधी सुध्दा आपण मुख्यमंत्री सहाय्यता निधीला वर्ग करायला प्रशासकीय लेवलवर माझी सुध्दा अनुमती राहील आणि त्याची वैधानिक प्रोसीजर पूर्ण केली जाईल. ते आपण सर्वांच्या समावेशाने निर्णय घ्याल त्याची अंमलबजावणी ह्या ठिकाणी केली जाईल आणि आपला हा पुरग्रस्तासाठी खारीची मदत वाटा सगळ्यांचा राहील. हा पूर्ण शहरवासियांचे राहील ह्या ठिकाणी माझी आपल्याला विनंती राहील की आपण देशपातळीवर बघितले तर जिथे नमाज पढत होते तेथे देखील चंदा पेटी जमा करत होते. पुरग्रस्तांसाठी हे चित्र मी टि.व्ही. वर बघितले आहे. गल्ली गल्लीमध्ये लहान बालक आता फेऱ्या काढतात. पण एकमेकांवर आरोप प्रत्यारोप न करता सर्वपक्षीय एक समिती गठीत करावी. मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी शहर पातळीवर आणि एक निश्चित वेळ आणि एक सभागृहामध्ये ती सभा आयोजित करावी. सर्वपक्षीय सदस्य ह्याच्यामध्ये असावे. महापौरांच्या अध्यक्षतेखाली केल्यास हरकत नाही. त्यामध्ये आमदार, खासदारचा देखील समावेश करावे आणि आपले सर्व लोक प्रतिनिधी आणि शहर पातळीवर आपण एका ठराविक ठिकाणी शहरातील उद्योगपती शहरातील व्यवसायिक आणि दानशूर व्यक्ती ह्यांना आपण जाहिर आवाहन करावे. एक ठराविक वेळ त्याच्यासाठी

द्यावी आणि त्यातून शहरपातळीवर जो निधी जमा होईल. तो सुध्दा पुरग्रस्तांना देण्याचा एक धोरणात्मक निर्णय आपण केला. शहराच्या माध्यमातून केला तर आपल्या शहराचा वेगळा मॅसेज राज्यामध्ये जाईल असे प्रशासकीय लेवलवर धाडस करुन आपल्यासमोर हा विषय ठेवतो. ३ बाबी ह्या ठिकाणी मांडल्या आहेत. मला वाटते त्यामध्ये मोठा निधी जमा होऊ शकतो. आणि शहरातले दानशूर व्यक्ती आपल्याला निश्चित मदत करतील. सर्व जमा होणारा निधी सर्व पक्षीय गटानी मुख्यमंत्रीना नेऊन दिला पाहिजे. त्यामध्ये कुठल्याही पक्षाचा भेद न करता सामुहिक धोरण निश्चित केले पाहिजे. ह्याच्यावर सर्व गटनेत्यांनी पुढाकार घेतला प्रशासकीय लेवलला काम करण्याची माझी सुध्दा तयारी राहील. चौथा मुद्दा वर्षा मॅरेथॉन मा. महापौरांचे आयोजित केले आहे. त्याला महासभेने मान्यता दिली आहे. त्याच्यानंतरचे सर्व सोपस्कर आम्ही पूर्ण केलेले आहेत. भावना अगदी अतिउत्तम आहे की ते आता करायचे रद्द करायचे किंवा पुढे करायचे किंवा आतापर्यंत झालेली प्रगती विचारात घेता पार्टीसिपेट बद्दल आपण काय जबाबदारी घेतो. त्यांनी दिलेले पैसे एवढ्या हजार लोकांच्या पार्टीसिपेट ह्याच्यामध्ये आलेले आहे. जिल्ह्यामध्ये दोन ठिकाणी एकाच दिवशी मॅरेथॉन होतात. भविष्यातल्या मॅरेथॉनसाठी डेट बदलायचा निर्णय करायला लागेल. जेणेकरुन ज्या फेडरेशन असोसिएशनच्या ज्या सहमती असतात त्या वैधानिक बाबी नाहीत. मॅरेथॉन हा खुला विषय आहे. प्रत्येक शहर प्रत्येक संघटन अशा पध्दतीचे आयोजन करु शकतो. इंटरनॅशनल ॲथलेटीक असोसिएशनचा आम्हाला नामांकन मिळाले आहे. पण एका दिवशी दोन जिल्ह्यातील होत असल्यामुळे आणि ठाणे हे पारंपारिक पूर्वीपासून होत असल्यामुळे त्यांना ते नामांकन मिळालेले आहे. ह्याचा अर्थ आपले मॅरेथॉन बेकायदेशीर आहे. अशातला भाग नाही. पण भविष्यात ह्याच्यावर आपल्याला निर्णय करायला लागेल. ह्याबाबत दोन्ही साईडच्या चर्चा ह्या ठिकाणी झालेल्या आहेत. टीशर्ट प्रिंट झालेले आहेत मेडल्स आलेले आहेत. सर्टिफिकेट आलेले आहेत. नऊ हजार रजिस्ट्रेशन झालेले आहेत. त्यांना ते कन्सन दिलेले आहेत. अशा परिस्थितीत ह्याला कशा पध्दतीने १८ तारखेला मॅरेथॉन करावे हे सुध्दा एकमताने निर्णय घ्यावा. मला वाटते ह्या संवेदना विचारात घेऊन आपण चांगला निर्णय केला तर भाईंदरचे नाव राज्यामध्ये पुढे जाईल. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

आता खूप चर्चा झाली आहे तुम्हाला निर्णय मिळेल.

**निलम ढवण :-**

पुरग्रस्तावर बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

बोला.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम आपला निर्णय द्या.

**मा. महापौर :-**

प्रशासनाचा कार्यक्रम आहे. प्रशासनाने निवेदन दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मेयर इन द हाऊस हा नियम आहे. इथे पिठासन तुम्ही.

**मा. महापौर :-**

तुम्ही पण साथ देणार तर कार्यक्रम चांगला होईल. आमची तयारी झालेली आहे. आता आमची मुश्कील आहे की आम्ही रद्द करु शकत नाही. १८ तारखेला होणार कारण आमची सर्व तयारी झालेली आहे. मा. आयुक्त पण तुम्हाला बोलले आमचे पदाधिकारी पण बोलले. सर्वांचे पैसे आपण घेतलेले आहेत ते परत करु शकत नाही. सर्टीफिकेटला डेट वगैरे सर्व झालेले आहे. ट्रॉफीमध्ये पण डेट वगैरे त्याची तयारी पहिलीच केलेली आहे. म्हणून होणार नाही. आता बसून जा. चर्चा परत होणार नाही.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आपणांस विनंती आहे की भयानक परिस्थितीला मदत करण्यासाठी आपण नियोजन सांगितले आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या वतीने त्यांची काही आर्थिक मदत मुख्यमंत्री फंडामध्ये जमा करणार असे आपण जे प्रस्तावित केले तर मी आपल्याला एक विनंती करते की आपण जे वक्तव्य ह्यापूढे केलं की सर्वांनी मिळून केले तर मिरा भाईंदरचे नाव एका ह्याच्यावर पोहोचेल तर त्याच पध्दतीने आपल्याला एक निवेदन करते की हा जो फंड मुख्यमंत्री निधीमध्ये आपण करण्यापेक्षा ज्या पध्दतीने आदरणीय आमदार प्रताप सरनाईक सर ह्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळा तालुक्यातील मजरेवाडी येथील ३२५ कुटुंबाना प्रस्तावित करण्याचे त्यांनी तो गाव स्वतः दत्तक घेतलेला आहे. तर त्याच पध्दतीने मिरा भाईंदर शहराच्या वतीने एखादा गाव आणि अशी कुटुंब आपण प्रस्तावित

करण्यासाठी घेतली तर मला वाटते मिरा भाईंदर शहर हे एक शहर असेल की देशाच्या आणि राज्यामध्ये त्याचे नाव येऊ शकेल. मुख्यमंत्री निधीला हे नाही परंतु त्याच्याकडे बऱ्याच ठिकाणाहून निधी येऊ शकतो. परंतु मिरा भाईंदर क्षेत्रातील आपण जर एक दोन करोड देणार आहेत त्या बदल्यामध्ये आपण एखादे गाव घेऊन प्रस्तावित केले तर ते आणखी चांगले होऊ शकेल आणि मिरा भाईंदरचे नाव होऊ शकेल.

**राजीव मेहरा :-**

मा. महापौर के परमिशनसे कमिशर साहब हम कल आपको निवेदन देने आए थे आप नही थे। तो डेप्यूटी कमिशनर को दिया था। उनसे हमने चर्चा की तो काफी कुछ आज अभी बताया गया। टीशर्ट, परमिशन मेडल उन्होने बोला कुछ डोनेशन अभी आयी नही और कुछ तयारी नही। यह कल १२ बजे की बात है और आज हाऊस में बोल रहे है की हर चीज की तयारी है। दुसरी चीज कोई भी मॅरेथॉन आर्गनाइज करते है तो महाराष्ट्र स्टेट ॲथलेटीक असोसिएशन का कॉलोब्रेशन था। उनकी परमिशन लगती है और उनकी परमिशन की सर्क्युलर व्हॉट्स अप पे घूम रहा है। जनरल सेक्रेटरी महाराष्ट्र ॲथलेटीक असोसिएशन का की हमारे पास कुछ नही है। यह इलिगल है अन ऑथराईज्ड है। तो उसपे आप स्पष्टीकरण किजीए क्योंकी जो ॲथलीन्ड रेग्युलर प्रोफेशनल ॲथलीज्ड है।

**मा. आयुक्त :-**

मी पहिलाच हा खुलासा आपल्याला केलेला आहे.

**राजीव मेहरा :-**

असोसिएशन की परमिशन है क्या हमारी।

**मा. आयुक्त :-**

कोणतेही असोसिएशन हे शासन लिड असोसिएशन नाही आहे त्याचे जे संकेत असतात. त्या असोसिएशन अंतर्गत रजिस्टर्ड जर हे काम झाले तर ते जे पार्टिसिपेट आहेत त्याचे जे नामांकन असते त्याला ते मदत होते. ह्या खुल्या स्पर्धा होतात. महासभेने मान्यता दिलेल्या ठरावाप्रमाणे कामकाज होते आणि प्रत्येक ॲथलेटिक असोसिएशन फेडरेशन ऑफ स्टेट ते डिस्ट्रीक फेडरेशन मी ॲप्लीकेशन दिलेले आहे. आता त्यांना मान्यता देण्याचे त्यांचे काम होते. फार मोठी जबाबदारी नाही. दोन ॲट अ टाईम आल्यामुळे जी जुनी होती त्याला मान्यता दिली. आम्हाला त्याला कन्सेन्ट नाही दिली. हा ओपन खेळ आहे. आता कबड्डी खेळायचे आहे. खो खो खेळायचे आहे त्याला कोणाची मान्यता लागते शहरपातळीवर आपलाच निर्णय आहे.

**राजीव मेहरा :-**

कमिशनर साहब बात यह है की, जनरल सेक्रेटरी महाराष्ट्र ॲथलेटीक असोसिएशन का यह है की हमारी परमिशन नही है तो जो प्रोफेशनल ॲथलिट्स रहेंगे उनको आगे मॅरेथॉन में पार्टीसिपेट करने नही मिलेगा। यह पर्सनली बात हुई है। इनकेस अगर ऐसा हुआ तो आप प्रोफेकशनल ॲथलिट्स है। उनके साथ अन्याय होगा क्योंकी उनके परमिशन का हमारे पास नही है।

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला हाच खुलासा केला की जिल्ह्यामध्ये दोन ॲथलेटीक्स एकाच वेळेला येतात. त्यामुळे भविष्यात तारीख बदलायला लागेल.

**दिपाली मोकाशी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने सभा चालू झाल्यापासून पश्चिम महाराष्ट्राला मदत करण्याचा जो विषय इथे चाललेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातली मुलगी ह्या नात्याने मी बोलते मी सातारा जिल्ह्यातील आहे आणि कोल्हापूर मध्ये लहानाची मोठी झाली आहे. इथे मगासपासून आम्ही एवढे पैसे देणार तेवढे पैसे देणार ह्या ज्या गोष्टी चालल्या आहेत जर तुम्हाला द्यायचे आहेत तर त्याची मार्केटींग करायची गरज नाही किंवा बॅनर पोस्टरची गरज नव्हती. खरच मदत करायची आहे ना तर त्याठिकाणी परिस्थिती जाऊन बघा गेले ८-१० दिवस आम्ही तिथे पाहतो १० ते १२ फुट लोकांच्या घरामध्ये पाणी आहे. महिलांना वरती जाऊन बसायला लागते. महिलांना, मुलींना पर्सनल प्रॉब्लेम असतात. तुम्हाला खरच मदत करायची आहे तर एखाद्या डॉक्टरची टीम घ्या. स्वतः तुमचा वेळ काढा त्यांना वेळेची गरज आहे. पैसे सरकार आणि सर्व लोक देणार आहेत. पैसे द्यायला सर्व असतात पण तिथे जाऊन त्याच्यासाठी वेळ द्या. त्यांना त्यांच्यातून बाहेर काढायला मदत करा. मगापासून हा जो ड्रामा चालला आहे ना त्याचा काही अर्थ नाही. मॅरेथॉन घेतली काय नाही घेतली काय तो प्रत्येक शहराचा विषय आहे. पश्चिम महाराष्ट्राने आजपर्यंत महाराष्ट्राला खूप दिले आहे. सगळ्या सदनाचा असा तो महाराष्ट्राचा भाग आहे. आतापर्यंत पश्चिम महाराष्ट्रानी खुल्या हातानी सर्वांना दिले आहे. आता त्याच्यावर अचानकपणे निर्सगाने घाला घातलेला आहे. त्यासाठी माणूस म्हणून माणसातल्या माणूसकीचा विचार करा आणि मदत करा सर्वांना दाखवायची गरज नाही. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

विषयाला सुरुवात करा.

**प्रभात पाटील :-**

मॅडम खूप चांगल बोलल्या ह्रदयाला र्स्पशून जाणारे पॉलिटीक्समध्ये हे करा ते करा, हे काम रोखा ते काम रोखा करु शकत नाही. आपल्याला जशी दुष्काळग्रस्तांना मदत करायची जबाबदारी आहे तशी ह्या शहरातल्या नागरिकांना ह्या शहरातल्या खेळाडूंना ह्या शहरातील महिलांना प्लॅटफॉम देण्याची सर्व जबाबदारी आपली आहे. हे सुध्दा आपण उपलब्ध करुन दिले पाहिजे. त्यासाठी मॅरेथॉन सारख्या स्पर्धा क्रिडा स्पर्धा ह्या शहरात घडणे आवश्यक आहे. राहिली गोष्ट आपण ही मदत तिकडे वळवू बजेटमध्ये ह्या गोष्टीची तरतूद आहे. आपण सर्वानुमते केली आहे. दुसरी गोष्ट मॅरेथॉन घेण्यासाठी आपण महासभेत प्रस्ताव आणला त्याला मंजूरी घेतली. नैसर्गिकरित्या हा जो घाला तयार झालेला आहे आपल्याला स्वप्न पडले नव्हते की ते त्याचवेळेला होणार आहे. आपली पूर्ण तयारी झालेली आहे त्यामुळे ह्या शहरात होऊ घातलेला नागरिकांसाठी, खेळाडूंसाठी, तरुणांसाठी, शाळेतल्या मुलांसाठी होऊ घातलेली स्पर्धा रद्द केली जाऊ नये. राहीला विषय त्या लोकांच्या संवेदनाचा आमच्या मनात पण संवेदनशीलता आहे. ती प्रत्येकानी पक्ष पातळीवर पण बोलून दाखवली. वैयक्तिरित्या पण बोलून दाखवली. आयुक्तांनी बोलून दाखवली. आयुक्तांनी त्याच्या कर्मचाऱ्यांकडून इव्हन सफाई कामगारांनी सुध्दा आपली संवेदनशीलता बोलून दाखवली त्याच्यामुळे कोणी मदतीचे किंवा संवेदनशीलतेचे गोष्टी करण्याचे काम राहिले नाही. आमच्या गटनेत्यांनी ते डिक्लेरही केले की आमच्याकडूनही आमच्या एक महिन्याचे मानधन जाईल. त्याच्यापलीकडे जाऊन मी एक ठराव मांडते. महाराष्ट्र राज्यामध्ये कोल्हापूर, सांगली या भागात महापुर येवून मालमत्ता, शेती, पशु यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यांना सर्व देशातुन, राज्यातून मदतीचा ओघ सुरु असून मिरा भाईंदर महानगरपालिकेचा खारीचा वाटा म्हणून पुरग्रस्तांना रु. १ कोटी निधी मुख्यमंत्री निधीमध्ये द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**ठराव क्र. ३७ :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोल्हापूर, सांगली या भागात महापुर येवून मालमत्ता, शेती, पशु यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यांना सर्व देशातुन, राज्यातून मदतीचा ओघ सुरु असून मिरा भाईंदर महानगरपालिकेचा खारीचा वाटा म्हणून पुरग्रस्तांना रु. १ कोटी निधी मुख्यमंत्री निधीमध्ये द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील** **अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम तांत्रिक चुकावर लक्ष वेधू इच्छितो.

**मा. महापौर :-**

आता तुम्ही बसा. खूप चर्चा झाली आहे. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होते. १२.१३ मिनिटे झाली आहेत. अनिल सावंत ह्यांचा प्रश्न आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाली आहे. महापौर मॅडमनी बोलायला दिले नाही. दोन गोष्टी क्लिअर करणार स्पर्धा काही बेकायदेशीर नाही. तशी कायदेशीर ही नाही. हे तुम्ही मान्य केले त्यामुळे ह्या स्पर्धेत ज्यांना मेडल मिळेल ज्यांचे नंबर असतील त्यांना काही वेटेज असणार नाही. दुसरी गोष्ट महासभेमध्ये जो मॅरेथॉनचा ठराव झाला आयुक्तांना सर्व अधिकार दिलेले होते. काल शिष्टमंडळानी डी.एम.सी. ची भेट घेतली.

**मा. महापौर :-**

परत परत ते विषय घेऊ नका.

**अनिल सावंत :-**

त्या वेळेमध्येच संपवणार. तुम्ही माझा वेळ खाऊ नका.

**मा. महापौर :-**

प्रश्न आहे ते बोला.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब महासभेने आपल्याला अधिकार दिले. त्या तुमच्या अधिकाऱ्याला विचारले. (सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

लॉजिंग बोर्डिंगचा प्रश्न आपल्याला माहितच आहे. २००९ मध्ये सभागृहाने एकमताने ठराव केला. ह्या शहरामध्ये सध्या जी लॉजिंग बोर्डिंग आहते त्यानंतर कुठल्याही लॉजिंग बोर्डिंगला परवाना देऊ नये. त्यानंतर एस.पी. नवाल बजाज साहेब ह्या महापालिकेमध्ये आले होते. संयुक्त बैठक झाली. अनधिकृत जे लॉजिंग बोर्डिंग आहेत त्याच्यावर कारवाई करा. म्हणून त्यावेळी २३ लॉजिंग बोर्डिंगवर कारवाई झाली. त्यांचे नळ कनेक्शन कापले गेले. लाईट बिल कट केले गेले. त्यानंतर आजची परिस्थिती ही आहे की लॉजिंग बोर्डिंगचा सूळसूळाट चाललेला आहे. मी प्रश्न विचारला त्याच्यामध्ये भावना हीच होती तुम्ही प्रश्न विचारल्यावर प्रशासन काहीतरी कारवाई करेल. जानेवारी २००९ ला मी आयुक्तांना पत्र लिहिले त्या पत्रात काय कारवाई करण्यात आली. कारवाई करणार आहोत की नाही. नविन लॉजिंग बोर्डिंगला परमिशन दिली की नाही ह्या विषयी काही उल्लेख काय त्या पत्राचे उत्तर पण दिले नाही. ह्या शहराची मानसिकता जाते कुठे? शॉपकिपरनी जर थोडेसे छप्पर बाहेर काढले असेल तर आपण त्याच्यावर कारवाई करतो. इतर जे स्लम एरियामध्ये राहणारे असतील इंडस्ट्रीयल एरिया असेल त्यांनी थोडेसे फ्लोरिंग वाढवले तरी त्यांच्यावर कारवाई करतो. मग लॉजिंग बोर्डिंगवर कारवाई करायला महापालिकेचे हात का धजावत नाही. नविन परमिशन का दिल्या जातात अशी कोणती पर्यटन स्थळ ह्या शहरामध्ये आहेत. साहेब माझ्या जवळ ही पूर्ण फाईल भरलेली आहे. ८० टक्के लॉजिंग बोर्डिंग अशी आहेत की ज्यांच्या जवळ परवाने नाहीत ज्यांनी परवाने नुतनीकरण केलेले नाही प्रत्येकदा ही शॉटेज आहेत ज्यांनी तुमचे परवाने घेतलेच नाही आणि हॉटेल चालवतात. मा. आयुक्त साहेब ह्या महापालिकेचा अधिकारी म्हणून शहराचे जबाबदार अधिकारी म्हणून आपण निवेदन करावे. त्यानंतर माझ्या जवळ डाटा आहे त्याच्यावर चर्चा करेल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रश्न २०१९ चा आहे. ह्याचे आपल्याला लेखी उत्तर ८ तारखेला दिलेले आहे. ह्यामध्ये आपल्या प्रश्नाच्या अनुषंगाने हे लॉजिंग बोर्डिंग महापालिका एम.आर.टी.पी. अधिनियमाच्या अंतर्गत आणि डी.सी. रुल अंतर्गत जो प्रस्ताव होता त्याला मान्यता रोखता येत नाही. त्यांचा स्टॅन्डर्ड एरिया आणि नविन विकासक आहेत. गेल्या एक वर्षाच्या कामकाजामध्ये मला असे वाटत नाही की एक दोन पेक्षा जास्त लॉजिंग बोर्डिंगचा प्रस्ताव आलेला आहे. नव्याने आपण दिलेला आहे. एक ही त्याच्या पध्दतीची कारवाई आपल्या स्तरावर झालेली नाही. तसा प्रस्ताव आलेला नाही. वस्तुस्थितीमध्ये हे जे शहरामध्ये पूर्वीपासून नगरपरिषद काळापासून जे लॉजिंग बोर्डिंग चालू आहेत आणि त्या ठिकाणी अवैध व्यवसाय होतात अशा ज्या सामाजिक दृष्टीकोनातून तक्रारी होतात महापालिका आणि पोलिस दोन्हींच्या मदतीने वेळोवेळी त्याच्यावर कारवाई केलेली आहे. २३ लॉजिंग बोर्डिंगवर ह्यापूर्वी सन्मा. गिते साहेबांनी पण कारवाई केलेली आहे. मी जॉईंट झाल्यानंतर एस.पी. राठोड साहेबांनी माझ्या उपस्थितीत आम्ही ७ लॉजिंग बोर्डिंगवर ३ वेळेस कारवाया केलेल्या आहेत. ह्या शिवाय अशा बाबींच्या अजूनही कधी भविष्यात कुठले इश्यू आले तर आम्ही त्याच्यावर प्रकर्षाने कारवाई करतो. जो व्यवसाय आहे हॉटेल आणि रेस्टॉरन्ट त्याला पण आपल्याला पाबंदी करता येत नाही. कारण ते नगरपरिषद काळापासून आहे विद्यमान वापरात आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब जे लिगल आहेत अधिकृत आहेत त्याच्याबद्दल माझे काही म्हणणेच नाही. ठराव तुम्ही विखंडीत करायला पाठवला का? २००९ मध्ये महासभेनी एकमताने ह्या ठिकाणी ठराव केला होता.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर कारवाईच करतो असा विखंडीत करण्याचा नाही.

**अनिल सावंत :-**

नविन परवाना देऊ नये असा ठराव झाला होता. साहेब रेकॉर्ड काढून बघा. त्याचा ठराव सुध्दा आम्ही आपल्याला केलं होतं. आजची परिस्थिती काय आहे माहिती आहे. ह्या शहरामध्ये त्यावेळी ७० होते.

त्यातील २३ जणांचे परवाना रद्द केले होते. कारवाई केली होती राहिले ५०-४८ आज जवळजवळ ८६ लॉजिंग बोर्डींग ह्या शहरामध्ये आहेत. हे मला फिगर आलेले आहे. त्याच्या व्यतिरिक्त असतील ते वेगळे आणि त्यांची परिस्थिती काय कित्येकांनी परवाना घेतलेले नाहीत. परवाना नोटिपुलेट केलेले नाहीत. परवाना नियमीत करण्यात आलेले नाहीत. अग्निशमन दाखला नाही. एस.डी.ए. परवाना नाही गुमास्ता नाही, औषध परवाना नाही त्याही अर्धवट तोडलेल्या आहेत. परवाना रद्द लॉजिंग चालू अवैध धंदामुळे ठाणे ग्रामीण पोलिसांमार्फत कारवाई होते पण महापालिका काही करत नाही. कारण तुमच्या डिपार्टमेंटने दिलेला डाटा आहे.

**मा. आयुक्त :-**

दोघांच्या कम्बाईननेच कारवाई होते.

**अनिल सावंत :-**

महापालिकेने दिलेला डाटा आहे त्याच्यामध्ये कित्येक लॉजिंग बोर्डिंग आहेत ज्यांनी परवानाच घेतलेला नाही. तुमचे महापालिकेला विचारतच नाही. अग्निशमनचा परवाना नाही, फुड आणि ड्रग्जचा परवाना नाही, गुमास्ता परवाना नाही एखाद्या भुखंडावर जर अशाप्रकारे वर्तन असेल तर त्याच्यावर केवढी मोठी कारवाई होते. मग ह्या लॉजिंग बोर्डिंग बाबतीत तुमचा सॉफ्ट कॉर्नर काय ह्याचे मला उत्तर पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

विषय सॉफ्ट कॉर्नरचा नाही. विद्यमान व्यवसाय हे महापालिका होण्यापूर्वीचे आहेत. आता आपला जो ठराव झालेला आहे त्याप्रमाणे त्या ठिकाणी अग्निशमन सुरक्षा, महापालिका परवाना, वजन मापेची परवानगी आणि फुड डिपार्टमेंटचा परवाना जिल्हाधिकारी, एस.पी. आदरणीय ह्या दोघांची परवानग्या ह्या सगळ्याचा डाटा ह्या एक महिन्यात आम्ही चेक करुन घेऊ.

**अनिल सावंत :-**

साहेब डाटा आहे तुमच्याकडे त्याच्यामध्ये म्हटलेले आहे परवाना घेतलेला नाही तुमचीच पत्र आहेत.

**मा. आयुक्त :-**

डिटेल पूर्ण एक एक आस्थापनेने चेक करुन त्यावर जे पात्र होत नाही त्यांच्यावर कारवाई केली जाईल. अनिल सावंत साहेब पूर्ण डाटा नाही. ८६ चा इथे फक्त ४३ चा डाटा आहे. तुम्ही ८६ ची फिगर कशावरुन काढली माहिती नाही.

**अनिल सावंत :-**

मला जी माहिती आलेली आहे एक नंबर प्रभागामध्ये त्यांनी झिरो दाखवलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला जी माहिती दिलेली आहे ती ४३ ची आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब २०१९ चे लेटर आहे प्रभाग क्र. ६ मध्ये ४७ आहेत.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग निहाय नाही पूर्ण शहर पातळीवरचे आहेत.

**अनिल सावंत :-**

माझ्याकडे प्रभाग निहाय आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे निश्चितच ह्या विषयावर कारवाई करण्याचा आहे. ह्यामध्ये जे विद्यमान वापर असलेले व्यवसाय धारक आहेत. त्याचे महापालिकेचा परवाना, अग्निशमन सुरक्षा बाबतचा परवाना, जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिक्षक यांची एन.ओ.सी. आणि राज्यशासनाच्या वजनमापी कार्यालयाची परवानगी आणि अन्य विभागाचे दाखले ह्या बाबीच्या पुर्तता ज्या इंटरप्राईझकडे होत नाही त्याचा आस्थापना बंद करण्याचा आम्ही निर्णय घेऊ. त्याचा अहवाल तुम्हाला पुढच्या सभेला देऊ.

**अनिल सावंत :-**

मी प्रश्न कधी विचारला अजूनपर्यंत कारवाई व्हायला पाहिजे होती. साहेब छोटस उदाहरण देतो मला व्यक्तीशः कोणावर आरोप करायचे नाही ह्या शहरामध्ये सर्वात मोठी असलेली.......

**मा. आयुक्त :-**

त्याचे डिटेल काम चालू आहे. सगळ्या ८६ यांचे आस्थापना पूर्ण नाही झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

ह्या शहरामध्ये सगळ्यात मोठी असलेली हॉटेल व्यक्तीशः ते काही माझे दुश्मन नाहीत. पण तुमच्या जवळून जो रेकॉर्ड आलेला आहे त्यावरुन जी.सी.सी. आणि एक्सप्रेस इन तुमचा परवानाच घेतलेला नाही आणि एवढे राजरोस हॉटेल चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

जी.सी.सी. ला तर १०० परसन्ट परवानगी आहे असे एवढे आपण बोलू नाही शकत तिथे अग्निशमनची परवानगी आहे जी.सी.सी. इटींग नाईज हॉटेल आहे.

**अनिल सावंत :-**

सर्व रेकग्नाईज आहेत ह्या ठिकाणी नव्याने आलेले जी.सी.सी. हॉटेल अनावश्यक प्रशासनाचा परवाना नाही, अग्निशमन दाखला नाही इटींगनाईज परवाना नाही, एस.डी.आय परवानगी डॅश.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला ज्यांनी माहिती दिली ती माहिती आम्हाला चेक करावी लागेल ती परिपूर्ण माहिती नाही.

**अनिल सावंत :-**

तुमच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती आहे आणि महासभेच्या प्रश्नाला उत्तर तो देतो. हे असेच चालणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

हे चार विभाग आहेत अग्निशमन विभाग वेगळा आहे. विकास परवानगी अंतर्गत देणारी टाऊन प्लानिंग परवानगी देते. फक्त एक परवाना विभाग हा व्यवसाय साठीचा असतो दरवर्षीचा रिन्युवल करण्याचा.

**अनिल सावंत :-**

त्याचा उलगडा झाला नाही त्याच्यामध्ये रिमार्कमध्ये निर्णय लिहिला आहे. लेखी मत खुलासा कागदपत्र सुनावणी वेळीस सादर केलेली नाही. संबंधित व्यक्ती किंवा प्रतिनिधी हजर झालेली नाही. सदर परवाना रद्द करण्यांत येत आहे जी.सी.सी.

**मा. आयुक्त :-**

कोणाच्या सहीची माहिती आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब हे सुध्दा आम्हीच सांगायला पाहिजे का?

**मा. आयुक्त :-**

हे कशाच्या आधारे चर्चा होते हे आमच्याकडे मांडले पाहिजे ना.

**अनिल सावंत :-**

परवाना विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका.

**मा. आयुक्त :-**

परवाना हा फार शेवटचा विभाग आहे. एम.आर.टी.पी. खाली एखाद्याला परवानगी असल्यानंतर त्याला परत दुसरी परवानगी देण्याचे काम घेतले जाते.

**अनिल सावंत :-**

विभाग प्रमुख परवाना त्यांचे सहीचे पत्र आहे. त्यांनी निर्णय लिहिला आहे तुम्ही म्हणता की जी.सी.सी असे होऊच शकत नाही. तुम्ही रायटींगमध्ये दिलेले आहे की त्यांनी परवाना घेतलेला नाही आणि परवाना रद्द करण्यांत येत आहे. मग त्या प्रश्न विचारल्यानंतर तरी सुध्दा जाऊन दुरुस्त करता येतो ना तुम्हाला परवाना घेतला असेल तर तेच उत्तर कायम करता म्हणजे तेच खरं म्हणाल मला लास्टला जे उत्तर मिळाले तेच खर सांगणार.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही जेष्ठ सदस्य आहात. आपल्याला सगळी माहिती आहे. जी.सी.सी. ला काय काय परवानग्या आहेत ते ही आपल्याला माहिती आहे.

**अनिल सावंत :-**

मला माहिती नाही. मला याच्यावरुन माहिती आहे.

**मा. आयुक्त :-**

ती माहिती आपल्याला बेस्ट करुन दिली जाईल.

**अनिल सावंत :-**

मला सांगा ह्याच्यामध्ये एक निर्णय लिहिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

परवाना अधिकाऱ्यांनी तुम्हाला जी माहिती दिलेली आहे ती त्रोटक माहिती आहे. मी मान्य करतो त्याच्यात सुधारणा होणे अपेक्षित आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब डिटेल माहिती दिलेली आहे त्रोटक नाही.

**मा. आयुक्त :-**

मी आयुक्त बोलतोय त्याच्यावर तुमचा विश्वास नाही. एक कोणी तरी एक साधा अधिकारी तुम्हाला काहीतरी देले त्याच्यावर सभागृहात चर्चा करतात.

**अनिल सावंत :-**

काहीतरी दिले याला अर्थ आहे. महासभेमध्ये विचारलेला प्रश्न आहे असे जर अधिकारी असतील तर त्यांना घरी बसवा.

**मा. आयुक्त :-**

चौकशी करुन कारवाई करु.

**अनिल सावंत :-**

अधिकाऱ्यांचे ऐकून घेत नाही हॉटेलवाल्यांना पाठीशी घालता किती दुर्देव आहे ह्या शहराचे.

**मा. आयुक्त :-**

अनिल सावंत साहेब आपण एक जबाबदार नगरसेवक आहात. आपण जी.सी.सी. ला पाठीशी घालत आहेत असा विषय कुठे आहे एक उदाहरण म्हणून त्याची चर्चा करतो.

**अनिल सावंत :-**

असे जर प्रकार होत असतील तर त्याची शहानिशा करा.

**मा. आयुक्त :-**

प्रथम मेच सांगितल दिलेली माहिती त्रोटक आहे त्याची डिटेल शहानिशा केली जाईल आणि एक महिन्याच्या आत तुम्हाला पूर्ण आस्थापनावाईज डिटेल खुलासा केला जाईल. कुणाला पाठीशी घालायचा विषय नाही. आपल्याला दिलेली माहिती परिपूर्ण नाही हे मी प्रकर्षाने मान्य करतो.

**अनिल सावंत :-**

मी फक्त दोनच उदाहरण देतो बाकी चर्चा करत नाही. दुसरं एक्सप्रेस इल लॉजिंग त्याला मी ओळखत पण नाही कर्तव्य नाही. निर्णय काय झाला आहे लेखी मत खुलासा कागदपत्र सुनावणी वेळीस सादर केले नाही हे संबंधित व्यक्ती किंवा प्रतिनिधी हजर झालेले नाही. सबब परवाना रद्द करण्यांत येत आहे. हे मला रायटींगमध्ये दिलेले आहे. त्याच्यानंतर मी प्रश्न विचारल्यानंतर उत्तर दुरुस्त करुन दिलेले नाही. मग माझ्याजवळ जो शेवटचे उत्तर आले ते खरं मानणार मी. महासभेमध्ये प्रश्न विचारला जातो सर्व सदस्यांना ती माहिती मिळते आणि तुम्ही म्हणता की काही ही उत्तर असेल म्हणजे आता महासभेमध्ये पण प्रश्न विचारायचा नाही की काहीही माहिती मिळेल आम्हाला. तुम्ही याच्यावर जातीने चौकशी करा. याच्यामध्ये बरेचसे दिलेले आहे की लॉजिंग बोर्डिंगचा उपयोग आहे किंवा कसा तो निर्देश मला कळला पाहिजे. स्टेट गर्व्हमेंटला अभिप्रायसाठी पाठविलेला आहे. म्हणजे महापालिका डिसाईड करणार की स्टेट गर्व्हमेंट डिसाईड करणार लॉजिंग बोर्डिंग.

**मा. आयुक्त :-**

महापालिका त्या इस्ट्रक्शनला परवानगी देते लॉजिंग बोर्डिंगला अधिकृत परवानी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिक्षक यांची असते.

**अनिल सावंत :-**

माझ्याकडे जो निर्णय आलेला आहे त्याच्यामध्ये त्यांनी यु.डी. ला पाठविलेलं आहे. मग यु.डी कशाला डिसाईड करणार लॉजिंग बोर्डिंग.

**मा. आयुक्त :-**

आपण त्याला रेक्टीफाय करुन देऊ.

**गिता जैन :-**

साहेब दिड वर्षा आधी काही थोडेसं असे लॉजिंग बोर्डीग रेस्टॉरन्ट त्यावर आपण कारवाई केलेली आहे. मग आता परत ते जसे होते तसे आहेत. मग त्यांनी परवानगी घेतली. काहीतरी झाले असेल तर तेच तेच तसेच कसे झाले. मी आपल्याला विचारते ज्या ज्या रेस्टॉरन्ट लॉजिंग बोर्डिंगला तोडले होते ते आता परत उभे राहिले आहेत. जसे होते तसेच आहेत मग काय परवानाग्या आपल्याकडून घेतलेल्या आहेत की नविन त्या बांधकामाची परवानगी घेतली आहे.

**मा. आयुक्त :-**

काही ठिकाणी विद्यमान वापर हॉटेलसाठी जिथे लॉजिंग होत्या त्या बंद करुन हॉटेलमध्ये रुपांतरीत केलेले आहेत.

**गिता जैन :-**

मी एक सेन्टेन्स सांगितल जसे होते तसे.

**मा. आयुक्त :-**

आपण पूर्ण बिल्डींग तोडली नाही. त्याचे जे इंटरनल डिव्हीशनल केले होते ते तोडलं होतं.

**गिता जैन :-**

पहिले जे होतं तेच तिथे चाललं आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा विषय आहे तुम्ही विचारा.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

सभागृहात प्रश्न कोणी विचारला आणि दुसऱ्याच्या मनात काही शंका आली तर विचारतो.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, सभागृहामध्ये आपण प्रश्न विचारतो इतर सदस्यांना त्याचे कारणच तेच आहे. त्यांचे काही शंका असतील तर त्याची चर्चा व्हायला पाहिजे.

**धृवकिशोर पाटील :-**

ज्या सदस्याचा प्रश्न असतो त्याच सदस्यांनी प्रश्न विचारला पाहिजे. इतर सदस्यांची गरज नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब मला एक रिमार्क मिळाला आहे. मला फक्त त्याच्यामध्ये जाणून घ्यायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब त्या पत्रावर चर्चा नको. तुम्हाला दिलेली माहिती त्रोटक आहे. त्याच्यात ऑब्जरवेशन केलं जाईल म्हणून मी सांगितलं.

**अनिल सावंत :-**

हा प्रश्न पेंडींग ठेवू का मी.

**मा. आयुक्त :-**

पेंडींग कशाला पुढच्या सभेत घ्या आणि त्याच्यावर चर्चा करा.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्यामध्ये एवढे सांगा मला फक्त त्यामध्ये चर्चा नको म्हणा त्याच्यामध्ये निर्णय दिलेला आहे. मा. सहा. संचालक नगररचना विभागाकडून भोगवटा दाखला व बांधकाम परवानगी तसेच सदर बांधकाम लॉजिंग बोर्डींग याच्यासाठी केले. हे आहे किंवा कसं ह्याबाबत मत घेण्यासाठी सादर याचा काय अर्थ साहेब.

**मा. आयुक्त :-**

ह्या संबंधित करता आले नाही मी सांगतो ते सांगितले पाहिजे होतं. डिटेल तुम्हाला देऊ त्याच्यामध्ये.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम हा प्रश्न पेन्डींग आहे संबंधी महापौर सविस्तर निवेदन नंतर करतील.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला दालनात बोलवून त्या संबंधित चारही विभाग प्रमुखाच्या बैठक घेऊन पूर्ण निरसन करुन त्याची कॉपी सभागृहाला दिली जातील.

**अनिल सावंत :-**

मी सभागृहामध्ये प्रश्न विचारला त्याचे कारणच हे मला माहिती देऊन किंवा कुठलेही अधिकाऱ्याच्या जवळून माहिती घेऊन त्या अधिकाऱ्याचा अपमान करत असेल असे मला अपेक्षितच नाही. ह्या शहरामध्ये जे इललिगल लॉजिंग बोर्डींग आहेत त्याच्यावर आपण कारवाई करणार आहोत किंवा नाही. आज एवढ चांगलं शहर आपण बनवतो सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बनत आहेत. सिल्वर पार्कचा सिग्नल समोर बघा, अर्धवट तोडलेले आहेत. जसे भुतबंगला असतो तसे अर्धवट तोडलेले लॉजिंग बोर्डींग आहेत. बाहेरुन येणाऱ्यांसाठी काय दाखवतो आपण त्याच्यावर कारवाई नको.

**मा. आयुक्त :-**

ह्या लॉजिंग बोर्डींगला नियमानुसार ज्या ज्या बाबी आवश्यक आहेत.

**अनिल सावंत :-**

तुम्ही कारवाई करा आणि ह्या सभागृहाला निवेदीत करा. मला माहिती नाही दिली तरी चालेल.

**मा. आयुक्त :-**

ठीक आहे.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. १६ अनिल सावंत यांचा आहे.

**मा. आयुक्त :-**

आरक्षण क्र. २१४ माहिती विचारली आहे लेखी तुम्हाला दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

ह्याबद्दल मी माहिती विचारली आहे. आरक्षण २१४ बद्दल एक मा. महासभेने ठराव केलेला होता. त्या ठरावाच्या पुढे काय झालं आणि ह्या प्रकरणांवर आपण कोणती कार्यवाही केली.

**मा. आयुक्त :-**

अंतिम कारवाई झालेली नाही. आपल्याला लेखी दिलेले आहे आणि ते विभाग टाऊन प्लानिंग स्तारावर स्क्रुटीनी चालू आहे. त्याची पूर्ण अंमलबजावणी झालेली नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याठिकाणी महासभेमध्ये जो ठराव झालेला होता. त्याच्यावर कारवाई टाऊन प्लानिंग करणार आहे की तो प्रस्ताव तुम्ही यु.डी.ला पाठवणार आहात की कस काय? त्यावेळी ठराव झालेला होता. अतिरिक्त जागा अदलाबदल करणे.

**मा. आयुक्त :-**

ते महापालिकेचेच अधिकार आहेत. यु.डी. ला जाण्याचा विषय नाही. हे समजून घेतलं पाहिजे होतं. काय तुम्ही तो विषय न समजून घेता वेगळी चर्चा होते मग मी त्याला उत्तर देऊ शकत नाही. एखादे आरक्षण आहे ५० टक्क्यापेक्षा जास्त जर ते आरक्षण एखाद्या व्यक्तीकडे आला असेल तर त्याला विकसित करण्याचे राईट्स आता शासन घेतलेलं आहे. वेळोवेळी हे १९७६ पासूनचे आरक्षण आहेत. पूर्णपणे विकसित झालेले नाहीत तर ज्याच्यासाठी ती जमिन राखीव आहे त्या कारणासाठी ते विकसित झाले पाहिजे. वेगवेगळ्या माध्यमातून टी.डी.आर च्या माध्यमातून आहेत, समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून आहेत, जागा अदलाबदलच्या माध्यमातून आहे मायोवजा देवून ती जागा आपल्या ताब्यात घेऊन करण्याची आहे किंवा स्थानिक लोकांकडून ते पार्टीसिपेशनच्या माध्यमातून विकसित करण्याचे आहे. ह्या वेगवेगळ्या आडीवाहून आरक्षण विकसित केले पाहिजे. त्यामध्ये जर एखाद्या विकासकाकडे ५० टक्क्यापेक्षा जास्त जागा असेल तो काय आपल्याला देणार नाही. मग आपली आलेली जागा ही अर्धवट पडून राहणार मग त्यामध्ये मार्केटचा मायोवजा घेऊन त्या विकासकाला आपण प्रोत्साहित केला आणि त्यांनी ते आरक्षण विकसित केलं. समजा ग्राऊंड आणि बगीचा असेल पहिले त्यांनी आपल्या मालकीची जागा घेताना मार्केटचे पैसे द्यावे लागणार आहेत. एखादे पूर्ण हे रेकॉर्डकडे आल्यानंतर त्यांनी विकासाला टाकल्यानंतर ग्राऊंड आणि बगीचामध्ये ७० टक्के ती जागा परत आपल्या नावे करुन द्यावी लागणार आहे. विकसित करुन राहिल्या ३० टक्क्यामध्ये विकसित करु शकणार आहे हे समजून घेतले पाहिजे. एक धोरण केलेले आहे आता ते तपासण्यासाठी विभागाकडे गेलेलं आहे. संबंधित विकासक त्याला तर परवडलं पाहिजे. आपली जागा जितकी आहे त्याची त्यांनी ओपन मार्केटचे पैसे द्यावे लागणार आहेत. मग त्या शंभर टक्क्याच्या बदल्यात त्यांनी ७० टक्के बगीचा किंवा मैदान आम्हाला विकसित करुन दिला पाहिजे नावाने मग राहिलेल्या ३० टक्क्यामध्ये त्याला तिथे डेव्हलपमेंट करता येतो. मला सांगा जागा आपल्या ताब्यात घ्यायला त्याचे पैसे ते खूप मोठ्या प्रमाणात जाणार आहेत. जागा विकसित करण्यासाठी पैसे परत ते विकसित केलेले आपल्या याच्यात फ्री ऑफ कॉस्ट त्यांना द्यावे लागणार आहे. ७० टक्के काही याच्यामध्ये ५० रुपये टक्के आहेत तर ह्या बाबतीत सर्वच विकासक पुढे येतील याची गॅरंटी नाही. जरी निर्णय झाला तरी ॲक्च्युअल इम्पलीमेटेशन जसा होईल त्याची माहिती सभागृहाला दिली जाईल.

**अनिल सावंत :-**

साहेब जर विकासक पुढे आले तुम्ही म्हणता की, विकासक पुढे येत नाही जसे नाही. मग ह्याच महासभेमध्ये ह्या विषयावर दोन विषय आले नसते. विकासक जर आले नसते तर हे आले नसते. मला एकच म्हणायचे आहे की ह्या प्रस्तावाला राज्य शासनाची मंजूरीची गरज आहे की महापालिकेची लेव्हलवर निर्णय घेणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

आरक्षण विकसित करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे आणि व्हेरी ट्रान्सपरन्सी त्याच्यात कुठलाही किंतु, परंतु न राहता सगळा एकमताने आणि ओपन मार्केटच्या रुलप्रमाणे जर विकसित होत असेल तर ते आपल्यालाच अधिकार आहेत. राज्य शासनाच्या ह्याच्यात काही विषय नाही.

**अनिल सावंत :-**

राज्य शासनाकडे जायची गरज नाही. साहेब त्या ठिकाणी ज्या ठरावाच्या अनुषंगाने हे २१४ आरक्षणाच्या त्या ठरावामध्येच उल्लेख होता. त्यावेळी आपण जर त्याच्या प्रोसेडिंग काढल्या तर त्यावेळी आपण म्हटलं होतं.

**मा. आयुक्त :-**

हा ठराव झाल्यानंतर त्यावेळेस माझी धारणा तीच होती. ठाणेमध्ये ह्याची अंमलबजावणी चालू झाली त्यांचे सहा प्लॉट त्यांनी विकसित केलेत.

**अनिल सावंत :-**

साहेब ठाणे म्हणजे रोल मॉडल आहे ठाणेमध्ये केवढे भ्रष्टाचार आहेत.

**मा. आयुक्त :-**

असं नाही म्हणता येत मला शंका होती की याच्यामध्ये काही अडचणी येऊ नये मग मी प्रधान सचिवांशी याच्यामध्ये हा ठराव झाल्यानंतर जाऊन चर्चा केली ते म्हणाले पूर्णपणे अधिकार तुमचे महासभेचे आहेत. त्यामुळे राज्यशासनाचा ह्यामध्ये विषय नाही.

**अनिल सावंत :-**

त्या ठरावामध्ये उल्लेख होता की महासभा अटीशर्ती ठरवणार आहे. त्या ठरावामध्ये उल्लेख होता तसा.

**मा. आयुक्त :-**

विषयापुरतेच राहणार त्या त्या वेळेस सभागृहाने घेतलेले निर्णयाप्रमाणे राहणार असे नाही होऊ शकत सर्वांना कॉमन.

**अनिल सावंत :-**

साहेब समावेशक आरक्षणामध्ये जे आहे ते सर्वांना कॉमनच राहणार.

**मा. आयुक्त :-**

समावेशक आरक्षणांचे सर्व अधिकार एम.आर.टी.पी चे आहेत.

**अनिल सावंत :-**

एखाद्या आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घ्यायला महासभेसमोर ठेवा हे बरोबर आहे. पण त्याच्यामध्ये रोल मॉडल किंवा धोरण तुम्ही ठरवले आहे तो कॉमनच राहणार ना.

**मा. आयुक्त :-**

हा तो कॉमन राहणार.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये असं आहे की तुम्ही म्हणता की विकासक कोणी तयार होईल किंवा नाही परत जो तो ७० टक्के बांधून देणार आहे त्या बांधकामाचा टी.डी.आर पण तुम्ही त्याला देणार आहात. परत ती ७० टक्के जागा आपल्याकडे राहील की नाही.

**मा. आयुक्त :-**

आपल्या टायटलने................

**अनिल सावंत :-**

सगळे टायटलमध्ये आहे मॅक्सेस मॉलचे आपण बघितलं ते सुप्रिम कोर्टापर्यंत जावं लागलं.

**मा. आयुक्त :-**

आपणच ठराव करुन त्याला परत दिलं. सदरची जागा आपल्या नावाची ओ.सी. आपणच त्याची निविदा काढून ठराव करुन दिला. त्याच्या पिरियडपर्यंत तर त्याच्यात वाद आला.

**अनिल सावंत :-**

साहेब ठराव सर्वानुमते नव्हता हे एकदा आपण लक्षात घ्या. त्या ठरावाला मतदान झालं होतं.

**मा. आयुक्त :-**

मा. उच्च न्यायालयमध्ये ती केस चालू आहे.

**अनिल सावंत :-**

शहरातली सर्व आरक्षण तुम्ही विकायला काढली तरी सुध्दा आमचा विरोध असणारच. कारण डी.पी. जो बनला आहे तो शहराचा हित लक्षात ठेवून बनलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

आरक्षण हा विषयच नाही हा कोणाचा अधिकार नाही. आरक्षण विकसित करणे हा विषय आहे.

**अनिल सावंत :-**

विकसित केल्यानंतर सुध्दा ते ताब्यात यायला पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

ती जमीन जर आपल्या ताब्यात असेल तरच आपल्या ताब्यात असते. एखादे आरक्षण तुमच्या मालकीचे तर तुम्ही विकसित करु शकत नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब जे तुमच्या ताब्यामध्ये आलेले आहे त्याचा फिगर ऑलरेडी दिलेले आहे तुम्ही.

**मा. आयुक्त :-**

ते आले परत तर चर्चा करु.

**अनिल सावंत :-**

ताब्यात आलेले हे त्याच्यावरच विषय आहे २१४ चा विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

तो पुढे आहे ना.

**अनिल सावंत :-**

आता हाच आहे दोन्ही विषय वेगळे आहेत. माझे आपल्याला म्हणणे एवढेच आहे आता तुम्ही त्याच्यावर निर्णयच घेतलेला नाही. टाऊन प्लानिंगमध्ये पेंडींग आहे त्यामुळे तुमचा निर्णय झाल्यानंतर मला त्याचे उत्तर मिळेल. त्या अनुषंगानेच माझा प्रश्न आहे. हा प्रश्न सुध्दा शेवटी पेंडींग राहिला.

**मा. आयुक्त :-**

जो निर्णय होईल तो आपल्याला कळविला जाईल.

**अनिल सावंत :-**

त्या अनुषंगानेच माझा प्रश्नाचा निर्णयाच्या आधारावर.

**मा. आयुक्त :-**

पूर्ण कारवाई झाली नाही तर आता निर्णय कसा दिला जाईल.

**अनिल सावंत :-**

साहेब आपला ठराव झालेला आहे ५ सप्टेंबर २०१८ आज आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये एक वर्षभर आपण ह्या बाबतीत आपण निर्णय घेऊ शकलो नाही त्या २१४ चा ठराव होऊन सुध्दा

**मा. आयुक्त :-**

तो प्रोसेसमध्ये आहे त्याचा निधी घेणं त्याच्याकडून पैसे घेणे आपण त्याला टायटल करणे ह्या सगळ्या प्रोसेसमध्ये आहेत. त्याची डिटेल माहिती आपल्याला देऊ शकू आम्ही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे अशा आरक्षणाच्या ताब्यात घ्यायला वर्षवर्ष वेळ लागणार असे म्हणायला हरकत नाही. मग तोपर्यंत आपल्या ताब्यात जे आरक्षण आहेत ती जागा ही ती तरी पालिकेच्या ताब्यात आहे की नाही.

**मा. आयुक्त :-**

पालिकेच्याच ताब्यात राहणार ती कसे दुसऱ्याच्या ताब्यात जाईल.

**अनिल सावंत :-**

साहेब ह्याचे मला तुम्ही निर्णय घ्याल त्यावेळी सविस्तर उत्तर द्या.

**मा. आयुक्त :-**

पूर्ण सभागृहाला दिले जाईल आणि आपल्याला ही दिले जाईल. ह्यामध्ये एकूण १९ विषय आहेत. शाळा कसे डेव्हलप करायची मैदाने कसे डेव्हलप करायची.

**अनिल सावंत :-**

तुमचे उद्दिष्ट एकदम चांगल आहे पण उद्या तुम्ही एका वर्षानंतर गेल्यानंतर काय?

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाच्या ह्याच्यात काम करताना.

**अनिल सावंत :-**

राज्य शासनाने बरोबर ढिंडोरे काढले. ह्या शहराचे परत निर्णय सांगेल मी राज्य शासनाचे ह्या शहराला वाऱ्यावर सोडले राज्यशासनाने......

**मा. आयुक्त :-**

महापौर मॅडम, उपमहापौर ह्या सभागृहाला सांगू इच्छितो माझ्या तीस वर्षाच्या काळात एक सिंगल लांच्छन लागेल असे आपण काम भविष्यात सुध्दा करणार नाही जे होईल ते शहराच्या हितासाठी होईल.

**अनिल सावंत :-**

तुम्ही गेल्यानंतर काय?

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

भारताचे पंतप्रधान आदणीय नरेंद्र मोदीजी त्यांनी ऐतिहासिक पराक्रमी आणि जीगरबाज निर्णय घेतलेला आहे. मिशन काश्मीर फत्ते ३७० कलम हटवले आहे. महापौर मॅडम आपल्या संविधान असलेले ३७० वादग्रस्त कलम आणि राज्याचे गृहमंत्री मा. अमितजी शहा यांनी जम्मु कश्मिरचे रिऑर्गनायझेशन बील राज्यसभेमध्ये मांडले आणि ते मंजूर ही केले. त्यांचे राष्ट्रपती साहेबांनी अधिसुचना काढली आणि ती पण शिक्कामोर्तब केली आणि असा एक चांगले धडाकेबाज आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आपल्या हिंदुस्थानाच्या म्हणजे सुवर्ण अक्षरामध्ये असे लिहिला जाणारा असा जो विक्रम आहे त्याच्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे एक क्रमप्राप्त आहे म्हणून मी अभिनंदन ठराव मांडत आहे. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी सरकारने काश्मिरमधून ३७० कलम हद्दपार करुन एतिहासिक आणि पराक्रमी निर्णय घेतला.मा. गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत कलम ३७० हटविण्याचा संकल्प मांडला आणि त्यावर मा. राष्ट्रपतींची मोहोर उमटून अधिसुचनाही निघाली. राज्यसभेत पुर्नरचना विधेयक १२५ विरुध्द ६१ या मताने मंजूर झाले आणि कलम ३७० रद्द झाले. काश्मिर बंधमुक्त होताच देशभरात, मुंबईसह देशाच्या अनेक शहरात फटाके, ढोलताशे वाजवून व पेढे वाटून देशवासियांनी आनंदोत्सव साजरा करण्यात आला. काश्मिरला ३७० कलमाच्या कचाट्यातून मुक्त करणारे भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व गृहमंत्री मा. श्री. अमित शाह यांच्यावर देशवासियांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. श्री. नरेंद्र मोदी सरकाने घेतलेल्या एतिहासिक आणि पराक्रमी निर्णयाचे ही सभा स्वागत करीत असून तसार अभिनंदन ठराव मी मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**अशरफ शेख :-**

महापौर मॅडम मला ह्या विषयावर थोडे बोलायचे आहे धृवकिशोर पाटीलने आता जो ठराव मांडलेला आहे ह्या विषयावर मला बोलायचे आहे मी पण शुभेच्छा व्यक्त करतो. जे स्टेट होल्डर आहेत त्यांना न विचारता जे कलम ३७० रद्द केले त्याबद्दल त्यांचे फार फार शुभेच्छा.

**अभिनंदन ठराव क्र. ३८ :-**

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी सरकारने काश्मिरमधून ३७० कलम हद्दपार करुन एतिहासिक आणि पराक्रमी निर्णय घेतला.

मा. गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत कलम ३७० हटविण्याचा संकल्प मांडला आणि त्यावर मा. राष्ट्रपतींची मोहोर उमटून अधिसुचनाही निघाली. राज्यसभेत पुर्नरचना विधेयक १२५ विरुध्द ६१ या मताने मंजूर झाले आणि कलम ३७० रद्द झाले.

काश्मिर बंधमुक्त होताच देशभरात, मुंबईसह देशाच्या अनेक शहरात फटाके, ढोलताशे वाजवून व पेढे वाटून देशवासियांनी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

काश्मिरला ३७० कलमाच्या कचाट्यातून मुक्त करणारे भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व गृहमंत्री मा. श्री. अमित शाह यांच्यावर देशवासियांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

श्री. नरेंद्र मोदी सरकाने घेतलेल्या एतिहासिक आणि पराक्रमी निर्णयाचे ही सभा स्वागत करीत असून तसार अभिनंदन ठराव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभात पाटील :-**

एक गोष्ट ह्या सभागृहामध्ये मला नमुद करावी असे वाटते म्हणून मी बोलते अभिनंदन न म्हणता मी त्यांना सॅल्युट करेन मला ह्या संदर्भामध्ये बोलायचे आहे उद्या १५ ऑगस्ट आहे आणि गेल्या वर्षी मला वाटते ६ ऑगस्टला आपल्या मिरा भाईंदरने एक भारताचा सुपुत्र गमावला. सिमेवर लढताना कौस्तुभ राणे त्यांचे आपण उद्या स्मारकाचे पण उद्‌घाटन करत आहोत. शहरासाठी ही एक अभिमानाची गोष्ट आहे. परंतु त्याच्याही पलीकडे जाऊन तुम्हाला सगळ्यांना एक गोष्ट माहित आहे की मला ह्या ठिकाणी नमुद करावीशी वाटते त्या कौस्तुभ राणेंच्या विरपत्नीने आलेल्या आपत्तीने खचुन न जाता एक वर्षाच्या लहान मुलाची जबाबदारी घेताना परंतु तितकीच देशभक्तीची जाज्वल भावना आपल्या मनात रुजवत आपल्या पतीला मरणोत्तर साथ देण्यासाठी त्या विरपत्नीने पुन्हा सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला आणि तसा तिने तो यशस्वीही केला. मी तिचे अभिनंदन करणार नाही कारण तिच्यासाठी अभिनंदन हा खूप छोटा शब्द आहे. त्यासाठी मी ह्या सभागृहात समस्त महिला वर्गातर्फे तिला सॅल्युट करते.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांचा ठराव करुन पाठविले पाहिजे.

**अभिनंदन ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर शहराचे सुपुत्र मेजर कौस्तुभ राणे ह्यांना सिमेवर शत्रुंशी दोन हात करताना वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या पश्चात त्यांची वीरपत्नी, एक वर्षाचा मुलगा व आई-वडील होते.

पतीच्या वीरमरणाने खचून न जाता एक वर्षाच्या मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी घेवून, आपल्या शुरवीर पतीची अपूरी राहिलेली देशसेवा पुढे नेण्याचा निर्धार करुन त्या वीरपत्नीने सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला आणि तशी तयारीही केली आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या.

शहीद कौस्तुभ राणे ह्यांच्या शुरपत्नी, वीरपत्नी कनिका राणे ह्यांच्या ह्या निर्णयाचे, धाडसाचे करावे तितके कौतुक कमी आहे.

त्यांचे अभिनंदन करावे हा खुपच लहान शब्द आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्वपक्षिय नगरसेविकांतर्फे त्यांना सॅल्युट.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील                    अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३३, **दि. ०२/०३/२०१९ व दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, वारंवार तुम्ही प्रशासनाला सुचना केलेली आहे. अनुपालन अहवाल आम्ही २०-२०, २५-२५ विषयांवर निर्णय घेतो. प्रत्येक सभागृहामध्ये प्रशासनाने त्यांची काही भुमिका घेतली नाही. पुढच्या महासभेत अनुपालन अहवाल देण्यात यावा ही लोकशाही आहे.

**अनिल सावंत :-**

ह्या महासभेमध्ये एक निर्णय झाला होता ७.६.२०१९ घनकचरा कर चालू वर्षास सूट देणे पुढील आर्थिक वर्षात आकारणी करणेबाबत त्यानंतर आपण गटनेत्यांची पदाधिका-यांची व आयुक्त यांनी आयोजित करुन निर्णय घ्यावा बैठक घ्यावी. निर्णय घ्यावा असा आपण निर्णय घेतला. त्यानंतर काय झाले निर्णय काय आहे लोक आता विचारत आहेत. पैसे भरायचे काहींनी भरलेले आहेत काहींनी भरलेले नाहीत. तुम्ही काय निर्णय घेतला ते आम्हाला कळू द्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मी याचा खुलासा करतो राज्य शासनाने याची उपविधी तयार करुन सजेशन ऑब्जेक्शन मागविले होते आणि त्यांचे जे फी आहेत ते अंतिम झाले नव्हते. तत्पूर्वी मिरा भाईंदर महापालिकेने ह्या फी आकारणीचा ठराव केला होता. मी नुकताच जॉईंट झाल्यानंतर त्याची मी

अंमलबजावणी केली होती. कारण मला माहित आहे विरोधी पक्ष अनुपालनाचे फार आग्रह धरतात. लगेच आम्ही त्याची अंमलबजावणी केली होती.

**जुबेर इनामदार :-**

पत्राचे उत्तर देत नाही म्हणून अनुपालन सभागृहामध्ये तरी द्या.

**मा. आयुक्त :-**

शहाराच्या भल्यासाठी आहे ते केले ना.

**अनिल सावंत :-**

साहेब निर्णय सांगा.

**मा. आयुक्त :-**

तर ते दर खुप जास्तीचे होते. शहरामधून त्याच्यावर खूप मोठी प्रतिक्रीया आली. राज्य शासनाने प्रस्तावित दर हे कमी होते. एक वर्षामध्ये काही लोकांनी पैसे भरले काही लोकांनी पैसे भरले नाही. नंतर हा विषय महासभेत पुन्हा चर्चा झाली गटनेत्यामध्ये याच्यावर चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा आणि त्यांची अंमलबजावणी काय होते ती सभागृहाला सांगावे असे त्यामध्ये होते आणि तो मुद्दा सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी मांडला आहे. गटनेत्यांच्या बैठकीत चर्चा होऊन राज्य शासनाचे दर अंतिम होईपर्यंत आपण जे दर ठरविलेले आहेत ते ५० टक्के करावेत. गेल्यावर्षी ज्यांनी पैसे भरलेले आहेत त्याला ह्या वर्षी डिमांड जाण्याची गरज नाही.

**जुबेर इनामदार :-**

बैठक झालीच नाही. साहेब मी गटनेता आहे.

**मा. आयुक्त :-**

बैठक झालेली आहे. त्या दिवशी तुम्ही नव्हता.

**मा. महापौर :-**

आपण नव्हते.

**मा. उपमहापौर :-**

मिटींग झालेली आहे तुम्ही नव्हता.

**अनिल सावंत :-**

साहेब निर्णय बोला.

**मा. आयुक्त :-**

हा ५० टक्के जो निर्णय झाला होता आणि गेल्या वर्षी लावले त्याच्यात ५० टक्के करायचे. महासभेत पण तशी चर्चा झाली होती. वास्तविक हे ५० टक्केची मी अंमलबजावणी केली नाही. नुकत्याच दरम्यानच्या काळामध्ये राज्य शासनाचे दर अंतिम झाले आणि राज्य शासनाने त्याच्यामध्ये लिहून दिलेले आहेत. पूर्ण राज्याला आता दुबार हे महासभेत घेऊन जाण्याची गरज नाही. राज्य शासनाचे दर सर्वांनी सरसकट अंमलबजावणी करावी असे त्याच्यात निर्देश असल्यामुळे आपला जो विषय होता तो आम्ही लॅप्स केला आणि आम्ही आता राज्य शासनाचे दर लागु केलेले आहेत. आपले दर रद्द केलेले आहेत. ज्या लोकांनी जास्तीचे पैसे भरलेले आहेत त्यांचे पैसे पुढच्या कालावधीत ॲडजस्ट केले जाणार आहेत.

**अनिल सावंत :-**

त्यांना गेल्या वर्षाची रिव्हाईज बिल तुम्ही पाठवणार आहेत का?

**मा. आयुक्त :-**

नाही. आता राज्य शासनाच्या बिलाप्रमाणे बिले पाठविली जातील.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब आपण त्याच्यात एक नमुद केले होते. बिल जे आहे ते डब्बल नाही पाठवायचे.

**मा. आयुक्त :-**

ते सिंगल बिलातच ते पाठविले जाईल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रॉपर्टी टॅक्समध्येच आपल्याला घ्यायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

हो पाठविले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा विषय प्रशासनापर्यंत का सिमित आहे? हा विषय प्रशासनापर्यंतच फक्त सिमित राहीलेला आहे. सदस्यांना अधिसुचना आलेल्या दिलेच जात नाही.

**मा. आयुक्त :-**

म्हणून मी सावंत साहेबांचे अभिनंदन केले चांगाला प्रश्न मांडला म्हणून.

**जुबेर इनामदार :-**

साहेब वन टाईममध्ये उल्लेख केला जातो. शासनाकडच्या पत्राचे मी वारंवार बोलत आलो.

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाच्या निर्णयाची कॉपी ही सभा संपल्याच्या पूर्वी सर्व सदस्यांना दिली जाईल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय परत मी एकदा विनंती करतो. महापौर मॅडम आपल्या समक्ष शासनाकडून आलेले परिपत्र, अधिसुचना प्रत्येक विभागाने सचिवांकडे पाठविली पाहिजे. सचिवांनी प्रत्येक महासभेमध्ये सदस्यांना दिली पाहिजे. ही प्रथा आधी होती. ती दिली जात नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याच्या कॉपी सदस्यांना दिल्या जातील.

**गिता जैन :-**

साहेब एवढा महत्वाचा निर्णय झाला सर्व लोकप्रतिनिधींना ते माहित असावे. कारण माणसे आमच्याकडे विचारायला येतात आम्ही त्यांना काय जवाब द्यायचा. म्हणजे दरवेळी सॉरी सांगुन चालत नाही. एकतर आपण चुकी पण करतो आम्हाला तुम्ही निर्णय दिला ते ही तुम्ही देत नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही चूकी करत नाही. तुम्ही जे निर्णय घेतात त्याची अंमलबजावणी करतो.

**गिता जैन :-**

तुम्ही गटनेत्यांच्या मिटींगमध्ये किंवा राज्यपत्र आले म्हणून आपण परत रिव्हाईज केले तशी काही सुचना कुठल्याही पेपरला नाही. कुठल्याही माध्यमातंना दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

पेपरला दिलेली आहे आणि ज्यावेळी लोकांना बिले येतील तर लोकांचा रोश संपलेला असेल. शासनाचेच बिले राहतील.

**गिता जैन :-**

साहेब मला असे वाटते की तुम्ही महासभेत ते घोषित करावे.

**मा. आयुक्त :-**

शासनाने सांगितले तो विषय महासभेत घेऊन जाण्याची गरज नाही म्हणून आम्ही तो आणला नाही. तुमच्या गटनेत्यांनी ते सांगितले पाहिजे होते.

**मदन सिंह :-**

**दि. ०२/०३/२०१९ व दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतमध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे**

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

आयुक्त साहेब मला एक माहिती पाहिजे होती. लोकांना हे टेन्शन आहे की तुम्ही जी परत बिल पाठवणार ज्यांनी कचऱ्याचा टॅक्स भरला नाही ते तुम्ही इंट्रेस्ट लावून पाठवणार किंवा विदाऊट इंट्रेस्ट लावून पाठवणार?

**मा. आयुक्त :-**

इंट्रेस्ट वगैरे काही नाही.

**मर्लिन डिसा :-**

त्याच्यात खाली वॉर्निंग दिलेली आहे. काही लोकांना खूप टेन्शन येते.

**मा. आयुक्त :-**

इंट्रेस्ट वगैरे काही नाही. ह्या वर्षात जो कालावधी निघून गेलेला आहे ते महिने सुध्दा आम्ही लावणार नाही. ज्या तारखेला त्याची इम्प्लीमिटेशन डेट आहे त्या तारखेपासून सरळ बिल राहील. आणि याच्यापूर्वी भरलेले पैसे त्याच्यात ॲडजस्ट केले जातील.

**निलम ढवण :-**

आयुक्त साहेब जे गटनेत्यांच्या मिटींगमध्ये असु देत किंवा आपल्यातर्फे किंवा महाराष्ट्र शासनातर्फे जे तुम्हाला काही सुचना येतात किंवा त्यानुसार आपण जे नागरिकांवरती किंवा ज्या गोष्टी तुम्ही अंमलबजावणी करत असतात आपल्याला विनंती आहे की मागच्या वेळेस पण असेच सांगितले होते की त्याची एक प्रत जर सर्व सन्मा. सदस्यांना दिली त्याची माहिती सर्व सदस्यांना मिळू शकेल. कारण ते जर तुम्हाला महासभेत आणायचे नसेल जे काही असेल त्यात प्रत्येक अंमलबजावणी करायची असेल. तर त्या गोष्टीची माहिती सन्मा. सदस्यांना ती मिळू शकेल. त्यामुळे ते पत्रक आपण कृपया एक एक कॉपी सर्व सन्मा. नगरसेवकांना देण्यात यावी ही विनंती. धन्यवाद.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आयुक्त साहेब इतिवृत्तांत आता मंजूर झालेले आहे. आपण ७.६.२०१९ ला जी महासभा झाली सभागृहात एवढा गोंधळ होता. व्होकार्ड हॉस्पीटल घेऊन त्यादिवशी दोन वेळा आम्हाला सभागृहात सांगण्यात आले की त्याठिकाणी बोर्ड लावण्यात येईल. अनुपालन अहवाल तर आम्हाला मिळत नाही. पण तो बोर्ड लावण्यात येईल असे सांगितले होते. आम्ही पण लोकांना त्या हिशोबाने सांगितले आहे. तर आजमितीस बोर्ड लागलेला नाही. बोर्ड कधी लागणार हे आयुक्तांनी सांगावे. त्या दिवशी त्या विषयावर दिड दोन तास चर्चा केली. म्हणजे ठराव करायचे मग त्याचे इमप्लीमेंटेशन होत नाही तर मग सभागृहामध्ये ठराव काय करायचे.

**मा. महापौर :-**

आपण नंतर आयुक्त साहेबांना विचारु पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३३ :-**

**दि. ०२/०३/२०१९ व दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ४० :-**

**दि. ०२/०३/२०१९ व दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतमध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे**

**सुचक :- श्री. मदन सिंग अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३४, **मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहक यांचे वेतनात वाढ करणेबाबत.**

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम याच्यात माझी एक सुचना आहे. याच्यामध्ये बालवाडी शिक्षिका ४ आहेत टोटल ७ होते. ७ मधले ३ रिटायर्ड झालेले आहेत. टोटल जे ४ आहेत त्यांना पण समाविष्ठ करुन घ्यावे. कारण त्याच्यात एका मुलीचे वय कमी पडत होते. तेव्हा त्याला बाकी आपण ठेवली होती.

**प्रभात पाटील :-**

माझा मुद्दा असा आहे ह्या विषयावर माझ्याकडे ठराव आहे तो ठराव मी वाचते. याच्या अगोदर मला एक गोष्ट तुम्हाला सागायची आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शिक्षण विभागाअंतर्गत महापालिकेच्या २६ बालवाड्या सुरु आहेत आणि त्या बालवाड्यांमध्ये ज्या शिक्षिका काम करत आहेत. त्या आता परमनन्टली काम करत आहेत. ह्यामध्ये असे झाले की त्या बालवाड्यांमध्ये ह्याच्यात ४ शिक्षिका होत्या. एकूण ७ शिक्षिका त्यांना वगळले गेले. त्यातल्या ४ शिक्षिका ह्या शिक्षिका संपूर्ण परमनन्ट झाल्या. त्या आज बालवाड्या पण करतात आणि पालिकेमध्ये पण येऊन दुपारनंतर काम करतात. त्या तुमच्या आस्थापनेवर आल्या पण यातल्या ४ शिक्षिका.

**मा. आयुक्त :-**

त्यांची नावे आपल्याकडे आहेत का?

**रिटा शहा :-**

साहेब माझ्याकडे नावे आहेत. प्रभात मॅडम पहिला मेरी एक कम्पलेंट है।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना विनंती आहे आपआपसात बोलू नये.

**रिटा शहा :-**

मॅडम इनको बिच में खडा किया यह गलत बात है जब मैं खडी हूँ में बोल रही हूँ।

**मा. महापौर :-**

उनका और आपका सेम विषय है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

वही विषय पे चर्चा होनी चाहिए। वही विषय पे मैं आपको उत्तर दुंगी।

**रिटा शहा :-**

मैं खडी हुई ना मैं उस विषय पे बात कर रही हूँ।

**मा. महापौर :-**

लेकिन वही सेम विषय है।

**रिटा शहा :-**

लेकिन मैं वही विषय पे बात कर रही थी।

**मा. महापौर :-**

हा रिटाजी लेकिन उनका भी विषय वही है ना। विषय सेम है।

**रिटा शहा :-**

पहला मेरा पुरा होने दिजीए ना।

**मा. महापौर :-**

ठिक है यह विषय हम अगली महासभा में रितसर गोषवारे के साथ लेंगे तभी उसपर निर्णय लेंगे। अभी आप ठराव पढीए।

**प्रभात पाटील :-**

त्यांना आता आपण ११ हजार देत आहोत. त्यांना ठिक आहे. आपण आस्थापनेवर नाही घेणार पण त्यांचे कमीत कमी मानधनामध्ये तरी वाढ करण्यात यावी. तर तो विषय पूढच्या वेळेला ह्या एवढेच मी बोलते आणि आजचा जो विषय आहे त्याचा मी ठराव मांडते. **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत 06 काळजीवाहक नेमण्यात आले होते ते मार्च 2015 पर्यंत कार्यरत होते . परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.08/04/2015 रोजीच्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये अशा स्पष्ट् सुचना देण्यात आल्या की,कार्यरत काळजीवाहक यांच्या मानधनाची रक्कम् शासनाकडुन सन 2015-16 साठी मंजुर करण्यात आली नाही.**

**त्याअनुषंगाने शिक्षण विभागामार्फत त्यांच्या कार्यालयात दि.13/04/2015 रोजी बैठक घेण्यात आली व काळजीवाहक यांना कार्यमुक्त् करण्याच्या तोंडी सुचना देण्यात आल्या होत्या तथापि मा . आयुक्त् सो. यांचेकडुन सदर कार्यरत खालील काळजीवाहकांना मुदतवाढ देणे व त्याचे मानधन हे समाजविकास विभाग "अंध व अपंग कल्याण योजना " अंतर्गत अदा करण्याचे तोंडी नि र्देश प्राप्त् झाले होते . त्यानुसार खालील 06 काळजीवाहकांना मा. महासभा दि.04/12/2015 प्रकरण क्रं.116 ठराव क्रं.87 नुसार रु.4000/- मानधन देण्यात आले होते.**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक |
| 2 | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक |
| 3 | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक |
| 4 | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक |
| 5 | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक |
| 6 | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक |

**काळजीवाहकांना मानधन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy/शिक्षणासाठी आर्थिक मदत " या लेखाशिर्षातुन करण्यात यावी सासाठी मा. महासभा दि.12/08/2016 प्रकरण 40, ठराव क्रं.39 अन्वये काळजीवाहकांचे वेतन रु.6000/- करण्यात आले.**

**संदर्भिय मा. महापौर सो. यांच्या पत्रान्वये सदर काळजीवाहकांचे मानधन वाढविण्याबाबत कळविलेले आहे. "मतिमंद मुलांसाठी शाळा /सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहकांचे मानधन " या लेखाशिर्षा अंतर्गत सन 2019-20 या अर्थसंकल्पात रु.20 लाख (रु. वीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने काळजीवाहक यांना 1 एप्रिल पासुन पुढे मुदतवाढ देणे व सदर लेखाशिर्षातुन एप्रिल 2019 पासुन काळजीवाहकांचे मानधन रु.8000/- प्रती महिना अदा करणेबाबतचा प्रस्ताव ही मा. महासभा मंजुर करीत आहे तसेच वरील 6 काळजी वाहक शिक्षकांव्यतिरीक्त कोणताही कर्मचाऱ्यास वेतन वाढ देवू नये असा मी ठराव मांडत आहे.**

**दिपाली मोकाशी :-**

माझे अनुमोदन आहे.

**रिटा शहा :-**

ह्या ठरावाला मी निष्पक्ष आहे साहेब कारण जेव्हा पण असा कुठलाही ठराव असतो त्याचे पूर्ण मिरा भाईंदर महापालिकेमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी, शिक्षकाचे विशेष सर्व लोकांचा विचार करुन ठराव तुम्ही मागायला पाहिजे होता. त्याच्यामध्ये ४ महिलांना डावलले म्हणून त्या महिलातर्फे मी विरोध करते आणि ह्या ठरावाबद्दल मी निष्पक्ष राहते.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम साहेब ते आपले ७ टिचर्स तिथुन सोडून आलेले. बाकीच्यांचा विषय मी बोलत नाही. पण तिथून सोडून आलेले त्यांचा पगार कुठूनही होत नाही तो विषय मी तुम्हाला सांगितला होता त्याचे काय केले तेही सांगा.

**मा. आयुक्त :-**

संबंधित जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारीकडे त्याची वस्तुस्थिती पाठवली. आमच्या महासभेने त्याचा ठराव अमान्य केलेला आहे. त्यांचे आपल्या स्तरावर पदस्थापना करावी म्हणून त्यांना प्रस्ताव पाठवला.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम मी एक वर्षभरापासून बोलते. मुर्ध्याला जी शाळा आहे शाळा क्र. २२ आणि २३ मध्ये जे शिक्षक आहेत ते अक्षरशः दारु पिऊन येतात. शिवाय मुलांना एवढे मारतात की, त्यांचे पालक पोलिस स्टेशनपर्यंत गेले. मी असे सांगितले कम से कम यांच्यावर कारवाई जर होत नसेल तर यांच्या बदल्या तरी करा. त्यांच्या बदल्या पण होत नाही. आयुक्त साहेब त्यादिवशी मी तुम्हाला पण सांगितले.

**मा. आयुक्त :-**

शिक्षणाधिकाऱ्याला मी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. तात्काळ त्याच्यावर निर्णय घेतला जाईल.

**नयना म्हात्रे :-**

ठिक आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम आताच बालवाडीचा जो विषय झाला तो तुम्ही म्हणालात पुढच्या महासभेत घेणार आहेत. त्याच्यात फक्त मी ॲडिशनल टाकते की २०-२० वर्ष ते काम करत आहेत. २००५ चा ठराव होता की जुने जे कार्यरत आहेत त्यांना पहिले सामावून घ्या त्यानंतर जी भरती केली गेली ते सगळे बाहेरचे कोण कोणाचे हित संबंध ते सगळे माहितीच असेल. अशी १० लोक भरती गेली परंतु गेले २० वर्ष जे ९ कर्मचारी काम करीत होते त्यातले ५ आता रिटायर्ड झालेले आहेत. ते रिटायर्ड झाल्यानंतर देखील त्यांना एक पैसा कुठलाही मिळाला नाही. ते ८,९,१०,११ ह्या वेतनावर ते काम करीत आहेत. त्यांना कुठल्याही पध्दतीचे रजा किंवा इतर सवलती आहेत. ह्या त्यांना कुठल्याही पध्दतीने मिळत नाही तर कृपया आपण जो विषय घेणार आहात तर त्या विषयामध्ये आपण ह्या सगळ्या गोष्टी नमुद कराव्यात आणि त्याचा फायदा त्यांना रिटायर्डमेंट नंतर देखील मिळावा आणि आता देखील करत असताना विशेष म्हणजे..........

**मा. महापौर :-**

हम दुसरी महासभा में उनका विषय ले रहे है। रितसर हम ले रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

रितसर विषय आने के बाद सबको माहिती देंगे एक साथ में हम निर्णय ले लेंगे उनका।

**निलम ढवण :-**

अस्थायी ज्या सेविका आहेत त्याच्यासाठी १९,२० ह्या लेखाशिर्षकाखाली देखील १५ लाखाची तरतुद केलेली आहे. त्यांना आपण ११ हजारच देत आहोत. आपण विषय पुढे घेणार आहात. त्यासंदर्भात जरी अस्थायी असलेत तरी शेवटी आपले परमनन्ट स्थायी कामगाराच्या बरोबरीनेच ते सगळी कामे करीत आहेत. पण आपण त्याच्या काही लेडीज आहेत त्याच्या काही समस्या असतात तर त्यासंदर्भात आपण वैद्यकिय रजा म्हणा किरकोळ रजा, हक्क रजा, भविष्य निर्वाह निधी ते आपण विचार करु शकतो. पण अशा काही रजा देखील आपण त्याबाबतीत विचार करावा. पुढचा विषय घेणार आहेत. त्यामध्ये याची तरतुद करावी अशी मी आपणांस विनंती करते. धन्यवाद.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम याच विषयाच्या अनुषंगाने साहेब हा विषय मानधनाचा झाला आपल्या ज्या महापालिकेच्या शाळा आहेत तिथले जे शिक्षक आहेत त्यांना तीन तीन महिने पगार मिळत नाही. वॉर्डन त्याचे पैसे जमा होत नाही. अशा तक्रारी आल्या आहेत. तथ्य आहे का? याच्यामध्ये सत्यता आहे का?

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाकडून त्यांचा जो ५० टक्के निधी येणे अपेक्षित होता त्याला थोडे डिले झाले होते. ह्या लोकांनी ती माहिती विहित टाईममध्ये राज्यशासनाकडे पाठवली नव्हती. आपल्या स्थानिक लोकांना त्याच्या मी डिटेल आढावा घेतला.

**अनिल सावंत :-**

त्यांना काढून टाका घरी बसवा त्यांना.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर स्ट्रीक्टली ॲक्शन केली आता आपण जूनचा पगार पूर्ण केलेला आहे. योगायोग की चर्नी रोडला आपल्याकडे शिक्षणाधिकारी होते त्यांच्याकडे चार्ज आहे. म्हणजे आपला माणूस तिथे आहे. यांना कोणती अडचण यायची गरज नाही. आमचा निधी आम्ही ॲडव्हान्स देतो.

**अनिल सावंत :-**

जरा लक्ष द्या आणि प्रॉव्हीडंट फंडला पैसे जमा होतात की नाही ते बघा. त्यांना पावती मिळत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याचीही खात्री करेल.

**प्रकरण क्र. ३४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहक यांचे वेतनात वाढ करणेबाबत.**

ठराव क्र. ४१ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष गरजाधारक वि दयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत 06 काळजीवाहक नेमण्यात आले होते ते मार्च 2015 पर्यंत कार्यरत होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि .08/04/2015 रोजीच्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये अशा स्पष्ट् सुचना देण्यात आल्या की,कार्यरत काळजीवाहक यांच्या मानधनाची रक्कम् शासनाकडुन सन 2015-16 साठी मंजुर करण्यात आली नाही.**

**त्याअनुषंगाने शिक्षण विभागामार्फत त्यांच्या कार्यालयात दि.13/04/2015 रोजी बैठक घेण्यात आली व काळजीवाहक यांना कार्यमुक्त् करण्याच्या तोंडी सुचना देण्यात आल्या होत्या तथापि मा . आयुक्त् सो. यांचेकडुन सदर कार्यरत खालील काळजीवाहकांना मुदतवाढ देणे व त्याचे मानधन हे समाजविकास विभाग "अंध व अपंग कल्याण योजना " अंतर्गत अदा करण्याचे तोंडी निर्देश प्राप्त् झाले होते . त्यानुसार खालील 06 काळजीवाहकांना मा. महासभा दि.04/12/2015 प्रकरण क्रं.116 ठराव क्रं.87 नुसार रु.4000/- मानधन देण्यात आले होते.**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक |

| | | |
|---|---|---|
| 2 | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक |
| 3 | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक |
| 4 | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक |
| 5 | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक |
| 6 | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक |

**काळजीवाहकांना मानधन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy/शिक्षणासाठी आर्थिक मदत " या लेखाशिर्षातुन करण्यात यावी सासाठी मा. महासभा दि.12/08/2016 प्रकरण 40, ठराव क्रं.39 अन्वये काळजीवाहकांचे वेतन रु.6000/- करण्यात आले.**

**संदर्भिय मा. महापौर सो. यांच्या पत्रान्वये सदर काळजीवाहकांचे मानधन वाढविण्याबाबत कळविलेले आहे. "मतिमंद मुलांसाठी शाळा /सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत काळजीवाहकांचे मानधन " या लेखाशिर्षा अंतर्गत सन 2019-20 या अर्थसंकल्पात रु.20 लाख (रु. वीस लाख मात्र ) तरतुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने काळजीवाहक यांना 1 एप्रिल पासुन पुढे मुदतवाढ देणे व सदर लेखाशिर्षातुन एप्रिल 2019 पासुन काळजीवाहकांचे मानधन रु.8000/- प्रती महिना अदा करणेबा बतचा प्रस्ताव ही मा. महासभा मंजुर करीत आहे तसेच वरील 6 काळजी वाहक शिक्षकांव्यतिरीक्त कोणताही कर्मचाऱ्यास वेतन वाढ देवू नये असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील अनुमोदन :- श्रीम. दिपाली मोकाशी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र . २३३ या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधणे कामाबाबत.**

**संजय थेराडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र .२३३ या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन , विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधणे प्रस्तावित आहे . मात्र सदरच्या जागेवर नवघर येथील स्थानिक गावकऱ्यांच्या शेतीचा पिकपाणी याचा उल्लेख आहे. तसेच ई पैकी पिकपाणी उतऱ्यामध्ये नोंद आहे. शेतकरी गावकरी यांनी शासनाला शेतीचे अतिक्रमण नियमित करणेबाबत अर्ज केला असुन त्यातील काही प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे . सदर जागेमध्ये स्वातंत्र सैनिक यांच्या देखील नावाचा उल्लेख असून सदरच्या जागेत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधण्यास मंजुरी दिल्यास स्थानिक व स्वातंत्र सैनिक यांचेवर अन्याय होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर सर्व्हे क्र .२३३ ही शासकीय जागा सोडून इतर शासकीय जागेवर सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**रुपाली मोदी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये राज्य शासन आपल्याला पैसे देणार आहे. समाजकल्याणाचा निधी याच्यामध्ये भेटणार आहे.

**अनिल सावंत :-**

ही जागा समाजकल्याण विभाग महाराष्ट्र शासनाने तुम्हाला सांगितली ना ह्या जागेवर बांधा म्हणून.

**मा. आयुक्त :-**

ही जागा समाजकल्याण विभागाने राज्य शासनाने हस्तांतरण केलेली आहे. राज्यशासनाच्या समाज विकास विभागाकडून हा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. अंमलबजावणी यंत्रणा महापालिका मिरा भाईंदर आहे.

**अनिल सावंत :-**

त्यासाठी महापालिकेने काही कॉरस्पॉन्डस केले होते का सामाजिक?

**मा. आयुक्त :-**

हो. आम्ही करॉस्पॉन्डन्ट केलेले आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही कॉरस्पॉन्डस करते वेळी आता जो ठरावामध्ये यांनी सन्मा. सदस्यांनी सांगितले स्थानिक शेतकरी आणि स्वातंत्र्य सैनिक मग ते आपण ध्यानात घेतले नव्हते का.

**मा. आयुक्त :-**

हा जिल्हाधिकारी आणि राज्यशासनाकडून....

**अनिल सावंत :-**

कसे आहे हे विपश्यना केंद्र, बौध्द विहार उपमहापौर साहेबांबरोबर आमची मागे चर्चा झालेली ह्या शहरामध्ये होणे गरजेचे आहे आणि ते व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या विरोध नाहीच आहे.

**अनिल सावंत :-**

विरोध झाला ना.

**मा. उपमहापौर :-**

ते दुसरे आहे ह्याला मंजुरी मिळाली आहे. त्याचे प्लॅन पास झालेले आहे. हा विषयच वेगळा आहे. ते मंजूर झाले आहे.

**अनिल सावंत :-**

हे पण विपश्यना केंद्र आहे ना.

**धृवकिशोर पाटील :-**

हे विपश्यना केंद्रासाठी राज्यशासनाने जागा सांगितली होती आणि महापालिकेमार्फत सुध्दा आपण विपश्यना केंद्र आणि बहुउद्देशीय इमारत बांधत आहोत. त्याचे काम वेगळे आहे आणि हे वेगळे आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याला मंजुरी दिली. ते काम चालू आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण राज्य शासनाला सांगितले की, तुम्ही दुसरी कुठली जागा सूचवा तिथे कुठलेही ऑब्जेक्शन नसेल.

**अनिल सावंत :-**

ह्या २३६ सर्व्हे नंबरसाठी जो पालिकेने प्रस्ताव पाठवला राज्यशासनाला त्यावेळी हे शेतकरी आणि स्वातंत्र्य सैनिकाची.....................

**मा. आयुक्त :-**

हे जिल्हाधिकाऱ्याने राज्यशासनाला पाठवला. महापालिकेने पाठवला नाही. आपण फक्त अंमलबजावणी करतो.

**प्रकरण क्र. ३५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. २३३ या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधणे कामाबाबत.**

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर सर्व्हे क्र .२३३ या शासकीय जागेत सांस्कृतिक भवन , विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधणे प्रस्तावित आहे. मात्र सदरच्या जागेवर नवघर येथील स्थानिक गावकऱ्यांच्या शेतीचा पिकपाणी याचा उल्लेख आहे. तसेच ई पैकी पिकपाणी उतऱ्यामध्ये नोंद आहे. शेतकरी गावकरी यांनी शासनाला शेतीचे अतिक्रमण नियमित करणेबाबत अर्ज केला असुन त्यातील काही प्रस्ताव शासनाचे विचा राधीन आहे. सदर जागेमध्ये स्वातंत्र सैनिक यांच्या देखील नावाचा उल्लेख असून सदरच्या जागेत सांस्कृतिक भवन , विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधण्यास मंजुरी दिल्यास स्थानिक व स्वातंत्र सैनिक यांचेवर अन्याय होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौ जे घोडबंदर सर्व्हे क्र .२३३ ही शासकीय जागा सोडून इतर शासकीय जागेवर सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशिय इमारत बांधणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. संजय थेराडे अनुमोदन :- श्रीम. रुपाली शिंदे-मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, **शहर विकास व नियोजन अधिकारी हे पद आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करुन नेमणुकीची पध्दत व टक्केवारी तसेच शैक्षणिक अर्हता विहित करणेबाबत.**

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम इसपे मैं बोलना चाहती हूँ। आता जो हा विषय घेतलेला आहे त्याच्यामध्ये आपण दोन ऑप्शन दिलेले आहेत. बी.ई.सिव्हील आणि ५ वर्षांचा ज्यांना अनुभव आहे असे माझे त्याच्याबद्दल बोलणे आहे की कुठल्याही नगररचनाच्या पदासाठी फक्त बी.ई. सिव्हील माणसाला आपण करायचे. ज्याला पाच वर्षाचा अनुभव आहे अशा लोकांच्या पॉलिटीकल त्यांच्याकडे काहीतरी माईलेज असते आणि पैसे असतात असे लोक डिप्लोमा होल्डर नगररचनेच्या पदावर येऊन बसतात. ह्या शहराची त्या लोकांनी विल्हेवाट लावलेली आहे म्हणून असे डिप्लोमा होल्डरला ५ वर्षाचा अनुभवाचा फायदा घेऊन त्यांना या पदावर बसवायचे असेल त्याला माझा विरोध आहे. फक्त बी.ई. सिव्हील माणसाला बसवायचे अशी माझी मागणी आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब याच्यामध्ये दोन विषय आहेत. एका बाजूला टक्केवारी कोणाची नक्की करायला निघालात. शहर विकास अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला शहराची वाढ होण्याच्या लोकसंख्या विचारता शहरामधील नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असून शहराची सुधारीत विकास योजना काम प्रगती पथावर आहे. तसेच महापालिका आस्थापनेवर मंजूर पदापैकी सहाय्यक संचालक व सहा. उपनगररचना...........

**मा. आयुक्त :-**

माझा फक्त आपल्याला इन्टेव्हन आहे. आपण प्रस्ताव वाचत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मी गोषवारा वाचत आहे. साहेब एका विषयावर दुसरा विषय फुगवता आहेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

गोषवारा सर्वांनी वाचला आहे. पहिला ठराव ऐकून घ्या.

**मा. महापौर :-**

पहिला ठराव मांडा नंतर चर्चा करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि . १३/०२/२०१९ (तहकुब दि .१९-०१-२०१९) रोजीच्या मा . महासभेत गठीत केलेल्या समितीने बैठक घेवून सर्व विभागातील वर्ग १ ते ४ पर्यंतचा आवश्यकतेनुसार एकत्रित सुधारीत आकृती बंधाचा अहवाल तयार करुन तसेच मा . आयुक्त यांनी शहर विकास व नियोजन अधि कारी हे पद महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब आमचा ठराव आहे. पण मला आयुक्त साहेब एवढे सांगा हा प्रस्ताव जो आहे तो व्यक्तीनिष्ठ आहे की शहराच्या हिताचा आहे. एखाद्या व्यक्तीला आणून तिथे गणपती सारखा बसवायचा आहे म्हणून आहे का.

**मा. आयुक्त :-**

हे एकाएकी पद आहे एकाएकी पद कसे भरावे याचे शासन ज्यावेळी निर्णय होईल तेव्हा त्याची कार्यपध्दती निश्चित होणार आहे. आज आपण काहीतरी वेगळे येथून प्रस्तावित करुन.........

**अनिल सावंत :-**

आम्हाला पापाचे धनी कशाला बनवत आहात.

**मा. आयुक्त :-**

पापाचे धनी तुम्ही कसे असणार.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये एक्सपिरियन्स सांगत आहेत. बी.ई. सांगत आहेत.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही विषय समजून घेत नाहीत. आपल्याकडे तिसरीच चर्चा होते. आपल्या शहराच्या आस्थापनेमध्ये शहर नियोजन अधिकारी हे पद नाही आहे.

**अनिल सावंत :-**

ते कुठे आहे साहेब? मुंबईला आहे.

**मा. आयुक्त :-**

चहुकडे आहे.

**अनिल सावंत :-**

मुंबईला नाही. ठाण्याचे सांगु नका. तुम्ही ठाण्याचे तर उदाहरण देऊच नका.

**मा. आयुक्त :-**

भिवंडीला आहे. ठाणे महापालिकेला आहे. राज्य शासनाच्या सुचीवर हे पद आहे.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा आपण आकृतीबंध राज्य शासनाला पाठवला.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये हे पद राहून गेले.

**अनिल सावंत :-**

आकृतीबंध पाठवला. महाराष्ट्र शासनाने २८ मे ला तुम्हाला मंजूरी दिली.

**मा. आयुक्त :-**

आता रिटा शहा मॅडमने सांगितले त्याला पदवी कम्पलसरी करा तुम्ही हे पद करायचे की नाही ह्याच्या बद्दल चर्चा करा आणि जर आवश्यक असेल तर त्याची अर्हता काय असावी आणि ते कसे भरले जावे हे राज्य शासन................

**अनिल सावंत :-**

तुम्ही म्हणता की तुम्ही चर्चा करा आणि निर्णय घ्या. तो होणार नाही त्यांनी ठराव केला तो बहुमतावर पास होणार. राज्य शासन काय करेल तो करतेवेळी.

**मा. आयुक्त :-**

असे कसे काही करेल. जे नियमात असेल तेच होईल ना.

**अनिल सावंत :-**

राज्य शासन बऱ्याच गोष्टी करत आहेत. त्या पुढे येणार आहेत. साहेब महासभेसमोर तुम्ही विषय आणला मला हेच म्हणायचे आहे की हे जे पद आहे ते व्यक्तिनिष्ठ आहे की शहराच्या हितामध्ये आहे.

**मा. आयुक्त :-**

हा व्यतिनिष्ठ नाही आहे. शहराच्या हितासाठी आहे.

**अनिल सावंत :-**

एखाद्या व्यक्तीला डोळ्यासमोर ठेऊन भरण्यात आलेले आहे. त्याचा गोषवारा दिलेला नाही........

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

२८ मे २०१९ ला राज्य शासन तुम्हाला आकृतीबंधाची मंजूरी देते. मे,जून,जुलै असे कोणते मोठे स्थित्यंतर घडले आहे. ह्या शहरामध्ये की ज्यासाठी ह्या पदाची आवश्यकता भासावी. आज नगररचना आहे सर्व होते आणि आज मिरा भाईंदर शहरामध्ये मॅक्झीमम कंस्ट्रक्शन झालेले आहे. याच्यापुढे कन्स्ट्रक्शन करायला स्कोप नाही. मग हा शहर विकास आणि नियोजन अधिकारी तो कसले नियोजन करणार आहे आणि त्याच्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याला त्याठिकाणी बसवायचे आहे म्हणून आपण त्याचे क्वालिफिकेशन वगैरे चेंज करतो. एक्सपिरियन्स टाकतो. हे चुकीचे आहे. म्हणजे हा शहराच्या हितामध्ये आहे की व्यक्तिच्या हितामध्ये आहे.

**मा. आयुक्त :-**

मला हे समजत नाही की तुमचे कन्फ्युजन काय आहे.

**अनिल सावंत :-**

ह्या पदाची आवश्यकता नाही.

**मा. आयुक्त :-**

असे म्हणा मग तुम्ही.

**अनिल सावंत :-**

आम्ही म्हटले तरी ठराव झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

शासन त्याच्यावर निर्णय करेल ना.

**अनिल सावंत :-**

आम्ही तर ठराव करणारच आहोत. परंतु प्रशासनाने मा. आयुक्तांनी गोषवारा देतेवेळी जरा विचार करुन द्यावा.

**गिता जैन :-**

लोकसंख्या वाढत आहे. आपल्याला जे ही लागणार बाकी सगळ काही लागणार नियोजन अधिकारी का लागणार? १० बिल्डर, १५ बिल्डर आहेत त्यांच्यासाठी नियोजन अधिकारी लागणार. तुम्ही एकदा सांगितले की आम्हाला एखादा सहाय्यक आयुक्त लागणार मी मान्य करते. एखादा जे.ई. लागणार एखादा बांधकामावर लागणार, पाणी वर लागणार सगळे काही मान्य आहे.

**मा. आयुक्त :-**

आपले प्लॅन लवकर करावे अपेक्षित नाही आहे का? कामकाज लवकर व्हावे अपक्षित नाही आहे का?

**गिता जैन :-**

साहेब लवकर होणेसाठी नियोजन अधिकारी नाही पैसे लागतात.

**मा. आयुक्त :-**

मोठी पोस्ट आहे. त्याला एवढे कमी लेखून नाही चालत.

**अनिल सावंत :-**

ह्या शहराला असा एक ठराव करा की आय.ए.एस अधिकारी पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

अर्हता ठरविणे हा वेगळा विषय आहे. अर्हता तुम्ही चर्चेने ठरवू शकता आणि आपण अर्हता ठरविली म्हणजे शासन मान्य करते अशातला भाग नाही. आकृतीबंधाच्या व्यवस्थित तुम्ही व्यक्ती सापेक्षच केला होता. पण राज्य शासन नियमाप्रमाणे फायनल केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब शासनाचे धोरण कसे असते तुम खुश तो हम खुश.

**मा. आयुक्त :-**

असे नाही तुमचा गैरसमज आहे. शासन हे त्या पदाचा दर्जा, त्या पदाचे वेतन जसे त्या मॅडम बोलल्या की हा डिप्लोमा द्यायचे की डिग्री द्यायची हे सगळ, हे पद पदोन्नतीने भरायचे की सरळ सेवेने भरायचे हे सगळे निश्चित होणार आहे. उद्या हे सरळ सेवेने नाही आले तर तुम्ही काय करणार आहेत. जाहिरात काढावी लागणार. त्यामुळे आपण चर्चा करतो.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विकास आराखडा प्रगतीपथावर आहे. विकास आराखड्याचे काम कुठपर्यंत गेले आहे ते स्पष्ट नाही. तो रद्द झाला. परत तोच लखोटा खोलला जाणार आहे. आम्हाला जे चिज आहे ते तळागाळाच्या समोर आणावे लागेल.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला एवढे सांगु इच्छितो की हा प्रशासकीय कामकाजातला भाग आहे. हा कोणताही व्यक्ती सापेक्ष राहणार नाही. रिटा शहा मॅडमने जसा मुद्दा मांडला याची अर्हता राज्यशासन निश्चित करणार. इथे काही झाले तरी त्याच्या भरण्याची पध्दती राज्य शासन निश्चित करणार. सदस्यांनी शंका घेण्याची काही गरज नाही आणि राज्यशासनाला वाटले पद आवश्यक आहे तरच मंजूर होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

एका बाजूला तुम्ही स्वतः बोलता अर्हता निश्चित करायची गरज नाही राज्यशासन करेल आणि दुसऱ्या बाजूला गोषवाऱ्यामध्ये प्रशासनाने दिलेले आहे अशा प्रकारे टिपण्या दिलेल्या आहेत की ह्यांनाच गृहित धरले जावे. म्हणजे याचा अर्थ काय निघतो की कुठेतरी एका व्यक्तीसाठी कोणीतरी असेल त्याचे

नाव आम्ही घेत नाही ते जगजाहिर आहे. सांगायची गरज नाही सन्मा. आमदार सरनाईक साहेबांनी त्याला विरोध केला होता. त्या व्यक्तीचा त्याच्या घेवाण देवाण बद्दलचा त्यांनी भाषण केली आहेत माध्यमांमध्ये. त्या व्यक्तीला लक्षात घेऊन असे कार्य प्रशासन करत असेल तर ते योग्य नाही. एकवेळा पदाची आम्हाला गरज आहे तिथुन सुरुवात केली पाहिजे. साहेब आपला डि.पी. याच्या आधी विकास आराखडा १९९२ साली आपण प्रस्तावित केला होता तो मंजूर होईपर्यंत १९९७ सालामध्ये ५ वर्ष अशीच गेली होती. तो ही विषय ह्या सभागृहामध्ये आहे म्हणजे आम्ही आता प्रस्तावित केलेला २०१७ चा आराखडा अजून प्रगतीपथावर असेल तर निर्णय लागत नाही. हे सगळे काही लागल्यानंतर खरोखर आपल्याला गरज असेल की शहर किती अजून विकसित करायचे आहे. तर तो निर्णय घ्यावा. साहेब आम्हाला खरतर अधिकारी पाहिजे होता तो आपल्याकडे दुकान जे आपले विकसित करेल तो अधिकारी आपल्याला पाहिजे. त्याची आपल्याला कुठे मागणी आपल्याला खरतर केली पाहिजे त्याच्यासाठी आपण कुठे काही करत नाही साहेब मंजूर आहे पण ते शासन आपल्याला पाठवत नाही. असा तो विषय झालेला आहे. अशाप्रकारे ज्या गरजेच्या वस्तु आहेत त्याला डावलून आपल्याकडे संचालक आलेले आहेत, नगररचना आहेत त्यांच्या नंतर आपल्याकडे कनिष्ठ अभियंता आहेतच. आता कसे झाले प्रभाग अधिकारी ज्यांना लाचलुचपत विभागाने जिथे ज्या प्रभागामध्ये पकडले त्याच प्रभागामध्ये त्याला परत तुम्ही बसवता म्हणजे अशी आपली परिस्थिती आहे. जिथे नाहीत तिथे भरा ना साहेब. कनिष्ठ अभियंताचा तुम्ही विषय आणला आम्ही कधी नाही बोललो, पाणी पुरवठा बद्दल तुम्ही विषय आणला आम्ही कधी नाही बोललो टाऊन प्लानिंग नगररचना विभाग संवेदनशील विभाग असे टाऊन उभे राहतात असे असताना डोळ्यात तेल..................

**मा. आयुक्त :-**

आपण जे मुद्दे मांडलात त्याच्यावर अभ्यास करुन पुढच्या याच्यात तो प्रस्ताव आणण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**गिता जैन :-**

साहेब कोणी अशी कम्पलेन्ड दिली आहे की नगररचना विभाग बरोबर काम करत नाही. तिथे एखाद्या अधिकारीची गरज आहे का तिथे कुठे काम स्लो आहे का, कुठलीही अशी कम्पलेन्ट तुमच्याकडे आली आहे म्हणजे एकाएक हा पदनिर्मिती करायचे आहे म्हणून हे का? साहेब नक्की मागणी झाली आहे ना.

**अनिल सावंत :-**

मागणी कोणी केली हे महत्वाचे आहे.

**गिता जैन :-**

सभापती उभे राहून सांगत आहेत मागणी केली म्हणजेच झाले ना. जवाब मिळाला.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आकृतीबंधात आता हे पद समाविष्ठ करणार आहात.

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाच्या मान्यतेनंतर.

**निलम ढवण :-**

आकृतीबंध हल्ली हल्लीच तयार केलेला होता. त्यावेळी तो तयार करत असताना आपले मिरा भाईंदर शहर पुढे झपाट्याने वाढणार आहे की आताच संदर्भातल्या तरतुदी केल्या पाहिजेत असे त्यावेळी आकृतीबंध तयार करताना ही पदे सगळी समाविष्ठ का झाली नाही? हे शहर वाढणार होते असे वाटत नव्हते का की आताच लक्षात आले. मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाढत आहे विकास करायचा आहे.

**मा. आयुक्त :-**

कसे असते चर्चा आपल्याला काहीही करता येते. जसे तुमच्या मनात आले.

**निलम ढवण :-**

काही नाही. म्हणजे आमची शंका एकदा आम्हाला विचारायची आहे.

**मा. आयुक्त :-**

आकृतीबंध म्हणजे हा काय असा कॉस्टेन नाही आहे. वेळोवेळी त्याच्यात बदल होत राहतो जस जशी आपली आवश्यकता असेल तसतशी त्याच्यात ॲड होत असेल.

**निलम ढवण :-**

हो पण याच्यात मुद्दा आहे की मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाढत असताना त्याच्या विकासासाठी आपण हे करतो.

**मा. आयुक्त :-**

आता यांनी सुचवले सहा. आयुक्त घ्या, डेप्युटी इंजिनिअर घ्या काहींची संख्या वाढवा. वेळोवेळी अशी वाढ आपल्याला करता येते.

**निलम ढवण :-**

वाढ करतो येते पण माझा मुद्दा काय आहे की, नगररचना हा विभाग मिरा भाईंदरचा विकास करण्यासाठी महत्वाचा हा विभाग आहे. मग खरतर हे हल्ली हल्ली केलेले आहे आणि त्याच्यात ही तरतूद व्हावी त्याच्यात आता जे आहे ते तोपर्यंत सक्षम नाही आहेत का? कारण तुम्ही एकदा पद तयार केल्यानंतर आणि त्यांना तुम्ही रुजू करुन घेतल्यानंतर पुढचा देखील बराचसा भार आपल्यावर पडणारच आहे. शहराचा विकास व्हावा तिथे तज्ञ व्यक्ती पाहिजे ह्याच्याशी मी सहमत आहे. परंतु ती व्यक्ती आता जो विकास चाललेला आहे त्याच्यामध्ये कुठेतरी जी पदे आहेत ती कार्यरत तेवढी चांगल्या सक्षमपणे नाही आहेत का? आणि जर असेल तर त्यात तज्ञ व्यक्तीला देखील तुम्ही त्या क्वालिफिकेशन नुसार घ्या ना. साध्या अटी ठेवून जर एखादी व्यक्ती कोणी हे लोक सांगतात त्यानुसार जर कोणी एखादी व्यक्ती टारगेट असेल तर ते चुकीचे असेल. खरोखर विकास बघायचा की व्यक्ती बघायची असेल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी ऑलरेडी त्याच्यात पदवी हा उल्लेख केला ना.

**निलम ढवण :-**

पदवी म्हणजे फक्त ते डिप्लोमा आणि जे काय पाच वर्षाचा अनुभव ह्या गोष्टीसाठी ५ वर्षाचा अनुभव पुरेसा नाही. त्यामुळे जो व्यक्ती भराल त्यावेळी ती योग्य त्यावेळेला क्लासिफाईड असलेली अशी व्यक्तीला करा. खरोखर जेणेकरुन शहराचा विकास होईल. खरतर आकृतीबंधात अगोदर झालेच पाहिजे होते.

**सुरेश खंडेलवाल :-**

**मनपा/नर/1680/2019-20, दि. 28/06/2019 घेतल्यानंतर सत्तेवर असलेल्या स्थानिक राजकर्त्यांना हाताशी घेऊन शासन दरबारी आटपीटा करुन आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव साद र केले आहे. शहरातले आरक्षण वाढती लोकसंख्येच्या, दुरदृष्टीच्या आधारे शहर हितासाठी प्रस्तावित करण्यात आले होते . आमचा स्पष्ट आरोप आहे. रद्द झालेल्या विकास आराखड्यामध्ये उपरोक्त विषय फेरबदलाचा प्रस्ताव आधीच समाविष्ट होता. नविन विकास आराखडा प्रस्तावित होऊन मंजू र होईपर्यंत विलंब होत असल्याप्रमाणे अशाप्रकारे विषय मंजुरीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 37 अन्वये प्रस्तावित करणे . एका व्यक्तीच्या, संस्थेच्या, स्वयंस्वार्थासाठी करण्याचे कारस्थान असल्याचे दिसत आहे . मिरा भाईंदर महानगरपालिका नविन विकास आराखड्याम ध्ये सीआरझेड व एनडी बाधित क्षेत्रांना रहिवास , सार्वजनिक, निमसार्वजनिक क्षेत्रात रुपांतर केल्यास अधिक लोकसंख्येचा भार या शहराला पेलवणार नाही. शहरात प्रवेशासाठी फक्त मिरा रोड स्थानक, भाईंदर रेल्वे स्थानक व वेस्टर्न एक्सप्रेस हायवे आहे रस्त्याचा मार्गी मुंबई वरुन येताना तासन तास टोल नाका (चेक नाका) पर्यंत गाड्यांची रांग लागलेली असते, प्रवास व रहदारीचा समस्या दैनंदिन वाढत आहे . तरी शासनाने जोपर्यंत पाणी पुरवठा, परिवहन, मेट्रो, मुंबईला जोडणारे नवी मार्ग, नविन घनकचरा व्यवस्थापन सुरु होत नाही. तोपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन रहिवासी क्षेत्र प्रस्तावित करु नये ज्याअर्थी मि .भा. मनपाची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे व भविष्यात जागतिक मंदी पाहता शासनाकडून योजना पूर्ण करण्यासाठी अनुदान मिळेल याचे प्रश्नचिन्ह आहे . ज्याअर्थी उपरोक्त विषय प्रशासनाने प्रस्तावि त केले आहे . त्याअर्थी राजकीय, प्रशासकीय, शासकीय भ्रष्टाचाराचा हित संबंध प्रथम दर्शनीय दिसून येते. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षणामध्ये कुठलाही बदल करावयाचा असल्यास सुधारित शहरविकास आराखड्यामध्ये प्रस्तावित करावे . शहर विकास आराखडा प्रस्तावित अस ताना अशाप्रकाराचे प्रस्ताव शासन निर्णयासाठी महापालिकेला वर्ग करत आहे . असे अतत्वतित चुकीचे पायंडे प्रशासन जन्माला देत आहे. एम.आर.टी.पी. 37/1 मध्ये किरकोळ दुरुस्ती सुचवता येतो पूर्ण झोनचे क्षेत्र चारित्र्य बदलता येत नाही . असे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत . तरी मि.भा.मनपा प्रशासनाचे प्रस्तावित म.प्र.न. अधिनियम 1966 चे कलम 7/1 अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

राजीव मेहरा :-

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३७ करिता दोन ठराव आलेले आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. हसमुख गेहलोत. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा. प्रथम दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करावे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील तर त्यांनी हात वर करावे. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करावे. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करावे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील तर त्यांनी हात वर करावे. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करावे.

**मा. महापौर :-**

श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ७०, विरोधात १०, तटस्थ १ इतकी मत पडलेली आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांचा ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ३८ :-**

**महाराष्ट्र अॅकडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड एज्युकेशन रिसर्च , पूणे (माईर) या संस्थेच्या मालकीच्या मौजे काशि, जिल्हा ठाणे येथील मिळकत गट नं . २५/१५, ३०/१२अ, ३०/१३, ३०/१८, ६८/१, ७०/१०, ७०/१२, ७१/१, ७२/५, ७२/८, ७२/१० या जमिनिच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत झोन बदलून मिळणेबाबत.**

ठराव क्र. ४५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे काशी येथील स.क्र. 25/15, 30/12अ,13,18, 68, 70/10, 70/12, 71/1, 72/5,8,10 या जमिनी महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड एज्युकेशन रिसर्च, पुणे (माईर) या संस्थेच्या मालकीच्या असलेबाबत व या संस्थेस या जागेमध्ये शहरातील जनतेला**

चांगल्या दर्जाच्या शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण मिळणेसाठी सदर जमिनी "नाविकास" क्षेत्रातून "सार्वजनिक व निमसार्वजनिक" क्षेत्राखालील वापरामध्ये वर्ग होणेस संस्थेने दि .15/05/2019 रोजी शासनाकडे विनंती केलेली असून त्याप्रमाणे सदर प्रकरणी उचित कार्यवाहीसाठी शासनाने संदर्भिय पत्रान्वये संस्थेचा अर्ज महानगरपालिकेकडे वर्ग केलेला आहे.

सदरच्या विषयांकित जागेपैकी मौजे काशी , स.क्र. 25/15, 30/12,13,18, 70/10,12, 71/1, 72/5,10 या जागेमध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे "जिम्नॅशियम" च्या वापरासाठी महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/1680/2019-20, दि.28/06/2019 अन्वये मे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअर्स ॲन्ड एज्युकेशन रिसर्च यांना सुधारीत नकाशे मंजूरीसह सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदरची विषयांकित जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे "नाविकास" क्षेत्रात सामाविष्ट असून सी.आर.झेड. च्या वर्गीकरणाच्या नकाशाप्रमाणे सी.आर.झेड. ने बाधीत होत नाही.

अर्जदार मे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअर्स ॲन्ड एज्युकेशन रिसर्च, पुणे यांनी सदर जागेच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 20 अन्वये वापरात बदल करुन "सार्वजनिक व निमसार्वजनिक" प्रमाणे वापर बदलून मिळणेबाबत शासनास विनंती केलेली आहे . त्याप्रमाणे सदर प्रकरणी गुणवत्तेनुसार उचित विचारार्थ प्रकरण शासनाने दि .03-03-2014 व दि .27-05-2019 अन्वये महानगरपालिकेकडे वर्ग केलेले आहे.

तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 20 हे प्रादेशिक विकास योजनेमधील वापर बदलाबाबतचे असल्यामुळे व मिरा भाईंदर शहरासाठी स्वतंत्र विकास योजना मंजूर झालेली असल्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे "ना-विकास" क्षेत्राऐवजी "शैक्षणिक प्रयोजन" या वापरासाठी फेरबदल करणे आवश्यक आहे . मिरा भाईंदर शहरामध्ये शाळांची संख्या बऱ्याच प्रमाणात असुन उच्च शिक्षणासाठी नामवंत कॉलेजांची संख्या फारच कमी आहे . मिरा भाईंदर शहरातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व त्यांना उच्च शिक्षणासाठी शहरामध्ये सोय उपलब्ध होणेसाठी तसेच महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड एज्युकेशन रिसर्च, पूणे (माईर)_ही संस्था नामवंत असल्यामुळे मौजे काशी, जिल्हा ठाणे येथील मिळकत गट नं .25/15; 30/12अ; 30/13; 30/18; 68/1; 70/10; 70/12; 71/1; 72/5; 72/8; 72/10 ही जागा ना -विकास क्षेत्रातून वगळून शैक्षणिक प्रयोजनासाठी त्या वापरामध्ये समाविष्ठ करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वयेच्या फेरबदलास ही मा . महासभा मंजुरी देत असून सदर प्रकरणी सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन सदर फेरबदलाचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करणेकामी मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. धुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | १) भोईर कमलेश यशवंत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | सावंत अनिल दिवाकर | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ५ | जैन गीता भरत | ५ | शेख रुबिना फिरोझ | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | सपार उमा विश्वनाथ | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | परदेशी गिता हरीश | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | पाटील नरेश तुकाराम | |
| १० | शाह रिटा सुभाष | १० | शेख अमजद गफार | |
| ११ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | गोहिल शानु जोरावरसिंह | | | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | | | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | | | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | | | |
| १६ | सोंस निला बर्नाड | | | |
| १७ | रावल मेघना दिपक | | | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | | | |
| १९ | जैन सुनिता रमेश | | | |
| २० | अरोरा दीपिका पंकज | | | |
| २१ | नाईक विविता विवेक | | | |
| २२ | भावसार वंदना संजय | | | |
| २३ | बेलानी हेमा राजेश | | | |
| २४ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| २५ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २६ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २७ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २८ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २९ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| ३० | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३२ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३४ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३६ | भुप्तानी रक्षा सतीश | | | |
| ३७ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३८ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३९ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ४० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४३ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४५ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४६ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५१ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५२ | दुबे मनोज रामनारायण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ५४ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | |
| ५५ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५६ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५७ | भोईर राजू यशवंत | | | |
| ५८ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | | | |
| ५९ | ढवण निलम हरिश्चंद्र | | | |
| ६० | नलावडे दिनेश दगडू | | | |
| ६१ | शिर्के अनंत गेणू | | | |
| ६२ | घरत तारा विनायक | | | |
| ६३ | कदम अर्चना अरुण | | | |
| ६४ | पाटील अनिता जयवंत | | | |
| ६५ | पांडे स्नेहा शैलेश | | | |
| ६६ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ६७ | गुप्ता कुसुम संतोष | | | |
| ६८ | भोईर भावना राजू | | | |
| ६९ | पाटील वंदना विकास | | | |
| ७० | बांड्या एलायस दुमिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३९, **डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकिय अधिकारी (निलंबित) भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबत.**

सुशिल अग्रवाल :-

**गोषवारा :-**

**डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे कार्यरत असून दि .16/01/2018 पासून ते आजपर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांना विनापरवानगी गैरहजर प्रकरणात वेळोवेळी नोटीस देण्यात आलेल्या असून जा .क्र.मनपा/आस्था/1659/2018-19, दि.22/01/2019 रोजी अन्वये गैरहजरबाबत निलंबीत का करण्यात ये ऊ नये याचा खुलासा सादर करणेबाबत अंतिम नोटीस देण्यात आलेली होती. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांनी दि .26/02/2019 रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात आलेला आहे.**

**यावरुन डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांनी विनापरवानगी गैरहजर राहून त्यांच्या कामात कर्तव्यपरायणता न ठेवल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 3(1)(दोन) चा भंग केल्याचे दिसून आलेले आहे.**

**सबब डॉ . आकाश प्रेमलाल रंगारी , वैद्यकीय अधिकारी यांना जा .क्र.मनपा/आस्था/निलंबन/231/2019-20, दि.14/05/2019 रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56 अन्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 4 नुसार चौकशीच्या अधीन राहून महानगरपालिका सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे.**

**ठराव क्र.    :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(1)(ब) नुसार निलंबन कायम करणेचे अधिकार मा. महासभेचे असल्याने डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबतचा ठराव ही मा. महासभा मंजुर करीत आहे.**

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाच्या बाजूने बोलतो माझा विरोध नाही. आयुक्त महोदय तुम्हाला सुचित करु इच्छितो टेंभा रुग्णालय वगैरे पं. भिमसेन जोशी रुग्णालय आज राज्य शासन ताब्यात घेणार आहे. ती प्रक्रिया चालू आहे. साहेब तिथे जे डॉक्टर आहेत त्यांना असे झाले आहे की त्यांना त्या विषयाचा क्लाऊड झालेला आहे. आम्ही राज्य शासनाकडे जाणार जातो आपल्या इथल्या पालिकेच्या अधिका-यांनी किंवा वैद्यकिय अधिका-यांनी आम्हाला काही बोलले तर आमचे कोणी काही करु शकणार नाही. हा एक क्लाऊड निर्माण झालेला आहे. साहेब तुम्हाला मध्यंतरी वर्षभर तुम्हाला फोन सुध्दा केलेले नाही. याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. हा निलंबनाचा विषय होता गैरहजर होता म्हणून हे झाले.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदया दवाखान्याच्या बाबतीत राज्य शासनाकडे हस्तांतरणचा आरोग्य खात्याचा आणि नगरविकास विभागाचा निर्णय झाला ही वस्तुस्थिती आहे. त्याच्या अंमलबजावणीच्या प्रोसेसमध्ये आहे. पण त्याचा गैरफायदा घेऊन कोणी तिथे काही अती करत असेल तर ते कोणी खपवून घेतले जाणार नाही. कितीही वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. आपण निर्देश दिल्यानंतर आम्ही वस्तुस्थिती तिथे चेक केली. त्यांना ते काम करायला त्यावेळेस क्रमप्राप्त केले होते. यामध्ये हे अधिकारी कंटीन्यू गैरहजर राहतात आणि डॉक्टरची सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणून ह्या लेव्हलला आम्हाला यावे लागले.

**जुबेर इनामदार :-**

आता साहेब मी तुमच्यापर्यंत पोहचू शकलो. मी लोकप्रतिनिधी माझ्या समोर तो विषय आला आम्ही त्याची सर्व चौकशी केली. आम्ही तुमच्याकडे येऊ शकलो. साहेब किती तरी लोक येत असतील आपण ते रुग्णालय गोरगरिबांसाठी तयार केले.

**मा. आयुक्त :-**

त्याचा लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३९ :-**

**डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकिय अधिकारी (निलंबित) भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबत**

**ठराव क्र. ४६ :-**

**गोषवारा :-**

**डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे कार्यरत असून दि .16/01/2018 पासून ते आजपर्यंत विनापरवानगी गै रहजर आहेत. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांना विनापरवानगी गैरहजर प्रकरणात वेळोवेळी नोटीस देण्यात आलेल्या असून जा .क्र.मनपा/आस्था/1659/2018-19, दि.22/01/2019 रोजी अन्वये गैरहजरबाबत निलंबीत का करण्यात येऊ नये याचा खुलासा सादर करणेबाबत अंतिम नोटी स देण्यात आलेली होती. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांनी दि .26/02/2019 रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात आलेला आहे.**

**यावरुन डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी , वैद्यकीय अधिकारी यांनी विनापरवानगी गैरहजर राहून त्यांच्या कामात कर्तव्यपरायणता न ठेवल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 3(1)(दोन) चा भंग केल्याचे दिसून आलेले आहे.**

**सबब डॉ . आकाश प्रेमलाल रंगारी , वैद्यकीय अधिकारी यांना जा .क्र.मनपा/आस्था/ निलंबन/231/2019-20, दि.14/05/2019 रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56 अन्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 4 नुसार चौकशीच्या अधीन राहून महानगरपालिका सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे.**

**ठराव क्र. :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(1)(ब) नुसार निलंबन कायम करणेचे अधिकार मा. महासभेचे असल्याने डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी, वैद्यकीय अधिकारी यांचे निलंबन कायम करणेबाबत व विभागीय चौकशी करणेबाबतचा ठराव ही मा. महासभा मंजुर करीत आहे.**

सुचक :- डॉ. सुशिल अग्रवाल अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४०, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरुपी हस्तांतरीत करणेबाबत**

दिनेश जैन :-

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजनेंतर्गत राज्यातील महानगरपालिका /नगरपालिका सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्यांची सेवा 25 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीच्या वेळी किंवा सफा ई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधना नंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून मालकी हक्काने अहस्तांतणीय स्वरूपात 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत वाटप करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : सकानि-2007/प्र.क्र.176/2007/नवि-06 दि.22 आक्टोबर 2008 अन्वये धोरण आहे.**

**यानुसार मिरा -भाईंदर महानगरपालिकेमार्फत 68 सफाई कामगारांना सुविधा क्षेत्र भूखंडावर बांधलेल्या सदनिका 2015 मध्ये वाटप करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये फार मोठ्या प्रकारात गैरप्रकार झाल्याचे वाटते ज्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. त्याकरीता महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम चे कलम 31 अन्वये महापौरांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | श्रीम. डिम्पल मेहता | अध्यक्ष |
| 2 | श्री. सुरेश खंडेलवाल | भाजपा नगरसेवक |
| 3 | श्री. हसमुख गेहलोत | भाजपा नगरसेवक |
| 4 | श्री. दिनेश जैन | भाजपा नगरसेवक |
| 5 | | शिवसेना नगरसेवक |
| 6 | | कॉंग्रेस नगरसेवक |
| 7 | | शहर अभियंता |
| 8 | महापालिकेचे निवृत्त अधिकारी | महापालिकेचे निवृत्त अधिकारी |
| 9 | महापालिकेचे निवृत्त अधिकारी | महापालिकेचे निवृत्त अधिकारी |
| 10 | | विभाग अधिकारी (सचिव) |

**तसेच 2 महापालिकेचे निवृत्त अधिकारी सखोल चौकशी करीता नियुक्त करावे व त्यांना प्रती सदनिका 1000/- रु मानधन देण्यात यावे.**

**वरील समितीस प्रशासनाच्या संबंधीत विभागाने आवश्यक ती माहिती तात्काळ पुरविण्यात यावी . समिती सचिवानी अध्यक्षांच्या परवानगीने वेळोवेळी बैठका घेवून संपूर्ण प्रकरणाचा अहवाल दि.31 डिसेंबर 2019 पूर्वी महापालिकेपूढे सादर करावयाचा आहे . जेणेकरुन महापालिका कर्मचाऱ्यांना शासनाच्या निर्देशानूसार करारनामे करुन घरांचा कायमस्वरुपी ताबा देणे शक्य होईल. तरी समितीने लवकरात लवकर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यावर मी एक खुलासा करु इच्छितो. विषय असा होता आपल्याकडे सुविधा भुखंडावर जे फ्लॅट मिळालेले आहेत ते ६८ फ्लॅट आपण सफाई कामगारांना तत्कालीन वेळेस २०१५ मध्ये दिलेले आहेत. त्याठिकाणी त्याचा वापर चालु आहे. आता आपण जी समिती नेमून त्याचे रिचेक करायचा निर्णय घेता ते मला मान्य आहे, पण त्यामधला उद्देश असा होता शासनाने ऑलरेडी २००८ मध्ये निर्णय घेतलेला आहे. ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे झालेली आहे ते सेवेत असो की रिटायर्ड असोत. त्यांनी जर जिवंत असेल तर त्याला मोफत घर दिले पाहिजे. आता आपल्याकडे ऑलरेडी ६८ घरामध्ये हे लोक राहतात. यामध्ये त्या निर्णयाप्रमाणे त्याला ते मालकी हक्कात आपल्याला देणे अपेक्षित होते. राईटमध्ये त्याच्यासाठी आम्ही रजिस्ट्रेशन कार्यालयाकडे ही फी कोण क्लियर करावे आणि किती कॉस्टने करावे ही शंका होती. मग आम्ही ते राज्य शासनाला रेफर केल्यानंतर आणि जिल्हा मुद्रण अधिकारी यांच्याकडे चर्चा केल्यानंतर १०० रु. स्टॅम्प पेपरवर नॉमिनल एक रुपये प्रमाणे हस्तांतर होऊ शकते. त्याचा बोझा कोणाला पण येत नाही. तर त्यालाही मान्यता देण्याचा विषय होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विरोध नाही. आपण ज्या सदनिका हाऊस फॉर डिसहाऊस दिलेल्या आहेत ज्या रोड बाईंडींगमध्ये आपण त्यांना घर दिलेले आहेत. सर आम्ही काय ठराव केला की, महापालिकेमार्फत ज्यांना आपण घरे दिलेली आहेत ते आपले सफाई कामगार असतील. हाऊस फॉर डिसहाऊस मध्ये असतील किंवा रस्ते बाधीत असतील त्या लोकांनी काही घरे भाड्याने दिलेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी तेच सांगतो. काही लोकांनी घरे भाड्यावर दिलेली आहेत. काही लोकांनी घरे विकलेली आहे. काही लोकांनी दोन-दोन, तीन-तीन घरे घेतलेली आहेत म्हणजे बायकोच्या नावावर वेगळी घरे स्वतःच्या नावावरती वेगळी घरे. अशा भरपुर तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्या तक्रारीची शहानिशा करण्याकरीता आपण आपले काही सगळे सदस्य जे आहेत म्हणजे शिवसेना पक्षाचा एक सदस्य, कॉंग्रेस पक्षाचा एक सदस्य, भाजपाचा एक सदस्य, काही रिटायर्ड महापालिकेचे अधिकारी यांची महापौरांच्या अध्यक्षतेखाली आपण एक कमिटी बनवू. ते लोक प्रत्येकाच्या घरी जातील आणि ते चेक करतील.

**मा. आयुक्त :-**

त्याला टाईम बॉन्ड द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण त्यांना डिसेंबरला टाईम बॉन्ड दिलेला आहे.

**दिनेश जैन**

याच्यामध्ये आयुक्त साहेब कसे आहे, आपण एकदा रजिस्ट्री केल्यानंतर त्याचे काही करु शकणार नाही. अगोदर आपण चौकशी करुन त्याला परत आपण एकदा दिले तर बरे होईल. म्हणून आपण असा ठराव दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

रजिस्ट्री आपण रस्त्यावर किंवा बेघर यांच्यासाठी नाही.

**दिनेश जैन :-**

हे ६८ घरे जी दिलेली आहेत त्यांना आपण केली तर नंतर आपल्याला प्रॉब्लम होईल. आपण एकदा चौकशी करुन नंतर दिले तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, शिवसेना पक्षातला एक सदस्य आणि काँग्रेस पक्षाचा एक सदस्य त्यांची नावे घ्या. त्या हिशोबाने देऊ.

**मा. महापौर :-**

तुम्ही आत्ताच नावे देऊन टाका.

**प्रकरण क्र. ४० :-**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका कायम स्वरुपी हस्तांतरीत करणेबाबत.**

ठराव क्र. ४७ :-

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमश्राफल्य आवास योजनें तर्गत राज्यातील महानगरपालिका /नगरपालिका सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्यांची सेवा 25 वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारां च्या निधना नंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून मालकी हक्काने अहस्तांतणीय स्वरूपात 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत वाटप करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : सकानि-2007/प्र.क्र.176/2007/नवि-06 दि.22 आक्टोबर 2008 अन्वये धोरण आहे.**

**यानुसार मिरा -भाईंदर महानगरपालिकेमार्फत 68 सफाई कामगारांना सुविधा क्षेत्र भूखंडावर बांधलेल्या सदनिका 2015 मध्ये वाटप करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये फार मोठ्या प्रकारात गैरप्रकार झाल्याचे वाटते ज्याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे . त्याकरीता महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम चे कलम 31 अन्वये महापौरांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | श्रीम. डिम्पल मेहता | अध्यक्ष |
| 2 | श्री. सुरेश खंडेलवाल | भाजपा नगरसेवक |
| 3 | श्री. हसमुख गेहलोत | भाजपा नगरसेवक |
| 4 | श्री. दिनेश जैन | भाजपा नगरसेवक |
| 5 | | शिवसेना नगरसेवक |
| 6 | | काँग्रेस नगरसेवक |
| 7 | | शहर अभियंता |
| 8 | महापालिकेचे निवृत्त अधिकारी | महापालिकेचे निवृत्त अधिकारी |
| 9 | महापालिकेचे निवृत्त अधिकारी | महापालिकेचे निवृत्त अधिकारी |
| 10 | | विभाग अधिकारी (सचिव) |

**तसेच 2 महापालिकेचे निवृत्त अधिकारी सखोल चौकशी करीता नियुक्त करावे व त्यां ना प्रती सदनिका 1000/- रु मानधन देण्यात यावे.**

**वरील समितीस प्रशासनाच्या संबंधीत विभागाने आवश्यक ती माहिती तात्काळ पुरविण्यात यावी . समिती सचिवानी अध्यक्षांच्या परवानगीने वेळोवेळी बैठका घेवून संपूर्ण प्रकरणाचा अहवाल दि .31 डिसेंबर 2019 पूर्वी महापालिकेपूढे सा दर करावयाचा आहे . जेणेकरुन महापालिका कर्मचाऱ्यांना शासनाच्या निर्देशानूसार करारनामे करुन घरांचा कायमस्वरुपी ताबा देणे शक्य होईल. तरी समितीने लवकरात लवकर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**विनोद म्हात्रे :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता भाडे दराने न देता फक्त दैनंदिन संचलन , देखभाल व दुरूस्ती करीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेच्या अनुषंगाने सदर जागा मिळणेबाबत खालील संस्थेचे अर्ज प्राप्त झाले आहेत . मोर्वा येथील बालवाडी व्यायामशाळा इमारत ज्या जागेवर आहे ती जागा राधाकृष्ण देवस्थान ट्रस्टी व श्री . काशिनाथ गोविंद पाटील यांच्या मालकीची असून श्री. राधाकृष्ण मंदिर, मोर्वा यांनी देखिल सदर जागा देखभाल संचलनासाठी देण्याची मागणी केलेली आहे. तसेच उत्तन व्यायमशाळा दैनंदिन संचलन व देखभालीसाठी मे. मिशन लोकहीत सामाजिक संस्था, उत्तन यांनी मागणी केलेली आहे. सदर प्रस्तावानुसार अ.क्र. 1 मोर्वा, व्यायामशाळा इमारत श्री. राधाकृष्ण मंदिर मोर्वा या संस्थेस व उत्तन व्यायमशाळा इमारत मे. मिशन लोकहीत सामाजिक संस्था, उत्तन यांना तीन वर्ष मुदतीसाठी संचलन , देखभाल व दुरूस्तीसाठी करारनामा करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**जयेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे. आयुक्त साहेब याच्यात आमच्याकडे एक विरंगुळा केंद्र आपण मंजूर केलेले आहे. त्याला जेष्ठ नागरीकांसाठी समाविष्ठ करायचे आहे.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते. प्रकरण क्र. ४१ मध्ये उत्तन व्यायाम शाळा, गोषवाऱ्यात उत्तन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या नावाने अर्ज करुन ३ महिने झाले. आज तुम्ही गोषवाऱ्यामध्ये हे नाव असताना आता ठरावामध्ये दुसरेच नाव ॲड करत आहात. तर त्याचा खुलासा करावा. कारण अर्ज एकच होता. गेल्या महासभेत तो पुढच्या महासभेला ठराव आपण पारित केला की पुढच्या महासभेला एकच अर्ज सादर असताना अचानक दुसरी कोणती तरी संस्था म्हणजे गोषवारा मिळाल्यानंतर दुसरी संस्था जर अर्ज करते आणि त्याचा विचार केला जातो आणि पहिली जी संस्था अर्ज सादर केलेला होता, गोषवाऱ्यात नाव होते. तरी ती डावलून दुसऱ्या संस्थेला देण्यामागचे कारण काय आहे त्याचा मला खुलासा करावा.

**निलम ढवण :-**

ठराव कोणी वाचला तो ठराव पुन्हा वाचा. संस्थेचे नाव सांगा.

**नगरसचिव :-**

उत्तन व्यायाम शाळा इमारत, मे. मिशन लोकहित सामाजिक संस्था, उत्तन.

**शर्मिला बगाजी :-**

त्यांचा अर्ज कधी सादर झाला आहे आणि ह्या संस्थेचा अर्ज कधी सादर झाला आहे. याच्याबद्दल जरा खुलासा करावा.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, आपण शब्द दिला होता की आता जे गोषवाऱ्यात दिलेले आहे त्यालाच आणि पहिल्या पासून मागणी असल्यामुळे त्यांनाच देण्यात येईल.

**शर्मिला बगाजी :-**

संस्था अवैध असेल तर ते तरी आम्हाला कळवावे.

**मा. आयुक्त :-**

हे नविन आहे की जुने आहे? ही जी उत्तन व्यायाम शाळा आहे ही नविन बांधलेली आहे की जुनी आहे. आता तिथे कोणी वापर करीत आहे का?

**शर्मिला बगाजी :-**

जी जुनी व्यायाम शाळा होती ती आपण.....

**मा. आयुक्त :-**

नव्याने चांगली केली.

**शर्मिला बगाजी :-**

आधी फक्त आमदारांनी चांगली केली.

**मा. आयुक्त :-**

कोणी वापर करते का?

**शर्मिला बगाजी :-**

वापर आहे ना. आताही जुने जीमसाठी वापर करतो. फक्त आपण भाडे घेत नव्हतो.

**मा. आयुक्त :-**

आपण भाडे आताही घेत नाही. फक्त ते वापर करण्याबद्दल आहे.

**शर्मिला बगाजी :-**

आता ही वापर होत आहे सर.

**मा. आयुक्त :-**

यांचे नाव बदलले तो आक्षेप आहे.

**शर्मिला बगाजी :-**

संस्था बदललेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिशन लौकीक संस्था जी आहे त्या संस्थेने पण अर्ज केला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

पण कधी केला? निविदा झाली आहे. ॲडव्हरटाईज नंतर आमचा ठराव होता. लास्ट टाईम पण तोच इश्यु तुम्ही क्रिएट केला की, आपण पुढे ढकलूया. जर गोषवाऱ्यात हा विषय येत असेल तर परस्पर तुम्ही कशाला चेंज करता.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

चर्चा झाल्याच्या नंतर विषय ठरला होता. मग तुम्ही ठरावात चेंजेस का करत आहात? आपण जेव्हा ज्यावेळी एकत्र बसतो, त्या ठरावावर कोणत्या संस्थेला द्यायचे हे फायनल झाल्यानंतर तुम्ही संस्थेचे नाव का चेंज करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण ते मिशन लौकीक लाच आपण दिलेले आहे.

**शर्मिला बगाजी :-**

त्या पिरीयडमध्ये तो विषय आला आहे का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आपण असे करु नका. जेणेकरुन आम्हाला अंधरात ठेवायचा प्रयत्न करु नका. ज्या विषयावरती मी बोलतो ते आमच्या समोर झाला आहे म्हणून तुम्हाला मी सांगतो. त्या विषयावर तुम्ही त्या संस्थेचे नाव चेंज का केले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिशन लौकीक ह्या संस्थेने पण अर्ज केला होता त्याच्यामुळे त्यांनी ते.......

**निलम ढवण :-**

अर्ज केला तर आम्ही शहानिशा केली होती. महापौर मॅडम, उपमहापौर साहेब होते. सगळ्यांनी सांगितले की, जे गोषवाऱ्यात आहे त्यालाच दिले जाईल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मोठमोठे विषयांना आम्ही गपचुप बसतो याचा अर्थ असा नाही तुम्ही आम्हाला अंधारात ठेवून कोणती कामे करत असाल तर ते योग्य नाही.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाचा वेळ जास्त न घेता याच्यामध्ये माझी विनंती राहील.

**निलम ढवण :-**

ठराव बदलायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाने जे सादर केले आहे त्याला मान्यता असावी आणि एखाद्याला बदलायचे असेल तर रितसर प्रस्ताव आला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पेन्डीग ठेवा.

**मा. आयुक्त :-**

पहिल्या याच्यात आपण पेन्डीग ठेवला. परत पेन्डीग ठेवत आहोत.

**निलम ढवण :-**

पेन्डीग नाही ठेवायचे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

याच्यात आपण मानधन घेत नाही, याच्यात काही भाडे नाही. तिथे लोकांना जे आवश्यक आहे ते द्या ना. आपल्या सदस्या आहेत त्यांनी दिलेला प्रस्ताव तर माझी आपल्याला विनंती राहील, आम्ही गोषवाऱ्यात जे सबमिट केलेले आहे त्याला मान्यता द्यावी. हा विषय पुढच्या सभेत घ्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर मिशन लौकीकने पण अर्ज केलेला आहे.

**निलम ढवण :-**

ते नंतर केले असेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विथ ईन टाईम लिमिटमध्ये त्यानंतर ती निविदा भरलेली आहे.

**निलम ढवण :-**

ध्रुवजी, गोषवारा एवढे सगळे देऊन आढावा मिटींग झाली तरी तुम्ही शांत का होता मग?

**मा. आयुक्त :-**

त्यांना एका वर्षाची संधी द्या. त्यांचे कामकाज बघा. कामकाजामध्ये सुधारणा वाटली नाही तर तुम्ही परत निर्णय घ्या.

**शर्मिला बगाजी :-**

याच्यामध्ये कोणता वाद नाही. जर तुम्हाला ती संस्था अवैध वाटत होती तर आधीच कळवायचे.

**मा. महापौर :-**

आपण नंतर निर्णय घेवू.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रशासनाकडून विषय आलेला आहे. त्या विषयाला तुम्ही पूर्ण.......

**शर्मिला बगाजी :-**

गोषवाऱ्यात विषय असताना अर्ज कधी आला. जेव्हा ॲडव्हरटाईज दिलेली तेव्हा अर्जच नव्हता. काहीही असताना तुम्ही काहीही कोणतेही नाव चिटकवून घ्याल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

उपमहापौर साहेब, तुम्ही होते त्यावेळी हा विषय आपण घेतला होता. त्या विषयावर चर्चा पण झाली होती. ठरावामध्ये दुसऱ्या संस्थेचे नाव कसे आले?

**निलम ढवण :-**

आपण पण सांगितले होते महासभेत परत विषयावर वाद नको म्हणून.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आम्ही फक्त तुम्हाला आठवण करुन दिली. त्या संस्थेचे आले होते जिच्याकडे आहे त्याच संस्थेला रेग्युलर करावे म्हणून.

**शर्मिला बगाजी :-**

नसेल द्यायचे तर त्यांनी मला लेखी उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

आपण पुढच्या महासभेमध्ये विषय घेऊ. नंतर ठरवू.

**निलम ढवण :-**

नाही. तीन महिने झाले. आता तुमची महासभा होणार आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, तुमच्या ठरावात बदल झाला आहे. बाकी विषय सेम आहे. ठरावात बदल आहे. तुम्ही ठराव चेंज करा.

**मा. महापौर :-**

आपण रितसर घेवू.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

गोषवाऱ्यात क्लियर दिलेले आहे त्याच्यामध्ये तुम्हाला फक्त नाव चेंज करायचे आहे.

**निलम ढवण :-**

जे नाव गोषवाऱ्यात आहे ते नाव ठरावात तुम्हाला टाकायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

जे प्रशासनाने दिले आहे त्याचा निर्णय करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

पुढच्या महासभेमध्ये घेवू.

**निलम ढवण :-**

मॅडम, बाकी सर्व परफेक्ट आहे. गोषवाऱ्यामध्ये नावात फक्त बदल करु शकता ना.

**मा. महापौर :-**

ठरावामध्ये वेगळे आहे म्हणून आपण पुढच्या महासभेमध्ये घेवू. पुढच्या बैठकीत आपण चर्चा करु.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मॅडम, एवढे सर्व करुन पण तुम्ही सांगता हे चुकीचे आहे. आम्हाला पण तुम्ही सगळ्या बाबतीत विश्वासात घेतले. तुम्ही सांगु शकता नाव चेंज करुन द्या. ठरावामध्ये फक्त नाव चेंज करुन घ्यायचे आहे. मॅडम असे चालत नाही ना ठरावात नाव चेंज करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम हा विषय पेन्डीग ठेवा. आधे घंटे के लिए इस ठराव को पेन्डीग रहेगा।

**मा. महापौर :-**

आता पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, **मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून अधिकचे २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिळणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर शहर हे मुंबई व ठाणे लगत असल्याने व्यवसाय व कामानिमीत्ताने मोठया प्रमाणात जनता वास्तव्यास येत आहे. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात म्हाडा व मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत गृहसंकुले बांधण्यात आलेली आहेत व प्रस्तावीत आहेत. नियमाप्रमाणे सदर संकुलांना मुलभूत सुविधा अंतर्गत पाणी पुरवठा देणे अपरिहार्य आहे.

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार 8.14 लक्ष इतकी असून सध्याची सन 2019 ची लोकसंख्या अंदाजे 12.06 लक्ष असून पाण्याची मागणी 211द.ल.लि. प्रति दिन आहे. मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज 86.00 द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (50 + 75 = 211 द.ल.ली.) असा एकूण 211 द.ल.ली. पाणी मंजूर आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी सुर्या धरण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून 218 द.ल.ली. पाणी आरक्षीत आहे. मात्र सदरचे पाणी शहरात उपलब्ध होण्यासाठी लक्षणीय कालावधी अपेक्षीत आहे. सबब किमान सन 2021 पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी बारवी धरणातून अधिकचे 40 द.ल.ली. पाणी मंजूर झाल्यास सदरचे पाणी शहरापर्यंत आणण्यासाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधा सक्षम आहेत. त्यासाठी कोणत्याही प्रकारची जादाची कामे करणे अपेक्षीत नाही तसेच बारवी धरणाची उंची 4 मी. ने वाढलेली आहे.

तरी शहराची सन 2021 ची पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी एम.आय.डी.सी. बारवी धरणातून मिरा भाईंदर शहरासाठी अधिकचे ४० द.ल.ली. पाण्याचे आरक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करणेस ही सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुरेखा सोनार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४२ :-**

**मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणातून अधिकचे २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर शहर हे मुंबई व ठाणे लगत असल्याने व्यवसाय व कामानिमीत्ताने मोठया प्रमाणात जनता वास्तव्यास येत आहे. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात म्हाडा व मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत गृहसंकुले बांधण्यात आलेली आहेत व प्रस्तावीत आहेत. नियमाप्रमाणे सदर संकुलांना मुलभूत सुविधा अंतर्गत पाणी पुरवठा देणे अपरिहार्य आहे.

मिरा-भाईदर शहराची लोकसंख्या सन 2011 च्या जनगणनेनुसार 8.14 लक्ष इतकी असून सध्याची सन 2019 ची लोकसंख्या अंदाजे 12.06 लक्ष असून पाण्याची मागणी 211द.ल.लि. प्रति दिन आहे. मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज 86.00 द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (50 + 75 = 211 द.ल.ली.) असा एकूण 211 द.ल.ली. पाणी मंजूर आहे. मिरा भाईंदर शहराची भविष्यातील पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी सुर्या धरण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून 218 द.ल.ली. पाणी आरक्षीत आहे. मात्र सदरचे पाणी शहरात उपलब्ध होण्यासाठी लक्षणीय कालावधी अपेक्षीत आहे. सबब किमान सन 2021 पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी बारवी धरणातून अधिकचे 40 द.ल.ली. पाणी मंजूर झाल्यास सदरचे पाणी शहरापर्यंत आणण्यासाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधा सक्षम आहेत. त्यासाठी कोणत्याही प्रकारची जादाची कामे करणे अपेक्षीत नाही तसेच बारवी धरणाची उंची 4 मी. ने वाढलेली आहे.

तरी शहराची सन 2021 ची पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी एम.आय.डी.सी. बारवी धरणातून मिरा भाईंदर शहरासाठी अधिकचे ४० द.ल.ली. पाण्याचे आरक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करणेस ही सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, **आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिका, सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था** DPR **मंजूरीकरीता.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 403 द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास 218 द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण 98 कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत 48 द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 218 द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.

चेणे येथील संतुलन टाकी पासून मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.

याकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यानुसार मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सदर प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

अ) उंच पाणी साठवण टाकया बांधणे,

ब) वितरण व्यवस्था, फिडरमेंन /ट्रान्समिशनमेन अंथरणे,

क) चेने येथील मुख्य संतुलन टाकीपासून घोडबंदर रस्त्याने एम.एम.आर.डी.ए. यांनी संपादित केलेल्या जमिनीतून व तेथून पुढे फाउंटन हॉटेल ते दहिसर चेक नाका पर्यंत 1700 मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी नॅशनल हॉयवेच्या डाव्याबाजूने रस्त्यातून अंथरणे. इत्यादी बाबींचा समावेश आहे.

मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल दोन फेजमध्ये असून फेज-1 ची रक्कम रु. 418 कोटी व फेज-2 ची रक्कम रु. 76 कोटी आहे. यापैकी प्रथमत: फेज-1 ची कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी अमृत योजना या शिर्षकाखाली मनपा हिस्सा मध्ये रु.60.00 कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास आय.आय.टी. मुंबई / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियांतंर्गत मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

तरी सदर कामातील फेज -1 च्या कामाच्या रक्कम रु.418 कोटी खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**दौलत गजरे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आयुक्त साहेब, सुर्या प्रकल्प २१८ एम.एल.डी. दशलक्ष पाणी पुरवठा योजना साधारण आघाडी सरकारच्या काळात राष्ट्रवादी आणि काँग्रेस सरकारच्या काळात हे २१८ एम.एल.डी. आपल्याला सँग्शन झाले. इतर विषयांच्या बाबतीत राज्य सरकार एवढे आग्रही आहेत प्रत्येक निर्णय तातडीने घेणे. आज ह्या योजनेला जवळ-जवळ ७ वर्ष झाली. ७ वर्षामध्ये आपण फक्त ठरावच बनवत आहोत. कधी डी.पी.आर. चा ठराव कधी रस्त्याचा ठराव, कधी टाकी बांधण्याचा ठराव साहेब गेल्या २ वर्षापूवी आदरणीय मुख्यमंत्र्यांनी ह्या योजनेचे भुमिपुजन केले. लोकांना ही आशा दाखवली की २४ तास पाणी ह्या योजनेअंतर्गत ह्या शहराला मिळणार आहे. आज दोन वर्ष झाली तुमच्या मागच्या गोषवाऱ्यामध्ये मागचा जो विषय आहे ४२ नंबर त्याच्यामध्ये सुध्दा लिहीलेले आहे की सुर्या डॅमचे पाणी यायला लक्षणीय कालावधी लागणार आहे. लक्षणीय म्हणजे किती? बी.जे.पी. वाल्यांनी सुध्दा ॲग्री केले ते बरं झाले. ठरावामध्ये सुध्दा तसेच लिहीलेले आहे. लक्षणीय कालावधी लागणार आहे. म्हणजे लोकांनी काय समजायचे. आज जो ५० तासाने पाणी येत आहे प्रशासनाचा हा हलगर्जीपणा आहे असे मी म्हणेन. ७ वर्ष झाली.

**मा. उपमहापौर :-**

लक्षणीयचा अर्थ समजून घ्या.

**अनिल सावंत :-**

आम्हाला आमच्या परीने कळते तुम्ही तुमच्या परिने सांगु नका. लक्षणीय कालावधी लागणार आहे म्हणून आपण बारवी डॅमचे २५ एम.एल.डी. पाणी सँग्शन करुन घेत आहोत.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही दिर्घ कालावधी सारखे लक्षणीयचे उच्चार करायला लागले.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही गोषवाऱ्यामध्ये लिहीले आहे म्हणून काय अर्थ बदलत नाही. महापौर मॅडम जो अर्थ आहे तो लक्षणीय कालावधी लागणार आहे. म्हणजे लक्षात ठेवण्यासारखे नाही तो लक्षणीय. ही योजना खरोखरच ह्या योजनेतून ह्या शहराला पाणी मिळणार आहे की नाही बी.जे.पी. चे खासदार आहेत. ते सांगतात मिरा भाईंदर शहराला आम्ही एक बुंद पाणी देणार नाही. वसई विरार महापालिका सांगते की ह्या मिरा भाईंदर शहराला सुर्या डॅमचे एक बुंद पाणी देणार नाही. ८० किलो मीटरची पाईप लाईन टाकायची आहे. त्याच्यासाठी किती परमिशन मिळाल्या आहेत. आम्ही फक्त महासभेत ठराव करत आहोत. डी.पी.आर, कधी रस्ता, कधी टाकी, कधी एम.एम.आर.डी.ए ला अधिकार देणार आहोत. म्हणजे नक्की ह्या योजनेबाबत वस्तुस्थिती काय आहे? जसे मुख्यमंत्र्यांनी दोन वर्षापूर्वी लॉलीपॉप दिले तसेच लॉलीपॉप....................

**मा. उपमहापौर :-**

लॉलीपॉप वगैरे सांगु नका ३४ महिन्याचा कालावधी त्या योजनेसाठी आहे...........

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

अजूनपर्यंत ३४ महिन्याचा कालावधी कमी केलेला नाही.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम पहिला आयुक्तांना निवेदन देऊ द्या. वाकोडे साहेब आहेत पहिला त्यांना निवेदन देऊ दे त्यांना काही डाऊट असेल तर तो विचारेल.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर, उपमहापौर आणि सर्व सभागृह सन्मा. सदस्य यांनी पाणी पुरवठ्याच्या प्रगतीबाबत काही आक्षेप घेतले काही मुद्दे उपस्थित केले त्याचा मी खुलासा करतो. मिरा भाईंदर शहरासाठी यापूर्वी एक ठराव झाला. बारवीमधून आपण जास्तीचे २५ एम.एल.डी. रिझर्व्हेशनचा ते लगेच आम्ही शासनाला पाठवून ते ॲडिशनल सुध्दा आम्ही मंजूर करुन घेऊ. आता आपल्याकडे स्टेममधून ८६ एम.एल.डी. एम.आय.डी.सी कडून १२५ एम.एल.डी आणि सुर्यातून २१८ एम.एल.डी असे आपले सॅग्शन आहे. त्यामुळे याच्यात कुठली दिरंगाई नाही. फार टाईम बॉंडमध्ये हे काम चालू आहे. सुर्या प्रोजेक्ट एम.एम.आर.डी.ए च्या माध्यमातून इम्पलीमेंट होत आहे आणि आपला सगळा हिस्सा अमृतचा आपण एम.एम.आर.डी.ए ला वर्ग केलेला आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून ह्या राज्याचे मा. राज्यपाल महोदय यांचा एकदा आढावा घेतलेला आहे. ह्या सुर्याच्या बाबतीत आलेल्या अडचणी बाबतीत वगैरे त्यानंतर एम.एम.आर.डी.ए चे मेट्रोपोलियन कमिशनर यांच्याकडे वेळोवेळी याचा आढावा चालू आहे. आपल्याला मागच्या याच्यामध्ये आपण बटरफ्लाय मेन चेण्याच्या ठिकाणी आरक्षण बदलल्याचे सुध्दा विषय ह्या ठिकाणी सुध्दा घेतला होता. आता ह्या सगळ्या बाबी होत आलेल्या आहेत. साडे तीन किलो मीटर पाईप लाईनचे काम पूर्ण झालेले आहेत. सगळे मटेरियल त्या ठिकाणी प्रोक्युमेंट झालेली आहेत आणि मोठ्या प्रमाणात त्या कामाला आता गती आलेली आहे. तर सायमन्टेनेसली एकदा पाणी उपलब्ध झाल्यानंतर हा सगळा फ्युचर प्लानसाठी आहे. हा जो २१८ एम.एल.डी आहे पुढच्या २०३० पर्यंतच्या कालावधीचा आणि त्याचा पुढच्या कालावधीसाठीचा हा नियोजन आहे. तर आपल्याकडे साधारणतः आता ३० टाक्या आहेत. ३३ एम.एल.डी चे तर आपल्याला नविन ३० टाक्या याच्यामध्ये प्रस्तावित केले. आता जो गोषवारा सन्मा. सभापती महोदयांनी वाचला त्यामध्ये ३० टाक्या आम्ही ॲडीशनल प्रस्तावित केलेल्या आहेत आणि त्याची साठवणूक क्षमता साधारणतः ६० एम.एल.डी आहे. म्हणजे वन थर्ड साठवणूक क्षमता असेल तर भविष्यामध्ये आपण २४-७ चा निर्णय करु शकतो आणि प्रेशर सगळ्या शहराला व्यवस्थित राहू शकतो. तर आपल्याला साठवणूक क्षमता आता कमी आहे म्हणून आपल्याकडे ते टाईम गॅप होतो आणि त्याच्यामुळे आपल्याला वेळ जास्त जातो. तर आपल्याला साठवणूक क्षमता वाढविणे फार आवश्यक होते. तर ह्या आताच्या दोन फेजचा डी.पी.आर आम्ही केलेला आहे. ४१८ कोटी आणि ७६ कोटी ज्या ठिकाणी वस्तीच झाली नाही नो डेव्हलेपमेंट झोन आहे. भविष्यात होईल की नाही अनुमती मिळतील की नाही ह्याच्यासाठी ७६ कोटीचे रिझर्व्ह ठेवलेले आहे. सेकंड फेजमध्ये आणि पहिल्या फेजमध्ये आपण ४१८ कोटीचा डी.पी.आर केलेला आहे. त्यामध्ये ह्या ३० टाक्या आणि वितरण व्यवस्थेची आवश्यक ती त्यामध्ये इन्व्हॉलमेंट आहे. हा प्राथमिक ठराव आहे याच्यानंतर आय.आय.टी. कडून याला अप्राइझल केले जाईल आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ आहे त्याच्याकडून हा डी.पी.आर ला तांत्रिक मान्यता घेतली जाईल आणि तो प्रस्ताव शासन अनुदानासाठी आपल्या ठरावाच्या मान्यतेनंतर राज्य शासनाकडे नगरोत्थान किंवा अमृत योजनेमध्ये हा सादर केला जाईल. तर सुर्याची प्रगती खुप मोठ्या प्रमाणात आहे म्हणून आपल्याला सेकंड ज्याच्या अंग आहे शहरातला इंटरनल डिस्ट्रीब्युशन तर ह्या डी.पी.आर ला मान्यता देणे आवश्यक आहे.

**अनिल सावंत :-**

मान्यता आमची आहेच विरोध नाही. परवानग्या कुठच्या बाकी आहेत?

**मा. आयुक्त :-**

रिझर्व्हेशन आपले आहे. राज्य शासनाकडून दुसरी परवानगीचा विषय नाही.

**अनिल सावंत :-**

पाईप लाईन टाकायला जर फॉरेस्ट डिपार्टमेंट नॅशनल हायवे तिथले आदिवासी त्यातल्या परवानग्या कुठच्या सर्व मिळाल्या आहेत की काही मिळायचे बाकी आहेत.

**सुरेश वाकोडे :-**

आपला जो डी.पी.आर आहे तो इंटरनल कामाला डी.पी.आर आहे.

**अनिल सावंत :-**

त्या डी.पी.आर ला आमचा विरोधच नाही. त्या स्किम बद्दल मी बोलत आहे जी पाईप लाईन टाकणार आहात २०० किलो मीटर फॉरेस्टची जागा आहे नॅशनल हायवेची जागा आहे.

**मा. आयुक्त :-**

सध्या आपले खालचे काम बंद आहे. त्याच्या कालावधीचा जर विषय घेतला त्याचे सुध्दा ३० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे आम्ही अपेक्षा करावी की २०३० मध्ये पाणी मिळेल.

**मा. आयुक्त :-**

लक्षणीय कालावधीत लवकरात लवकर ते होऊन जाईल. माझी मजबुरी एवढीच आहे की मी इच्छा शक्तीने काम करतो. काम करतो याच्यासाठी जास्त टार्गेट होतो असे आता मला वाटायला लागले आहे. पूर्वीचे मिरा भाईंदर मला जे प्रेम मिळाले आहे तेच प्रेम राखा. कामासाठी जर टार्गेट होत असेल तर मला थोड झटावे लागेल.

**अनिल सावंत :-**

३४ महिन्याचे टार्गेट आहे. ३४ महिन्यामध्ये पूर्ण होणार आहे. २८ महिने मला वाटते झालेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

माझा डी.पी.आर ला विरोध नाही. २ वर्षापूर्वी मुख्यमंत्री आमीष दाखवून गेले त्यांचे काय झाले. त्याचे उत्तर असेल तर द्या.

**मा. उपमहापौर :-**

ह्या सगळ्या गोष्टी रितसर होतात त्या रितसर होतील चिंता करु नका.

**अनिल सावंत :-**

ओरडून वस्तुस्थिती बदलत नाही.

**मा. उपमहापौर :-**

हे तुम्हीच समजून घ्या. हे वाक्य पहिले तुम्ही आत्मसात करा. ओरडून बदलणार नाही.

**अनिल सावंत :-**

व्यक्तीगत आरग्युमेंट तुम्ही करु नका. एलिगेशन करु नका. माझ्या जवळ भरपूर मुद्दे आहेत. माझी ती सवय नाही मी डी.पी.आर बद्दल बोलणार आणि स्किम बद्दल बोलणार?

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४३ :-**

**<u>आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)</u> - मिरा भाईंदर महानगरपालिका, सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था** DPR **मंजूरीकरीता.**

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 403 द.ल.ली. पाणी पुरवठा राबविण्यांत येणार आहे. या योजनेंतर्गत मिरा भाईंदर शहरास 218 द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी सुर्या धरणापासून मिरा भाईंदर शहरापर्यंत एकूण 98 कि.मी. लांबीची जलवाहिनी तसेच चेणे येथे वनखात्याच्या जागेत 48 द.ल.ली. क्षमतेची मुख्य संतुलन टाकी बांधून चेणे येथील टाकीपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 218 द.ल.ली. पाणी पुरवठा करणार आहे.

चेणे येथील संतुलन टाकी पासून मिरा भाईंदर शहरात पाणी आणणे व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था अंथरणे हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करावयाचे आहे.

याकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यानुसार मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला असून सदर प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश आहे.

अ) उंच पाणी साठवण टाकया बांधणे,

ब) वितरण व्यवस्था, फिडरमेंन /ट्रान्समिशनमेन अंथरणे,

क) चेने येथील मुख्य संतुलन टाकीपासून घोडबंदर रस्त्याने एम.एम.आर.डी.ए. यांनी संपादित केलेल्या जमिनीतून व तेथून पुढे फाउंटन हॉटेल ते दहिसर चेक नाका पर्यंत 1700 मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी नॅशनल हॉयवेच्या डाव्याबाजूने रस्त्यातून अंथरणे. इत्यादी बाबींचा समावेश आहे.

मे. वॉटरनेट कंन्स्लटिंग सर्व्हीसेस प्रा.लि. यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल दोन फेजमध्ये असून फेज-1 ची रक्कम रु. 418 कोटी व फेज-2 ची रक्कम रु. 76 कोटी आहे. यापैकी प्रथमत: फेज-1 ची कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये या कामासाठी अमृत योजना या शिर्षकाखाली मनपा हिस्सा मध्ये रु.60.00 कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास आय.आय.टी. मुंबई / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजूरी घेऊन त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियांतर्गत मंजूरीसाठी सादर करावयाचा आहे.

तरी सदर कामातील फेज -1 च्या कामाच्या रक्कम रु.418 कोटी खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. दौलत गजरे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कापुरबावडी बुस्टर पंप हाऊस येथील पंपींग मशिनरीचे वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता नुतनीकरण करुन अद्यावत करणे.**

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस एम.आय.डी.सी कडून 125 द.ल.ली. पाणी मंजूर आहे. त्यापैकी सद्यस्थित 90 द.ल.ली. पाणी उपलब्ध झालेले आहे. दि.25/06/2019 च्या विधानभवन मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये अजून 25 द.ल.ली. पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत एम.आय.डी.सी. स सुचना दिलेल्या आहेत.

एम.आय.डी.सी कडून प्राप्त होणारे पाणी प्रथम साकेत व कापुरबावडी येथून पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पाठविण्यात येते. साकेत येथिल विद्युत पुरवठा बंद झाल्यास अथवा काही अन्य कारणाने साकेत येथून पंपिंग करणे अशक्य झाल्यास एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर वाढून एम.आय.डी.सीची पाईपलाईन फुटणे/नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कापूरबावडी येथून जास्त प्रमाणात पंपिंग करुन एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर कमी करणे शक्य होऊ शकते. परिणामी एम.आय.डी.सी कडून प्राप्त झालेले पाणी अव्याहतपणे पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पुरवठा करणे शक्य होऊ शकेल.

कापूरबावडी येथिल पंपिंग मशिनरी 11 वर्षापूर्वी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यांची क्षमता सद्यस्थितीतील पाणी पुरवठा करण्यास तसेच उपरोक्त प्रमाणे परिस्थितीत उद्भवल्यास पुरेशी नाही. याकरीता पंपांची क्षमता वाढवणे, तद्नुशंगिक विद्युत उपकरणे नविन बसविणे, तसेच प्रेशर व पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे या करीता अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनीक उपकरणे बसविणे इ. कामे करणे आवश्यक आहे. उपरोक्त संपूर्ण परिस्थिती विचारात घेऊन कापूरबावडी येथिल बुस्टर पंपिंग स्टेशन मधून विद्युत/यांत्रिकी उपकरणे तसेच पाईपलाईन इ. पाणी पुरवठयाच्या वाढीव क्षमतेकरीता नुतनीकरण करुन अद्यावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण करणे आवश्यक आहे.

या कामाकरीता रु. 3,74,50,316/- रक्कमेचे अंदाज पत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये **'पाण्याची टाकी / मिटर कार्यशाळा / इतर बांधकाम'** या लेखाशिर्षाखाली मंजूर आर्थिक तरतूदी मधून करण्याचे प्रस्तावीत आहे.

तरी सदर कामास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुरेखा सोनार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये आपल्याला एकच वाक्य सांगतो आपण एम.आय.डी.सी कडून पूर्वी आता ३५ एम.एल.डी. जास्तीचे मिळालेले आहे. आपल्या असलेल्या वितरण व्यवस्थेतून म्हणजे पाईप मधूनच त्याला प्रेशर वाढवून घ्यायचा आहे. तर आपण ३ मोटारी बाळकुमला आहेत आणि साकेतला आहेत. तर आपण बाळकुम मोटारीची कॅपेसिटी वाढवत आहोत.

**प्रकरण क्र. ४४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कापुरबावडी बुस्टर पंप हाऊस येथील पंपींग मशिनरीचे वाढीव पाणी पुरवठा करण्याकरीता नुतनीकरण करुन अद्यावत करणे.**

**ठराव क्र. ५० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस एम.आय.डी.सी कडून 125 द.ल.ली. पाणी मंजूर आहे. त्यापैकी सद्यस्थित 90 द.ल.ली. पाणी उपलब्ध झालेले आहे. दि.25/06/2019 च्या विधानभवन मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये अजून 25 द.ल.ली. पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत एम.आय.डी.सी. स सुचना दिलेल्या आहेत.

एम.आय.डी.सी कडून प्राप्त होणारे पाणी प्रथम साकेत व कापुरबावडी येथून पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पाठविण्यात येते. साकेत येथिल विद्युत पुरवठा बंद झाल्यास अथवा काही अन्य कारणाने साकेत येथून पंपिंग करणे अशक्य झाल्यास एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर वाढून एम.आय.डी.सीची पाईपलाईन फुटणे/नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कापूरबावडी येथून जास्त प्रमाणात पंपिंग करुन एम.आय.डी.सी च्या पाईपलाईन वरील प्रेशर कमी करणे शक्य होऊ शकते. परिणामी एम.आय.डी.सी कडून प्राप्त झालेले पाणी अव्याहतपणे पंपिंग करुन मिरा-भाईंदर शहरास पुरवठा करणे शक्य होऊ शकेल.

कापूरबावडी येथिल पंपिंग मशिनरी 11 वर्षापूर्वी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यांची क्षमता सद्यस्थितीतील पाणी पुरवठा करण्यास तसेच उपरोक्त प्रमाणे परिस्थितीत उद्भवल्यास पुरेशी नाही. याकरीता पंपांची क्षमता वाढवणे, तद्नुशंगिक विद्युत उपकरणे नविन बसविणे, तसेच प्रेशर व पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे या करीता अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनीक उपकरणे बसविणे इ. कामे करणे आवश्यक आहे. उपरोक्त संपूर्ण परिस्थिती विचारात घेऊन कापूरबावडी येथिल बुस्टर पंपिंग स्टेशन मधून विद्युत/यांत्रिकी उपकरणे तसेच पाईपलाईन इ. पाणी पुरवठयाच्या वाढीव क्षमतेकरीता नुतनीकरण करुन अद्यावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण करणे आवश्यक आहे.

या कामाकरीता रु. 3,74,50,316/- रक्कमेचे अंदाज पत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च सन 2019-20 च्या अंदाजपत्रकामध्ये **'पाण्याची टाकी / मिटर कार्यशाळा / इतर बांधकाम'** या लेखाशिर्षाखाली मंजूर आर्थिक तरतूदी मधून करण्याचे प्रस्तावीत आहे.

तरी सदर कामास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवन रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**तारा घरत :-**

महापौर मॅडम माझी विनंती आहे आपल्या ज्या ठाण्याचा टाक्या आहेत त्याच्या लाईन नवघरच्या गोडदेवला, गोडदेवच्या नवघरला अशा ज्या लाईन आहेत त्यांचा आपल्याकडे नकाशा असेल तो जरा सगळ्यांना देण्यात यावा अशी आमची विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

तो दिला जाईल. ३० टाक्यांची लोकेशन आणि त्याची कनेक्टीव्हिटी कशी राहील हे आपल्या सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**विनोद म्हात्रे :-**

महापौर मॅडम विषय ४५ कांदळवनाचा आहे. माझा आवडीचा विषय आहे. मला याच्याबद्दल थोडे बोलायचे आहे. आपले मिरा भाईंदर शहर जवळ जवळ ८० टक्के पेक्षा जास्त समुद्र किनारा भिडलेला आहे. त्याच्यामुळे जो समुद्र किनारा पट्टा आहे ऑलरेडी तिथेच हजार नाही लाख नाही तर करोडो कांदळवनांची झाडे आहेत. आता आपण जो विषय आणलेला आहे जवळ जवळ आपल्याला ५८ हजार झाडे लावायची आहेत. ५८ हजार झाडे आपण कुठे लावणार आहात. एकतर याचा मला खुलासा द्यावा. सेकेंड थिंक आपण इकडे मॅंग्रोजची रोपे खरेदी करणार आहोत. मला माहिती नाही ह्या उभ्या आयुष्यात मॅंग्रोजची रोप कुठल्या नर्सरीमध्ये मिळतात. कारण त्याचा रेट इथे दिलेला आहे. १७८ रुपये रोपाची किंमत ही रोप कुठल्या नर्सरीमध्ये मिळतात मला माहिती नाही कारण माझा उभ्या आयुष्यात ह्या समुद्र किनारी त्याचे

बीज जे पडतात आणि त्यानेच मँग्रोज उत्पन्न होतात तर मला वाटत  नाही आपल्याला रोप खरेदी करावे लागतील. ॲक्च्युअली हा अननेससरी खर्च आहे. आज आपण तसे बघितले तर जो समुद्र किनारा आहे उत्तनपासून गोराईपासून इथे जर आपण झाडे लावण्याचा प्रयत्न केला तर समुद्राला जे महत्व आहे जे बाहेरुन पर्यटक येतात समुद्र किनारी मौज मजा करण्यासाठी आणि तिथे जर अशा प्रकारचे मँग्रोज लावले तर मला वाटत नाही तिथे समुद्र किनारा राहील आणि त्याच्यामुळे जे पर्यटक आहेत ते यायचे बंद झाले तिकडची लोक आगरी कोळी किनाऱ्यावर जे लोक आहेत आज समुद्र किनारा हा त्यांची उपजिविका आहे आणि तिथे पिकनिकसाठी येतात. तिथे जर मँग्रोज झाले तर तिथे कोणीही पिकनिकला येणार नाही. त्याच्यामुळे आमच्या आगरी कोळ्यांची तिथे उपासमारी उत्पन्न होणार आहे. त्याच्यामुळे आपण मँग्रोजच्या बाबतीत पूर्ण विचार करावा. आपल्याला जर झाडेच लावायची असतील तर अन्य झाडे खरेदी करुन ती शाळांमध्ये लावावीत. ती जास्त प्रमाणात लावा आणि याचा आपण पूर्त विचार करावा अशी माझी विनंती.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम आयुक्त साहेब मला वाटते ३-४ महिने आधीच हा ठराव आणलेला होता आणि फेटाळून घेतलेले होते. सचिव साहेब ठराव आलेला?

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाने प्रत्येक शहराला एक टार्गेट दिलेले आहे. वृक्षारोपणाचा मॅडम म्हणतात मागच्या याच्यात तसा हा विषय आणला होता. अजून ही दुबारा हा विषय आणलेला आहे. सन्मा. सदस्यांनी ज्या काही शंका उपस्थित केलेल्या आहेत त्याचा मी खुलासा करु इच्छितो. आपली रास्त मागणी आहे की आपण लहानाचे मोठे त्या पूर्ण मँग्रोजच्या परिसरात झालेले आहात. आपल्याला त्याची भौगोलिक दृष्ट्या आणि त्याच वैज्ञानिक किंवा बॉटॅनिकल नॉलेज आपल्याला व्यवहारीक आहे. ऑगस्ट सप्टेंबर महिन्यामध्ये त्याची परततात त्याची शेवटची लाट येते आणि ते जे रुजतात तिथे परत मँग्रोज होतात. तर तिथे दुसरे मँग्रोज कुठून लावायचे हा तुमचा मनातला प्रश्न आहे. हे पॉकेट असे आहेत हे समुद्र किनाऱ्याचे एंड पाईंटला नाही जिथे की पर्यटन खराब होईल हा विषय जे मँग्रोज ऑलरेडी दोन दोन किलो मीटरमध्ये आहेत. त्याच्यात काही पॉकेट असे आहेत ऊंच भाग आहे तिथे मँग्रोज नाहीत. ते पॉकेट आयडेन्टीफाय केलेले आहेत. गुगल बेस आणि राज्य शासनाचा विशेष सेल आहे. मँग्रोज रोपण करण्याचा मी एकटा करत नाही राज्यशासन करते आणि महापालिका करते. परिसरातल्या बऱ्याच संस्था करतात तर आपल्याला मा. फायनान्स मिनिस्टर तथा वनमंत्री मुनगुंटीवार साहेबांचा हा फार मोठा कार्यक्रम आहे आणि आपल्याकडे शहरामध्ये प्रमाणात जे झाडे लावायचे होते ऑलरेडी आमचा कार्यक्रम चालू आहे. आपल्या शहराचा भौगोलिक सिमा तुम्ही म्हणाल्याप्रमाणे तिन्ही बाजूला समुद्र आणि एका साईटला पर्वत आहे आणि आपल्याला जागेचे कस्टेन आहेत. म्हणून यामध्ये बी.जे.पी चे गटनेत्यांची चर्चा झाली होती. मागच्या सभेमध्ये याच्यावर खूप चांगली चर्चा झाली होती. गैरसमज असे होते की अशी यंत्रणा आहे की नाही कार्यक्रम होऊ शकतो की नाही. संबंधित फॉरेस्टच्या अधिकाऱ्यांना आपण त्या बैठकीत बोलविले होते आणि त्यांच्याकडून त्याचे प्रेझेंटेशन घेतले इव्हन स्टॅन्डिंग चेअरमन सुध्दा त्या दिवशी होते आणि त्याच्यातून हे निष्पन्न झालेले आहे की मध्ये मोठमोठे पॉकेट आहेत तिथे मँग्रोज नाही म्हणजे नविन मँग्रोजला एरिया वाढवायचा नाही. त्या पॉकेटमध्ये जे मँग्रोज विरहीत जागा आहेत तिथे लावायचे आहेत. कोळी बांधवांना त्रास होईल दुसऱ्या जागा व्याप करायच्या नाहीत त्या शासन महसूली जागा आहेत. तर ह्या ठिकाणी राज्य शासनाच्या मँग्रोज सेलकडून हे काम करायचे आहे. आपणाला विनंती राहील की हे आपण सँक्शन करावे. तर आपण फेटाळले तर मला माझ्या अधिकारात शासनाकडून मान्यता घेऊन हे मला करावे लागेल.

**गिता जैन :-**

साहेब अजून एक विचारायचे आहे. तुम्ही सांगितले उंच व जिथे जिथे मँग्रोज झालेले नाहीत.............

**मा. आयुक्त :-**

मॅडम आपण जर कधी फिरलात मोठमोठे पॉकेट व्हॅकेट आहेत.

**गिता जैन :-**

मी बरीच फिरलेली आहे साहेब गेल्या महासभेत गोंधळ झालेला मी कुठे कुठे फिरली म्हणून. मी फक्त एकच विचारते जिथुन जिथुन मँग्रोज नष्ट झालेले आहेत तिथे परत लावणार की नाही?

**मा. आयुक्त :-**

लावू ना.

**गिता जैन :-**

मी तेच विचारते मुर्धा खाडी जाके आओ वहाँ पे पुरा अतिक्रमण हो गया है मँग्रोज है ही नही।

**मा. आयुक्त :-**

खाडीला फिरले म्हणून मी सांगतो जसे पाण्याचे २-३ डि.पी.आर आलेले आहेत पुढच्या सभेमध्ये आपल्या शहरातल्या ९ खाडी पूर्णपणे नॅच्युरल महसुल रेकॉर्डप्रमाणे ते वाईंडींग करणे डेप्नींग करणे त्याचा डिटेल डी.पी.आर चे काम चालू आहे. तो महासभेत आम्ही घेऊ आणि पुढच्या पावसाळ्याच्या नाले सफाईचा पूर्वी शहरातली जी नाले सफाई होते तशी खाडीच्या एंडपर्यंत त्या खाड्या मोकळ्या केल्या जातील आणि हे एक मोठी अचिव्हमेंट महापालिकेची राहील. जेणेकरुन कोळी बांधवांना त्रास होतो. उदाहरण राई, मुर्धाच्या तिथुन आपण एंडला पुढे जातो तर दोन साईटने बोटी येत जात होत्या मिठागराचे जे कामकाज होते ते समुद्रातुन जात होते. याचा सगळ्याच्या सोबत मी फिरलेलो आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी प्रेसच्या लोकांशी मी सगळ्यांबरोबर फिरलेलो आहे. लोकांनी त्या खाडीचा एकदम छोटासा नाला करुन टाकला. त्याच्यामध्ये मँग्रोज एवढ्या प्रमाणात वाढलेले आहेत की आपल्याला त्याचे रिप्लान्टेशन करणे शिवाय पर्याय नाही. त्याचे एन्व्हायरमेंट क्लियरन्स सी.आर.झेड क्लियरन्स आणि हायकोर्टाची मान्यता आणि त्याचा डी.पी.आर येणाऱ्या कालावधीमध्ये आपल्यासमोर मी देतो आणि नविन सारख्या खाड्या मोठ्या केल्या जातील आणि त्याच्यात आलेल्या सर्व अतिक्रमण काढले जातील.

**विनोद म्हात्रे :-**

साहेब मला आपल्याकडून तीच अपेक्षा होती कामाला लवकरात लवकर सुरुवात करावी हीच इच्छा.

**गिता जैन :-**

मी फक्त हेच विचारत होते की आपले गुगल मॅप अनुसरुन कुठे कुठे लावणार त्याची आम्हाला डिटेल्स देणार का?

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय तुमचे चांगले निवेदन होते किंवा तुम्ही करा नाही केले तर मी करेल म्हणजे शासनाने तुम्हाला तसा अधिकार दिलेला आहे. शासनाचे आपल्याला धोरण आहे ज्या पोटतिडकीने तुम्ही हा विषय म्हणजे अंमलबजावणी करायची तुमची तयारी आहे खरी परिस्थिती आहे लोक सी.आर.झेड नष्ट करत आहेत. आता सृष्टीचा परिसर जर तुम्ही बघितला तर सगळी भरणी करुन टाकली. पेणकरपाड्यावरुन आपण जर आलो तर उजव्या हाताला डाव्या हाताला पूर्ण भरणी करुन टाकली.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये कांदळवनसाठी स्पेशल सेल आहे. फॉरेस्टला डेलसिलेट फॉरेस्ट ऑफिसर आहे. मी राज्य शासनाकडे सुध्दा प्रस्ताव दिला त्याचा निधी सुध्दा मी द्यायला तयार आहे. डिमार्केशन एरिया फॉरेस्टचे जे कांदळवनाचे आपल्याकडे झाले नाही ते करण्यासाठी सुध्दा आमचा पाठपूरावा चालू आहे. एकदा त्याची हद्द सिमित झाली की हा विषय येत नाही.

**जुबेर इनामदार :-**

सी.आर.झेड डिमार्केशन तर ऑलरेडी आहेच.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड आलेले आहे. सी.आर.झेड त्याच्यापेक्षा मँग्रोज जास्त आहेत. मँग्रोजचे डिमार्केशन आपल्याकडे लवकरात लवकर होणे आवश्यक आहे.

**जुबेर इनामदार :-**

एका बाजूला लावायचे आपण धावपळ करतो एवढे पैसे खर्च करत आहोत. त्यांचे संरक्षण तरी व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब ह्यासाठी आपण १ करोड ३ लाख ५१ हजार रुपये खर्च करणार आहोत. मँग्रोल सेलला आपण देऊन टाकले आणि आपले वृक्ष लागवडी साठीचे बजेट आहे १.५ करोड रुपये म्हणजे त्या उरलेल्या पैशांमागे इतर झाडांची जी लागवड आहे ती ह्या वर्षभरामध्ये शहरामध्ये होणार आहे का? आणि दुसरे मला वाटते की हे ५८ हजार कांदळवन लावून ह्या शहराला परत आपण महापुराच्या दिशने लोटत आहोत. ह्या शहराचे सन्मा. आमदार त्यांनी विधानसभेत सांगितले मिरा

भाईंदरमध्ये जो पूर आला तो कांदळवनामुळे आला. जास्त कांदळवन आहे आणि मा. मुख्यमंत्र्यांनी सुध्दा त्याच्यावर सांगितले की हा विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आता ५८ हजार झाडे आपण कुठे लावणार.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब हे पूराला बाधा होईल अशा ठिकाणी नाही. पुराला बाधक होणारे जे खाडीमध्ये आहेत ते आपल्याला काढण्याचा मी डी.पी.आर देतो म्हणतो ना. तो मी येणाऱ्या याच्यात सादर करणार आहे.

**अनिल सावंत :-**

याच्या पूर्वीच्या महासभेमध्ये ह्या कांदळवनाचा विषय आला होता. तो विषय फेटाळण्यात आला. त्या ठरावाला अजून तीन महिने झालेले नाहीत. त्याच्यावर कारवाई करायची विखंडनाला पाठवायचे.........

**मा. आयुक्त :-**

तो विषय वेगळा होता.

**अनिल सावंत :-**

तो टेक्नीकल बघून आपण अशा ठिकाणी............

**मा. आयुक्त :-**

माझी सभागृहाला विनंती राहील हा टेक्नीलिटीमध्ये न जाता याला सॅक्शन द्यावे.

**अनिल सावंत :-**

आम्ही सॅक्शन देऊ. सॅक्शन देतो परत महापूराच्या दिशेने लोटू नका.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**नयना म्हात्रे :-**

आयुक्त साहेब तुम्ही आता सांगितले की जे अतिक्रमण झालेले आहे सरळ काढा. साहेब पण तिकडे कोणी येऊन राजकारण करु नये. तुमचे काम आहे आम्ही बिनधास्त सांगतो तुम्ही करा.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यात कोणाचेही राजकारण होणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

तिकडच्या नागरिकांचे पण म्हणणे असे आहे की आम्हाला सांगा आम्ही ते स्वतः बांधकाम काढतो.

**मा. आयुक्त :-**

त्या वेळेस तुम्हीच लोक आमच्या सोबत राहणार.

**नयना म्हात्रे :-**

तिकडे राजकारण नाही पाहिजे साहेब.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**तारा घरत :-**

आयुक्त साहेब आपण ही जी कांदळवन काढणार आहोत ती किती मीटर लांब समुद्र किनाऱ्यावरुन काढणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

आता कांदळवन लावण्याचा विषय आहे. काढण्या बद्दलचा ज्या आपल्या शहरातल्या ९ खाडी आहेत मुर्धा खाडी, नवघर खाडी, उत्तनची खाडी, जाफरी खाडी त्याच्या मधला आता प्रवाह बंद झालेला आहे. तो नैसर्गिक महसुली लँडमध्ये त्याचा म्हणजे रियल गुगल बेस तो एरिया किती होता. महसुली रेकॉर्डप्रमाणे पाण्याचा फ्लोचा किती एरिया होता आणि त्याला साईट बफर किती खुला पाहिजे हे ज्याची खाजगी मालकी नाही तिथपर्यंत आम्ही जाणार शासनाच्या मालकीपर्यंत.

**तारा घरत :-**

अगोदर जो नॅचरल होता तितपर्यंत तुम्ही लावणार का.

**मा. आयुक्त :-**

तेवढा आम्ही खुला करणार. दोन होड्या येणे जाणे इतका तर १०० टक्के राहील. त्याची डेप्थ तेवढ्या लेव्हलची राहील. जी १०-१५ वर्षापूर्वी जी परिस्थिती होती ती आम्ही आणण्याचा प्रयत्न करणार आणि त्याच्या साईटला जे अतिक्रमण झालेले आहे ते आम्ही काढणार.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब मला एवढेच बोलायचे आहे की मॅंग्रोज लावूया ह्या शहराचे ते भुषण आहे आणि त्याच्यामध्ये विविध जीव वाढतात ते खाडीच्या किनाऱ्याचे रक्षण करतात आमच्या स्थानिक लोकांना तिथुन रोजगार मिळतो. ते लावले पाहिजेत वाढले पाहिजेत परंतु ते इतके पण लावू नका की १७९ किंवा ७८ रुपयाचा खर्च तुम्ही जे म्हणालात की पॉकेट मध्ये आम्ही लावणार आहोत तर ते पॉकेटमध्येच लावा. कारण ह्या शहरात भरपुर मॅंग्रोज आहेत आणि दुसरी बाजु लक्षात घेतली तर आपण लावू ऐवढे करोडो रुपये घालून आपण ते लावू पण एखाद्या बिल्डरने येवून ते तोडतो त्याच्यावर पण कारवाई करण्याचे धोरण ठेवा. ह्या शहरात अनेक बिल्डर असे आहेत. एक बिल्डर म्हणत नाही तुम्ही पर्टीक्युलर लोक मला लक्षात येतो पण आम्ही त्याच्याबद्दल बोलत नाही. प्रत्येक बिल्डरवर कारवाई झाली पाहिजे. ज्या तक्रारी होतात त्या सगळ्यावर कारवाई झाल्या पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मला एवढे म्हणायचे आहे की, आपण ते पॉकेट मध्येच लावूया. प्रमाणा बाहेर खर्च होता कामा नये. तुम्ही मगाशी एक वाक्य बोललात. शासनाचे धोरण आहे मला ते करावे लागेल. तुम्ही विरोधाने ठराव केला तर मला शासनाकडे ते मंजूरीसाठी पाठवावे लागेल आणि ते करावे लागेल. साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो. काल परवाचे वर्तमानपत्र उघडून पहा. ठाणे महानगरपालिकेने हा ठराव फेटाळला आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी मान्य केले.

**प्रभात पाटील :-**

फेटाळला गेला. तुम्ही ठराव वाचला, तुम्ही पेपर वाचा त्यांनी तो प्रस्ताव फेटाळलेला आहे. पण ठिक आहे, आपण काय ठराव करतो ते आता कळेल. आम्ही पॉझीटीव्ह आहोत.

**दिपाली मोकशी :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात अनेक वर्षापासून झाडांची लागवड केली जात आहे व त्या झाडांचा आजपर्यंत सर्व्हे होवून शहरात किती झाडे आहेत याची माहिती सभागृहाला दिलेली नाही . शहरात यापूर्वी लावलेली कांदळवनाची झाडे मोठ्या प्रमाणात वाढलेली असून त्यामुळे शेतकऱ्यां च्या शेतीमध्ये मॅंग्रोजची झाडे आलेली आहेत . त्यामुळे शेतकऱ्यांचे शतीचे व आर्थिक नुकसान झालेले आहे . तसेच या शहराचे भौगोलिक क्षेत्र विचारात घेता शहरामध्ये किती कांदळवनाची (मॅंग्रोज) लागवड करण्याची गरज व महापालिकेच्या कोणत्या क्षेत्रामध्ये लागवड केल्यास सोयी चे होईल याबाबतची माहिती प्रशासनाने दिलेली नाही. तरी मा. आयुक्त यांनी कांदळवणाची लागवड करताना जेथे समुद्राच्या बाजुला रिकामी जागा आहे तिथे वनविकास महामंडळाकडून लावावी. तसेच शेतकऱ्यांच्या शतीचे व आर्थिक नुकसान होणार नाही ह्याची काळजी घ्यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**विनोद म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कांदळवन रोपांची लागवड करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

ठराव क्र. ५१ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात अनेक वर्षापासून झाडांची लागवड केली जात आहे व त्या झाडांचा आजपर्यंत सर्व्हे होवून शहरात किती झाडे आहेत याची माहिती सभागृहाला दिलेली नाही . शहरात यापूर्वी लावलेली कांदळवनाची झाडे मोठ्या प्रमाणात वाढलेली असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये मॅंग्रोजची झाडे आलेली आहेत . त्यामुळे शेतकऱ्यांचे शतीचे व आर्थिक नुकसान झालेले आहे . तसेच या शहराचे भौगोलिक क्षेत्र विचारात घेता शहरामध्ये किती कांदळवनाची (मॅंग्रोज) लागवड करण्याची गरज व महापालिकेच्या कोणत्या क्षेत्रामध्ये लाग वड केल्यास सोयीचे होईल याबाबतची माहिती प्रशासनाने**

**दिलेली नाही. तरी मा. आयुक्त यांनी कांदळवणाची लागवड करताना जेथे समुद्राच्या बाजुला रिकामी जागा आहे तिथे वनविकास महामंडळाकडून लावावी. तसेच शेतकऱ्यांच्या शतीचे व आर्थिक नुकसान होणार नाही ह्याची काळजी घ्यावी असा मी ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्रीम. दिपाली मोकाशी अनुमोदन :- श्री. विनोद म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शरीरसौष्ठवपटू श्री. नितीन म्हात्रे यांस क्रिडापटूंसाठी राखीव कोट्यातून नोकरीसाठी शासनाकडे शिफारस करणेबाबत.**

**गणेश भोईर :-**

श्री. नितीन म्हात्रे हे मिरा भाईंदर शहरातील मोर्वा गावातील स्थानिक रहिवासी असुन त्यांना बालेवाडी स्टेडीअम, पुणे येथे भरलेल्या आशियायी चषक चॅम्पियनशिप शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये पुरूष ५५ किलो वजनी गटामध्ये यांना सुवर्ण पदक मिळाले आहे. यापूर्वीही श्री. नितीन म्हात्रे यांनी चार वेळा भारत -श्री व एकदा जागतिक -श्री असे विजेते पद मिळविलेले आहे. त्यांच्या १४ वर्षाच्या अथक परिश्रमाने आशियातील विजेते पद पटकावून त्यांनी मिरा भाईंदर शहराचे नावलौकीक वाढविलेले आहे.

श्री. नितीन म्हात्रे यांची घरची परिस्थिती बेताची असून उदरनिर्वाहाकरीता ते लहान सहान कामे करुन कुटूंबाचे पालन पोषण करीत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानूसार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील राज्याचा व देशाचे नाव लौकीक करणाऱ्या क्रिडा पटूंना नोकरी देण्याची तरतुद आहे. त्यानुसार श्री. नितीन म्हात्रे यांना राज्य शासनाच्या सेवेत रुजू करणेबाबत शिफारस होणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे. खालीलप्रमाणे त्यांच्या शिक्षणाची व त्यांनी केलेल्या कामगिरीची माहिती जोडत आहे.

**नाव :-** नितिन प्रकाश म्हात्रे

**पत्ता :-** जी 1, मातृपितृ छाया, मोर्वा गाव, उत्तन रोड, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 401101

**भ्रमणध्वनी क्र :-** 9892591396
**जन्म दिनांक :-** 04 जुलै 1982
**जन्मस्थळ :-** ता. सफाळे जि. पालघर
**शैक्षणिक अहर्ता :-**

| शैक्षणिक अहर्ता | शाखा | विद्यापीठ | वर्ष | महाविद्यालय / शाळा |
|---|---|---|---|---|
| पदवीधर | कला | मुंबई विद्यापीठ | 2000 - 02 | **शंकर नारायण महाविद्यालय**, महाविद्यालय मार्ग भाईंदर (पूर्व) |
| एच. एस. सी. | कला | मुंबई बोर्ड | 1999 | सेंट जोसेफ अँग्लो मराठी हायस्कूल अंड ज्युनिअर कॉलेज उत्तन |
| एस. सी. सी. | - | मुंबई बोर्ड | 1997 | सेंट जोसेफ अँग्लो मराठी हायस्कूल अंड ज्युनिअर कॉलेज उत्तन |

**खेळ :-** शरीरसौष्ठव ( **प्रोफेशनल बॉडीबिल्डिंग** )

**पदके :-**

**# राज्य पातळी सन्मान**

- महाराष्ट्र श्री सन 2013 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2014 - रौप्यपदक
- महाराष्ट्र श्री सन 2015 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2016 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2017 - सुवर्णपदक

- महाराष्ट्र श्री सन 2018 - सुवर्णपदक

**# राष्ट्रीय पातळी सन्मान**

- भारत श्री सन 2015 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2016 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2017 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2018 - सुवर्णपदक

**# आंतरराष्ट्रीय पातळी सन्मान**

- मिस्टर दुबई इंडियन इंटरनॅशनल सन 2016 - कास्यपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2014 - रौप्यपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2015 - सुवर्णपदक
- मिस्टर आशिया सन 2018 - सुवर्णपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2018 - सुवर्णपदक - थायलंड

**जयेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, ह्याच विषयावर बोलायचे आहे. हा विषय अतिशय चांगला आहे. मिरा भाईंदर शहराचे नाव लौकिक करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा निर्णय आपण ह्या ठिकाणी घेतलेला आहे. याच्यामध्ये मी अजून एक दुरुस्ती सुचवतो. आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये असे अनेक खेळाडू जे आहेत ते अतिशय जागतीक दर्जापर्यंत गेलेले आहेत. एक कुस्तीपट्टु म्हात्रे म्हणून आमच्याकडे नवघरला राहतो. महाराष्ट्र केसरी, उपकेसरी तो झाला. त्याचे अडीचशे फुटाचे घर आहे. संपूर्ण घर त्याचे ट्रॉफीने भरलेले आहे. अतिशय गरिब परिस्थितीत त्या मुलाचे वडील ड्रायव्हींगमध्ये आहेत. आज ना उद्या निश्चितपणे महाराष्ट्रामध्ये अनेक पदके त्याने घेतली सगळीकडे फिरत असतात. त्याचे कुटुंब अजून वरच्या लेव्हला आलेले नाही. कोणीच कमवत नाही ते माने म्हणून आहेत. रुपचंद माने यांचा चिरंजीव आहे. दुसरा मुलगा त्यांचा पेहलवान आहे अशा ठिकाणी उपमहापौर आपल्याला सांगतो त्यांची परिस्थिती बघून त्यांचे शिफारस लेटर आम्ही देऊ. जर आपल्याकडून अशा व्यक्तींना सर्व्हिसमध्ये मिळाले तर ते कुटुंब पुढे राष्ट्रीय पातळीपर्यंत त्या मुलाची ताकद कुस्तीमध्ये तो नाव लौकीक करेल. मिरा भाईंदर शहराचे नाव प्रत्येक वेळेला पेपरमध्ये आलेले आहे. मिरा भाईंदरच्या कुस्तीपटू एवढेच ह्या ठरावामध्ये करुन घेतले तर बरे होईल.

**मा. महापौर :-**

आपण नंतर करु.

**प्रकरण क्र. ४६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शरीरसौष्ठवपट्टू श्री. नितीन म्हात्रे यांस क्रिडापट्टुंसाठी राखीव कोट्यातून नोकरीसाठी शासनाकडे शिफारस करणेबाबत.**

**ठराव क्र. ५२ :-**

श्री. नितीन म्हात्रे हे मिरा भाईंदर शहरातील मोर्वा गावातील स्थानिक रहिवासी असुन त्यांना बालेवाडी स्टेडीअम , पुणे येथे भरलेल्या आशियायी चषक चॅम्पियनशिप शरीर सौष्ठव स्पर्धेमध्ये पुरूष ५५ किलो वजनी गटामध्ये यांना सुवर्ण पदक मिळाले आहे . यापूर्वीही श्री . नितीन म्हात्रे यांनी चार वेळा भारत -श्री व एकदा जागतिक -श्री असे विजेते पद मिळविलेले आहे. त्यांच्या १४ वर्षाच्या अथक परिश्रमाने आशियातील विजेते पद पटकावून त्यांनी मिरा भाईंदर शहराचे नावलौकीक वाढविलेले आहे.

श्री. नितीन म्हात्रे यांची घरची परिस्थि ती बेताची असून उदरनिर्वाहाकरीता ते लहान सहान कामे करुन कुटूंबाचे पालन पोषण करीत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानूसार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील राज्याचा व देशाचे नाव लौकीक करणाऱ्या क्रिडा पटूंना नोकरी देण्याची तरतुद आहे . त्यानुसार श्री. नितीन म्हात्रे यांना राज्य शासनाच्या सेवेत रुजू करणेबाबत शिफारस होणेस ही मा . महासभा मंजुरी देत आहे . खालीलप्रमाणे त्यांच्या शिक्षणाची व त्यांनी केलेल्या कामगिरीची माहिती जोडत आहे.

**नाव :-** नितिन प्रकाश म्हात्रे

**पत्ता :-** जी 1, मातृपितृ छाया, मोर्वा गाव, उत्तन रोड, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 401101

**भ्रमणध्वनी क्र :-** 9892591396
**जन्म दिनांक :-** 04 जुलै 1982
**जन्मस्थळ :-** ता. सफाळे जि. पालघर
**शैक्षणिक अहर्ता :-**

| शैक्षणिक अहर्ता | शाखा | विद्यापीठ | वर्ष | महाविद्यालय / शाळा |
|---|---|---|---|---|
| पदवीधर | कला | मुंबई विद्यापीठ | 2000 - 02 | **शंकर नारायण महाविद्यालय**, महाविद्यालय मार्ग भाईंदर (पूर्व) |
| एच. एस. सी. | कला | मुंबई बोर्ड | 1999 | सेंट जोसेफ अँग्लो मराठी हायस्कूल अंड ज्युनिअर कॉलेज उत्तन |
| एस. सी. सी. | - | मुंबई बोर्ड | 1997 | सेंट जोसेफ अँग्लो मराठी हायस्कूल अंड ज्युनिअर कॉलेज उत्तन |

**खेळ :-** शरीरसौष्ठव ( **प्रोफेशनल बॉडीबिल्डिंग** )
**पदके :-**
**# राज्य पातळी सन्मान**

- महाराष्ट्र श्री सन 2013 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2014 - रौप्यपदक
- महाराष्ट्र श्री सन 2015 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2016 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2017 - सुवर्णपदक
- महाराष्ट्र श्री सन 2018 - सुवर्णपदक

**# राष्ट्रीय पातळी सन्मान**

- भारत श्री सन 2015 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2016 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2017 - सुवर्णपदक
- भारत श्री सन 2018 - सुवर्णपदक

**# आंतरराष्ट्रीय पातळी सन्मान**

- मिस्टर दुबई इंडियन इंटरनॅशनल सन 2016 - कास्यपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2014 - रौप्यपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2015 - सुवर्णपदक
- मिस्टर आशिया सन 2018 - सुवर्णपदक
- मिस्टर वर्ल्ड सन 2018 - सुवर्णपदक – थायलंड

**सुचक :- श्री. गणेश भोईर** **अनुमोदन :- श्री. जयेश भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, **मौजे डोंगरी सर्व्हे क्र . ४९क हिस्सा क्र.१/१७८(ड), १७८(ई), १०५(२) व २९७ या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.**

**मदन उदित नारायण सिंह :-**

मरा भाईंदर शहराची वकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अ धसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97**

पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची वकास योजना शासन अ धसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर**-89/98/**युडी**-12,** दि**.25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे**.**

तद्नंतर महाराष्ट्र शासन नगर वकास वभाग अ धसूचना क्र. टिपीपी/4304/सीआर-246/04/न व-11, दि.24/08/2004 अन्वये महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या गावांसाठी शासनाने वशेष नियोजन प्रा धकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरण ( **MMRDA**) यांची नेमणूक केलेली आहे.

महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी**,** तारोडी**,** चौक**,** पाली व उत्तन या अ धसू चत क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन, नगर वकास अ धसूचना क्र. टिपीबी/4307/108/सीआर-29/07/युडी-11, दि.09/04/2007 अन्वये वशेष नियोजन प्रा धकरण म्हणून महाराष्ट्र पर्यटन वकास महामंडळ म. यांची नेमणूक केलेली आहे.

**त्यानं**तर दि**.01/12/2007** पासून मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरण यांची वशेष नियोजन प्रा धकरण **(**Special Planning Authority**)** म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरणाने उक्त अ धसु चत क्षेत्रासाठी तयार केलेल्या वकास आराखडयास शासनाने अ धसूचना क्रमांक सएमएस/टिपीबी**-4312/**प्र.क्र**.23/2013/**न व**-11,** दि**.13/05/2013** व दि**.03/06/2016** अन्वये मंजूरी दिलेली आहे**.**

सद्यस्थितीत महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी**,** तारोडी**,** चौक**,** पाली व उत्तन या क्षेत्रासाठी मरा भाईंदर महानगरपा लका ही नियोजन प्रा धकरण आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागेपैकी स.क्र. 43क (जुना), 49/1 (न वन) या जागेसाठी महानगरपा लकेने पत्र क्र. मनपा/नर/2866/2007-08, दि.26/11/2007 अन्वये रहिवास व रेस्टॉरेन्ट या प्रयोजनार्थ प्राथ मक परवानगी दिलेली आहे. त्यानंतर सदर जागेसाठी मा. जिल्हा धकारी ठाणे यांचेकडील अकृ षक परवानगीचे आदेश प्राप्त झालेनंतर सदर ज मनीसाठी मंजुर वकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे महानगरपा लकेने दि.02/02/2008 अन्वये इमारत प्रकार ए व बंगला (स्टिल्ट **+** 1) मजल्याकरिता **0.2** चटईक्षेत्र निर्देशांकानुसार **678.55** चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी दिलेली असून या जागेमधील इमारतीसाठी दि.27/05/2011 अन्वये भोगवटा दाखला दिलेला आहे.

सद्यस्थितीत जागेवर शुभारंभ रिसॉर्ट प्रा. ल. या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु आहे.

वद्यमान हॉटेलची जागा सन 1997 च्या मंजूर वकास योजनेनुसार **Hill Zone** मध्ये सामा वष्ट असून त्याठिकाणी 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होता त्याप्रमाणे 0.2 चटई क्षेत्राच्या मर्यादीत महापा लकेने परवानगी दिलेली आहे.

मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरणा ने तयार केलेल्या व शासनाने मंजुर केलेल्या वकास योजनेनुसार मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा **Green Zone** मध्ये सामा वष्ट असून स.क्र. 105(2ब) व 178(ड) ही जागा **D-1 Zone** मध्ये सामा वष्ट आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा **Green Zone** मध्ये असल्याने 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच स.क्र. 105(2ब) व 178(ड) या जागा **D-1 Zone** मध्ये सामा वष्ट असल्याने 0.3 मुळ चटईक्षेत्र **+ प्रिमीयमचे 0.2 चटईक्षेत्र असे एकूण 0.5** चटईक्षेत्र अनुज्ञेय आहे.

वरील चारही सर्व्हे क्रमांकामधील जागा मे. शुभारंभ रिसॉर्ट प्रा. ल. यांचे मालकीच्या असल्याने त्यांनी दि.10/01/2018 रोजीच्या पत्रान्वये शासनास सदरील सर्व जागा **D-2 Zone** मध्ये सामा वष्ट करणेची मागणी केलेली आहे.

**त्याप्रमाणे सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 चा प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मं जुरीकरीता सादर केल्यास शासन त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.11/12/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविलेले आहे.**

**मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने होत असल्यामुळे व शहरामध्ये पर्यटनाला चालना मिळणेच्या दृष्टीकोनातून मौजे डोंगरी** स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागा  -2

**झोनमध्ये समाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वयेच्या फेरबदलास व त्याअनुषंगिक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मंजुरीसाठी फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देत आहेत तसेच इतिवृत्तांताच्या मंजुरीची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे**

**टीप :- सोबत नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे**

**दौलत गजरे :-**

माझे अनुमोदन आहे.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते आज ४७ प्रकरण आणि ठराव डोंगरी मधला हा सर्व्हे नंबर आहे. तो पूर्ण ठराव बहुतेक वाचला नाही. म्हणजे गोषवारा प्रमाणे वाचला नाही असे मला वाटते. आपण जे सर्व्हे नंबर इथे ॲड केलेले आहेत तो ग्रिन झोन आहे. तो आपण डेव्हलपमेंटसाठी देणार आहोत. कमिशनर साहेबांचा गोषवारा आहे. म्हणून मी कमिशनर साहेबांकडून खुलासा मागु इच्छिते. आता हा जो ठराव वाचला जे सर्व्हे नंबर आहेत ते सद्यस्थितीत ग्रिन झोनमध्ये आहेत आणि हिलस्टेशनचे आहेत असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदय सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे ते डी झोन टू मधले आहेत. डी झोन वन मधले आहेत. दोन्ही आहेत तर त्याठिकाणी विद्यामान वापर सुध्दा चालू आहे. त्याचा झोन बदलण्यासाठीचा शासनाचे निर्देश १०/०१/२०१८ ला महापालिकेला प्राप्त झालेले आहेत. तर महापालिकेने त्यामध्ये जे काही निर्णय घेईल गुणवत्तेवर शासन त्याच्यात निर्णय करेल असे निर्देश शासनाने दिल्यामुळे हा विषय सभागृहासमोर ठेवलेला आहे. सभागृह एकमताने किंवा बहुमताने निर्णय घेईल. त्याच्या आधारे ती वैधानिक कारवाई केली जाईल. यामध्ये लोकांना सजेशन ऑब्जेक्शनची संधी राहील. त्यांचे म्हणणे ऐकले जाईल आणि हा सगळा अहवाल शासनाला सादर केला जाईल.

**शर्मिला बगाजी :-**

शासनाला अहवाल सादर केला जाईल. हा तुमचा खुलासा आहे. आता ठराव वाचला त्यामध्ये सगळे अधिकार तुम्हाला दिलेले आहेत. वैधानिक सगळे नियम जे आहेत ते तुम्ही तपासून कोणता इतिवृत्तांतासाठी न थांबता एवढी घाई आहे की इतिवृत्तांतासाठी न थांबता ठराव शासनाकडे...........

**मा. आयुक्त :-**

घाई काही नाही ह्यामध्ये एम.आर.टी.पी. खाली स्पष्ट तरतूद आहे. ठराव झाल्यानंतर गॅझेट पब्लीकेशन केले पाहिजे. जाहिर प्रकटन स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिले पाहिजे. त्याला एका महिन्याची मुदत दिली पाहिजे. काही घाई नाही आणि त्या आलेल्या ऑब्जेक्शनचे पर्सनल हेअरींग केल्या पाहिजेत आणि त्याची सुनावणी झाल्यानंतर त्याचे म्हणणे रेकॉर्ड केले पाहिजे आणि ते अंतिम शासनाला सादर केले पाहिजे.

**शर्मिला बगाजी :-**

झोन चेंज करण्याचा अधिकार आपल्याला आहे की नाही तुम्ही खुलासा द्याल पण..........

**मा. आयुक्त :-**

आपल्याला आपल्या स्तरावर नाही आपण आपला निर्णय शासनाला कळवू शकतो. तो निर्णय म्हणजे अंतिम नाही. शासन जे निर्णय घेईल गुणवत्तेवर तो अंतिम राहील.

**शर्मिला बगाजी :-**

त्याच्याही पुढे जे सद्यस्थिती सांगितले शुभारंभ हॉटेल रिसॉर्ट ते जे सद्यस्थितीत कार्यान्वित आहेत मला थोडासा खुलासा मिळाला तर बरे होईल की ते सद्यस्थितीत चालू आहे ते परवानगी घेऊन केलेले आहे का जे बांधकाम आहे ते परवानगी आहे का? जो एफ.एस.आय. वापरायचा होता तेवढाच वापरलेला आहे की बांधकाम केलेले आहे का? त्याचाही खुलासा करावा त्याच बरोबर जर रिसॉटेला तुम्ही झोन चेंज करुन देत आहात तर आमचे जे मुळ रहिवाशी आहेत त्यांच्या ज्या जमिनी आहेत त्या पण एन.डी. झोनमध्ये आहेत. त्याचा वापर आम्ही डेव्हलपमेंटसाठी करु शकत नाही. जरी आमची कितीही इच्छा असली तरी करु शकत नाही. आम्ही स्थानिकांनी तुमच्याकडे शासनाकडे पत्र पाठवले आणि तुमच्याकडे जर पत्राचा खुलासा................

**मा. आयुक्त :-**

त्याचा मी तुम्हाला खुलासा करतो.

**शर्मिला बगाजी :-**

स्थानिकांनी पण तसा प्रत्येक एन.डी. झोन आहे ते डेव्हलपमेंटमध्ये टाकायचा विषय आला तर ते पण प्रत्येक वेळेला महासभेत आणून आपण ते झोन चेंज करु शकतो का? तर त्याबद्दल मला थोडासा खुलासा केलेला बरा होईल.

**मा. आयुक्त :-**

पहिल्या ठरावात ते सन्मा. सदस्यांना सांगितला हा वैधानिक कामकाजाची पध्दत आहे. आपला निर्णय झाला म्हणजे राज्य शासन मान्य केला असे नाही. ऑन मिनिट हा निर्णय होतो. गुणवत्तेवर हा निर्णय होतो. आपण जो मुद्दा सांगितलेला आहे की याला परवानगी आहे का? तर तिथे जे कार्यान्वित रेस्टॉरंट आहेत किंवा वापर आहेत त्याचा प्राथमिक वापरासाठी २००७ मध्ये त्याला परवानगी दिलेली आहे आणि २००७ मध्ये त्याची अकृषी परवानगी सुध्दा जिल्हाधिका-यांना दिलेली आहे.

**शर्मिला बगाजी :-**

त्याच्यानंतर वाढीव बांधकामाचे?

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये सिल प्लस एक मजल्याकरिता पॉईंट टू एफ.एस.आय ह्या ठिकाणी दिलेला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

किती एरियासाठी?

**मा. आयुक्त :-**

याची डिटेल नाही पण परवानगी दिलेली आहे. मी तुम्हाला त्याची डिटेल त्याचे सगळे लेखी दिले जाईल.

**शर्मिला बगाजी :-**

तुम्ही सांगता की हे जरी नसले म्हणजे सगळे शासनाकडे तुमच्याकडे पत्र.......

**मा. आयुक्त :-**

आपण त्याच्यामध्ये आपले म्हणणे मांडू शकतो ते म्हणणे रेकॉर्डींग केले जाईल.

**शर्मिला बगाजी :-**

सर तुमच्याकडे पत्र ०१/०८/२०१९ ला आले. मुख्य कार्यकारी यांच्यामध्ये.

**मा. आयुक्त :-**

१०/०१/२०१८.

**शर्मिला बगाजी :-**

२०१८ त्याच्यानंतर ५-६ महिने आपल्याकडे याच्या आधी मला वाटत नाही की हे डेव्हलपमेंट झोनसाठी आतापर्यंत विषय असा आला नव्हता तर तुमच्या ५ महिन्यामध्ये एवढी फास्ट तुमची प्रोसिजर आहे ही तुमची कमालीची गोष्ट आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये डी.पी. रिव्हाईज झाला असता विरोधी पक्षाने आक्षेप घेतलेलाच आहे. बरेच विषय तुम्ही स्थानिक लेव्हलवर प्रस्तावित केले असते. आपला डेव्हलपमेंट प्लान मंजूर होऊन त्याचे फस्ट रिव्हीजन सुध्दा अजून झालेले नाही. लोकांवर जे अन्याय असतात ते लोक वेगवेगळ्या मार्गाने पुढे जातात.

**शर्मिला बगाजी :-**

आमच्यावर अन्याय होतच आहेत. आम्हाला दिशा दिलेली आहे. हे असेच रुटने गेले त्याच्यात त्वरीत कारवाई होईल.

**मा. आयुक्त :-**

असे होत नाही. आपल्या स्तरावर काही कार्यवाही होणार नाही. राज्य शासनाच्या निर्देशाच्या पुढे आपल्याला जाता येत नाही.

**शर्मिला बगाजी :-**

सर तुम्ही पहिले पाऊल टाकलेले आहे. आम्हाला संधी दिलेली आहे की आमचे जे झोन असतील........

**मा. आयुक्त :-**

आपल्या स्तरावर एकही प्रस्ताव आम्ही आपल्याकडे देणार नाही. मी कटाक्षाने सांगतो राज्य शासनाकडून निर्देश आले तरी माझे कर्तव्य आहे ते सभागृहासमोर ठेवणे.

**शर्मिला बगाजी :-**

जे काही असेल ते कायदेशीरपणे व्हावे एवढीच इच्छा आहे. कोणाच्या आम्ही विरोधात नाहीत. शुभारंभ रिसॉर्ट मे बी २००७ पूर्वी पासूनचा असेल असे मला वाटते. तेव्हा मी नगरसेविका नव्हते. त्यांना पण माहिती असेल मी रिसॉर्टच्या विरोधात नाही पण जे झोनिंग चेंज करण्याच्या विरोधात मी आजही आहे आणि असे झोन तुम्ही परत परत चेंज करत असाल तर शहराचा पूर्ण नक्शा बदलण्यामध्ये तुमचा हातखंड आहे असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

चुकुन नाही आहे. आपण शासनाच्या निर्देशाने काम करत आहोत. आपण झोन बदलणारे कोणी नाही. आपल्यावर निर्भर आहे, निर्णय घेण्याचा.................

**निलम ढवण :-**

आयुक्त साहेब, आता जो शर्मिला मॅडमचा जो विषय होता की, तीला जे अपेक्षित उत्तर होते तिचे म्हणणे असे आहे की हे रिसॉर्ट म्हणा किंवा कोणाची ती जागा जेव्हा झोन बदलण्यासाठी शासनाकडून आपल्याकडे आले मग ते स्थानिक रहिवाशी म्हणून त्यांनी त्यांचा जागा शासनाकडे पाठवले, एन.डी. झोन बदलण्यासाठी आणि शासनाकडून जर आपल्याला पत्र आले तर तो विषय आपण महासभेसमोर ठेवणार का?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यासाठीच पगार घेत आहोत. शासनाचे जे दिशा निर्देश असणार ते तुमच्या समोर ठेवणार.

**सुरेश खंडेलवाल :-**

ते ठेवायचेच आहे. ते बंधनकारक पण आहे.

**मा. आयुक्त :-**

मला त्याच्यात काही इंट्रेस्ट नाही. माझा आरोप तोच आहे की, तुम्ही विनाकारण एखाद्याला काही बोलणे वगैरे हे बरोबर नाही. जे शासकीय कामकाज आहे जे सार्वमताने आणि गुणवत्तेने निर्णय होतील. आमच्या स्तरावर आमच्या आयुष्यात आम्ही एकही विषय आणलेला नाही. आम्ही आणणार पण नाही.

**निलम ढवण :-**

तिला ते अपेक्षित होते म्हणून तिने सांगितले की, मग ते बंधनकारक आहे आम्हाला तुम्ही वाट करुन देत आहात. म्हणजे तिला अपेक्षित उत्तर होते म्हणून तिने विचारले. दुसरी गोष्ट साहेब आता तिथे जे काही असेल मला काही माहित नाही. आताच्या मिळालेल्या महितीनुसार त्या एन.डी. झोनमध्ये जेव्हा त्यांनी पहिले डेव्हलपमेंट केले तर त्यावेळी त्याची काही तरी अटीशर्ती असतील. एवढ्या पर्यंत डेव्हलप करता येते किंवा काय म्हणून........

**सुरेश खंडेलवाल :-**

गोषवाऱ्यामध्ये संपूर्ण जानकारी त्याबाबत एन.डी. मध्ये किती आहे, जी-२ मध्ये किती आहे? किती फुटाची आहे? त्याला कधी सी.सी. दिली, कधी त्याला ओ.सी. दिली? सर्व गोषवाऱ्यात पूर्णपणे म्हटलेले आहे. फक्त माझे निवेदन एवढेच आहे की, आता जो सध्या विषय आहे त्या विषयावर जर आपण बोललो तर.........

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, त्यांना एखाद्या वेळी डायसवर स्थान द्या. जेव्हा तेव्हा ते उठून बोलतात.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम मी हाथ वर करुन मॅडमला दाखवून उठलो आहे........

(सभागृहात गोधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे एवढेच निवेदन आहे की, सर्व जाणकारी गोषवाऱ्यामध्ये असताना सुध्दा जर आपण उभे राहून जर असे प्रश्न विचारले की, सी.सी. आहे किती माळ्याची आहे. मॅडम तुम्ही सिनिअर आहात.

**निलम ढवण :-**

त्याला जोडून जर काही प्रश्न असतील तर विचारु नये का?

**सुरेश खंडेलवाल :-**

डायरेक्ट प्रश्न विचारा ही महासभा आहे आपण डायरेक्ट विचारा.

**निलम ढवण :-**

महासभेतच असे प्रश्न विचारायचे असतात. म्हणजे सगळे समोर येते.

**सुरेश खंडेलवाल :-**

तशी भुमिका मांडायची नसते.

**निलम ढवण :-**

तुम्ही विरोध का करत आहात. मला ते कळत नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम भुमिका मांडून विचारायचे नसते. डायरेक्ट विचारा. काय उत्तर येते ते डायरेक्ट विचारा.

**निलम ढवण :-**

मी विचारत आहे, खंडेलवालजी तुम्ही विरोध का करत आहात त्या गोष्टीला. मला तर कळत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

डायसवर बसलेले उत्तर देतील ना. सगळ्याच गोष्टी सर्वांना माहित नसतात. किती तज्ञ असले तरी त्याच्यात कुठेतरी त्रृटी असु शकतात. त्यानुसार जर माहिती डायसवरुन पाहिजे असेल.......

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम, हे मिरा भाईंदर आगरी कोळी समाजाचे गाव आणि ह्या परिसरामध्ये ब-याचशा आगरी समाजाचे असु देत, कोळी समाजाचे असु देत ब-याचशा जागा एन.डी. झोनमध्ये आहेत आणि खरोखर त्या एन.डी. झोनचा विषय तुम्ही आता हा विषय आणलेला आहे. तर आमचा पण विषय असा आहे की ह्या भुमिपुत्रांचा ज्या जागा आहेत त्यांचा कुठे जर अडीअडचणी असतील त्या पण ह्या पुढचे येणार आहे. त्यांचे शासनाकडे पाठवून एकत्र आणून जेवढे डेव्हलपमेंटसाठी त्यांना मोबदला देता येईल असे आपण करावे अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आयुक्त महोदय थोडासा विरोध जर असला तर त्याला तुम्ही वाईट वाटून घेऊ नका कारण संचालक आपल्याकडे आहेत. संचालक खंडेलवालजी एक सहा. संचालक आहे. याच्याकडे संचालक आहे. त्या गोषवा-यामध्ये तुम्ही कुठेतरी साहेब त्रृटी राहिलेली आहे. क्षेत्रफळ दिलेले नाही. पूर्ण क्षेत्रफळ किती आहे...........

**मा. आयुक्त :-**

इनामदार साहेब मी पनवेलला काम केलेले आहे. तर तिथले सभागृहामध्ये सभापती तिथे उत्तर द्यायचे. मी एकमेव नगरपरिषद त्या काळात बधितलेली आहे. पनवेलहून मी ठाण्यात आलो. ठाण्याहून बी.एम.सी. ला आलो तर त्या विषयाचे उत्तर सभापती द्यायचे समाधान झाले नाही तर मुख्याधिका-याने बोलायचे मुख्याधिकारीने नंतर बोलले जायचे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मला वाटते प्रशासकीय कामकाज करता करता तुम्हाला २५-३० वर्ष महापालिकेत.

**मा. आयुक्त :-**

३० वर्ष झाली.

**जुबेर इनामदार :-**

चांगली गोष्ट आहे साहेब तुमचा ह्या शहराचा अनुभव ३० वर्षाचा प्रशासकीय कामकाजामध्ये आपल्याला झालेली आहेत. ह्या शहरामध्ये सुध्दा तुम्ही याच्या आधी काम करुन गेलात. अभिमान असायचा तुमच्या बरोबर बोलताना मी नेहमी बोलायचो खतगावकर साहेब कशाप्रकारे महासभा चालवतात कधी राजीव जाधव साहेब तेव्हा मला वाटते आयुक्त होते ते नसले की तुम्ही बसत होते. आम्हाला त्या काळात तुमचे बरेच काही कामकाज आम्हाला चांगले आठवतात. तरी साहेब ह्या इतक्या वर्षाच्या अनुभवामध्ये शासनाकडून असे दबाव तंत्राचे पत्र मला तरी वाटत नाही तुम्हाला कधी असे बघायला मिळाले असते आणि हे महापौर मॅडम पारदर्शक कामकाज करायचे एका बाजूला बोलून दुस-या बाजूला अशाप्रकारे प्रस्ताव पाठवायचे मी तर ॲक्च्युअली ऊंदीर विचार करत होतो शब्द बोलला पाहिजे पण ऊंदीर गणेशजीचे वाहन आहे. ऊंदराचे नाव घेणार नाही. मोठ्या घुशीसारखे डोंगर पोखरायला घेतलेले आहे. तो असाच विषय झाला. साहेब ते हिल आहे डी वन झोन ग्रीन झोन हिल एरिया याच्यामध्ये आपल्याला त्याला जितके काही ०.२ एफ.एस.आय जे काही क्षेत्र द्यायचा अधिकार दिलेला आहे याचा नैसर्गिक वापर त्याने करावा. त्या पूर्ण डेव्हलपमेंट झोन रुपांतर करायचा आहे. डी २ झोन म्हणजे डेव्हलपमेंट झोन झाला. त्याचे किती काय क्षेत्र डी २ झोनमध्ये ज्याचा उल्लेख गोषवा-यामध्ये केलेला गेलेला नाही. आयुक्त महोदय कुठेतरी असे दिसून येते भास होतो मला की काय किती दबाव प्रशासनावर सत्ताधा-यांचा. द्यायचेच नाही तुम्ही त्याच्यामध्ये माहितीच नका देऊ. माहिती दिली आहे जो वाचत नाही त्याला काय समजते. आता काय योगायोग आला वैती साहेब आमचे गुरु होते. त्यांनी आम्हाला बरेच काही शिकविले आम्ही तेव्हा वाचन

केले नसते. नेहमी वाचायचे इनामदार गोषवारा वाचल्याशिवाय माझ्याकडे यायचे नाही. तुम्ही शिकविले म्हणून आम्ही विषय वाचतो. खरतर साहेब हे स्पष्ट चित्र आहे. दोन विषय आले दोन्ही विषयामध्ये कुठलेही क्षेत्रफळ याचा उल्लेख केला गेला नाही. किती क्षेत्र आहे ह्या डी २ झोनमध्ये किती क्षेत्र आहे. तुम्ही किती त्याला परवानगी दिली ६७८.५५ चौ.मी. दोन चारशे मीटर अजून असेल. मग बाकी बदल करायचा असेल तर पूर्ण झोन म्हणजे पूर्ण आहे तो डोंगर नष्ट करायचा आणि त्या नष्ट केलेल्या डोंगर निसर्गाचा नष्ट करुन नंतर त्याच्यावरती येत असून २,४,१०,१५ इमारती बांधायच्या म्हणजे डेव्हलपमेंट झोन करुन त्याला आहे तो निसर्गाचा नाश करायचा अशाप्रकारे सर्व गोष्टींची कृती चाललेली आहे. याला कुठेतरी थांबवावे लागेल साहेब. साहेब शासन आपल्याला शासनाकडे आता राजकारण आहे राजकीय नेते आहेत कुठल्यातरी माध्यमातून गेले असतील. कधी कधी शासनाला सुध्दा ऐकावे लागते. आमच्या काळामध्ये तसे कधी व्हायचे नाही आम्ही बरेच काही प्रस्ताव घेऊन गेलो. वैती साहेब सुध्दा घेऊन गेले असतील. तेव्हा काँग्रेस पक्षामध्ये होते त्या काळामध्ये अशाप्रकारे कारवाई व्हायची नाही. तर ह्या एवढ्या गतीने गेल्या गेल्या पत्र पाठवल तुमच्या महापालिकेवरती दबाव तंत्र तुम्हाला करुन घ्यावे लागेल. महासभेमध्ये प्रस्ताव आणा. तुमचे सरकार तुमचे शासन. त्यांना माहित आहे बिन विरोधी ठराव मंजूर होणार मात्र आम्ही त्याला विरोध करणार गरज लागली आम्ही शासनाकडे जाऊ शासनाने जर आमची तिथे सुनावणी झाली नाही तर न्यायालयात दावा टाकू मात्र.

**मा. आयुक्त :-**

आम्ही सुनावणी घेणार. सुनावणी १०० टक्के घेणार.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला कार्यपध्दत आहे त्यानुसार तर तुम्हाला करावेच लागेल ३७ खाली करायचेच आहे पण साहेब कुठेतरी शासनाला मला तर असे वाटते तुम्ही तुमच्या सारखा अनुभवी व्यक्तीने जर ते महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना नियमामधला मुद्दा पाठविला पाहिजे. आम्ही ३७ मध्ये किरकोळ दुरुस्त्या करु शकतो. त्याचे चारित्र्य बदलू शकत नाही. तुम्ही आम्हाला त्याचे पूर्ण झोनच बदलायला लावता ह्या विषयामध्ये माझी भावना आहे की निसर्गाचा नाश करु नये. नाश केल्यानंतर अशाप्रकारे रिसॉर्टला परमीशन किती आहे. काय आहे जास्त बांधकाम केले वाढीव बांधकाम केले तर प्रशासनाचा मुद्दा आहे त्यांनी करावे. आमचा मुद्दा एकच आहे जी वस्तु ज्याचे सर्वेक्षण केले पाहिजे ते प्रशासनाने केले.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब आता जो ठराव झाला त्याप्रमाणे तुम्ही ते परत राज्यशासनाला पाठवत आहात. माझी सुचना आहे आपले इथले शेतकरी मला वाटते त्यांचा सात वेळा पत्रव्यवहार झालेला आहे. राज्यशासनाकडे पण झाला आहे. आमची जमिनीचे हे आम्हाला एन.डी. झोन करुन द्या. ते रिफर केले आहे. पण ते का आले नाही हे सहा महिन्यात येते ते वर्षानुवर्ष का येत नाही. मला काही समजत नाही. ते बिचारे गरीब माणसे पाठपूरावा करु शकत नाही. कोणी असे चांगले दमदार नेतृत्व त्यांना अजूनपर्यंत मिळाले नाही की त्यांची बाजू मांडा आणि लगेच ३ महिन्यात राज्यशासनाकडून हा निर्देश आणा की महासभेत हा विषय ठेवा. पण आपल्याकडून आपण सहानुभूती दाखवून हे लेटर जे त्यांनी दिलेले आहे हे सगळे सर्व्हे नंबर आपण त्यात टाकले आणि त्यांच्यासाठी त्या शेतकऱ्यांसाठी पण आपण तेच धोरण ठेवले तर बर नाही का? नवघरचे आहे. गॅझेटकडे तिथे हे सर्व्हे नंबर समाविष्ट करु त्यांच्यासाठीही तुम्ही मागवा. ही माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

मॅडम आमचा ठराव आहे. महापौर मॅडम हा ५ सर्व्हे डी २ मध्ये करायचा विषय आहे. याचा एरिया दिलेला नाही. एका सर्व्हेचा एरिया दिलेला आहे. ४ हजार चौ.मीटर उरलेले ४ सर्व्हे कोणाच्या नावावर जमिन आहे. त्याचा थांगपत्ता नाही आणि हा डी २ करायचा झोन करायचा हा विषय आहे. आयुक्त साहेब आपल्या जवळ माहिती आहे का उरलेले ४ सर्व्हे कोणाच्या मालकीची जागा आहे ज्याचे आपण डी २ झोन करतो ती माहिती अभिलेख उपलब्धच नाही आहेत. दुसरी गोष्ट मगासपासून परत परत सांगण्यात आले राज्य शासनाचे निर्देश आहेत राज्य शासनाचे पत्र माझ्याजवळ आहे. राज्य शासनाचे असे कुठचेही निर्देश नाहीत. राज्य शासनाने काय सांगितलेले आहे वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरी करिता सादर केल्यास सादर करा म्हणून सांगितलेले नाही. हे सोमोटो महापालिकेने प्रशासनाने विषय घेतलेला आहे. राज्य शासनाने काय सांगितलेले आहे की तुम्ही असे करु शकता. करा म्हणून सांगितलेले नाही. मग एखाद्याच्या पर्सनल फायद्यासाठी ज्यावेळी ह्या महासभेसमोर ह्या ९५ नगरसेवकांसमोर विषय तुम्ही

आणतात त्यावेळी शहराचे कुठचे हीत बघता. तिथले जे नागरिक आहेत तिथे प्लानिंग ऑथोरीटी तिथे एम.एम.आर.डी.ए. आहे. सेन्सीटिव्ह इको सेन्सिटिव्ह झोन झालेले आहेत. संपूर्ण डोंगराचा खालती तिथे गाव वसलेले आहे. डी २ केल्यानंतर एक्स्ट्रा एफ.एस.आय वाढविल्यानंतर तिथे इन्फ्रास्ट्रक्चर द्यायला पालिकेजवळ तेवढा निधी किंवा तेवढी जागा आहे का त्यांना रोड वगैरे प्रोव्हाईड करायला आधी किती जागा आहे. तुम्ही सांगु शकता इथे माहिती नाही किती जागा आहे. कारण अभिलेख उपलब्ध नाही. माझ्या माहितीप्रमाणे हा जर तुम्ही डी २ झोन केलात १९२० एकर जागा डी २ मध्ये जाणार आहे. कारण याच्यामध्ये अभिलेखच उपलब्ध नाही. तुम्ही मला सांगा किती आहे. तिथुन जाणारा रोड सध्या तिथुन जाणारा रोड हा डी २ झाल्यानंतर आपण त्यांना त्या फॅसिलिटी प्रोव्हाईड करु शकतो का? आणि राहीला प्रश्न ज्या शुभारंभ हॉटेलचा तुम्ही उल्लेख केलेला आहे त्याचे मालक कोण आहेत हे आपल्याला माहिती नाही. त्या शुभारंभ हॉटेलने ही माहिती मला मगाशी देण्यात आली. एच.डी.ए. ची परवानगी घेतलेली नाही. इटिंग हाऊस परवाना नाही. गुमास्ता लायसन्स नाही. अन्न, औषधे परवाना एक्स्पायर झालेले आहेत. अग्निशमन दलाचा परवाना घेतलेला नाही आणि महापालिकेचा परवाना १८ फेब्रुवारी २०१९ मध्ये एक्सपायर झालेला आहे. अशा हॉटेल मालकासाठी महापालिकेच्या समोर तुम्ही त्याचा डी २ झोन करावा आणि त्याला एक्स्ट्रा एफ.एस.आय द्यावा त्याला फायदा करुन द्या म्हणून विषय आणता. हा किती शहराचा हितामध्ये आहे. महापौर मॅडम प्रशासनाचे काय एक्सप्लेनेशन आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही शासनाचे वाचले ना त्याआधारे हा प्रस्ताव आहे. याच्यात करायचे नाही करायचे शासन करेल.............

**अनिल सावंत :-**

परत तोच विषय आला साहेब प्रस्ताव तुम्ही दिला ठराव झाला. मेजोरीटी आहे ठराव होणार तुम्ही सांगणार नाही तुम्हाला वेळ नाही सजेशन ऑब्जेक्शन साहेब तुम्ही नोटिस प्रसिध्दी केल्यानंतर किती लोक वाचतात किती लोक सजेशन ऑब्जेक्शन देतात? तुमची लोकांजवळून ही अपेक्षा आहे का प्रत्येकाने वाचून त्याला ऑब्जेक्शन केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

साहेब केले पाहिजे.

**अनिल सावंत :-**

हे शक्य आहे का?

**मा. आयुक्त :-**

केले पाहिजे.

**अनिल सावंत :-**

साहेब तसे होत नाही. सध्या एक विषय आहे. तुमच्याजवळ किती ऑब्जेक्शन आले? तुम्ही पेपर नोटिस काढली ती किती लोकांनी वाचली. शहराच्या हिताप्रमाणे..........

**मा. आयुक्त :-**

मागच्या एका प्रकरणात १२७ ऑब्जेक्शन आले होते. आम्ही त्यांचे दोन हफ्ते हेअरींग घेतल्या.

**अनिल सावंत :-**

कुठच्याही लोकल पेपरमध्ये तुम्ही देणार नॅशनल पेपरमध्ये देणार जे गावकरी आहेत त्यांचे शिक्षण किती त्याच्यावर ते लोक कसे ऑब्जेक्शन घेणार. त्याच्या नॉलेजमध्ये तरी आहे का हा डी २ झोन होत आहे. आपल्यावरती जो डोंगर वसलेला आहे डी २ झोन होणार आहे. एक्स्ट्रा एफ.एस.आय. मिळणार आहे. तिथे मोठमोठे रिसॉर्ट होणार आहेत. हे त्याच्या ध्यानी तरी आहे का? तुमचे ५ सर्व्हे नंबर आहेत त्याच्यामध्ये एका सर्व्हे नंबरचा फक्त ४ हजार चौ.मी. आहे. बाकीची अभिलेख उपलब्ध नाहीत. असे मला उत्तर मिळालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

हा एरिया किती होतो तो आपण काऊंट करुन घेऊ.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही एरिया बघा आणि त्याचा तुम्ही आम्हाला एन्वायरमेंटल रिपोर्ट दिलेला आहे तो शेवटचा विषय आहे. हा डी २ झोन केल्यानंतर त्याच्या एन्वायरमेंटल काय फरक पडेल काय परिणाम होईल याचा विचार करा.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब हा सभागृहाचा निर्णय आहे करायचा नाही करायचा.

**अनिल सावंत :-**

साहेब हा सभागृहाचा नाही एका पक्षाचा निर्णय आहे. त्याच्याही मी पुढे जाऊन सांगतो.

**मा. आयुक्त :-**

हे जे असेच चालले तर याच्यापुढे आता कामकाज करायचे की नाही कुठलाही विषय आम्हीच देतो ना. तुम्ही प्रशासकीय मंजूरीला आर्थिक तरतूद केली. आम्ही विषय देतो. शासनाचे निर्देश आले तुमच्यासमोर ठेवतो म्हणजे शेवटी काम काय करायचे.

**अनिल सावंत :-**

साहेब याच्यामध्ये कसे आहे हा सभागृहाचा निर्णय राहत नाही. महापौर मॅडम ह्या ठिकाणी मेजोरीटी आहे.......

**मा. आयुक्त :-**

लोकशाहीमध्ये जे काही नियम आणि अधिकार आहेत ह्याच्यावर निर्णय होतात.

**अनिल सावंत :-**

साहेब आम्हाला पूर्ण माहिती तरी पाहिजे ना. महापौर मॅडम, आम्हाला हे देण्यात यावे की शासनाने सांगितले आहे. शासनाचे असे कुठलेही निर्देश नाहीत. शासनाने सांगितले तुम्ही करु शकता हे तुमच्या हितामध्ये आहे. शहराच्या हितामध्ये ते आहे की नाही ते सभागृहाने ठरवायचे आहे. शासन हे नाही सांगणार आहे की हे करा म्हणून शासन सांगत नाही. तिथे जाऊन तुम्ही परिस्थिती बघा. शासनाच्या पत्राचा वेगळा अर्थ घ्यायचा नाही. त्यांनी सांगितले तुम्ही करु शकता. करायचे की नाही ते आपण ठरवायचे शासनाने कम्पलशन केलेले नाही. माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

माझे सुध्दा तेच सजेशन आहे की याच्यात कोणी कम्पेल नाही आहे. शेवटी तुम्हाला निर्णयाचे आणि शहराची गरज विचारात घेऊन निर्णय करायचा आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही कोणासाठी प्रस्ताव आणता महापौर मॅडम ज्याने एकही परमिशन घेतलेली नाही तुमचा परवाना एक्सपायर झालेला आहे. अग्निशमन दलाची परवानगी नाही. फुड ॲन्ड ड्रग्जची परमिशन नाही. अशा एका रिसॉर्टसाठी तुम्ही महासभेसमोर विषय आणता. म्हणजे तो महापालिकेला मानतच नाही. याचा अर्थ आहे आमचा ह्या प्रस्तावाला विरोध आहे. तेथील उत्तन मधील लोकांचे हित लक्षात घेऊन हिल एरियावर इम्पलीमेन्टींग बॉडी इको सेन्सीटीव्ह झोन आहे त्या ठिकाणी एक्स्ट्रा एफ.एस.आय. दिला तर आणखीन ज्या त्या सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटमुळे एकदम त्या शहराची वाट लागलेली आहे. आणखी एक्स्ट्रा एफ.एस.आय देऊन त्या ठिकाणी जर मोठमोठ्या बिल्डींग उभ्या राहणार असतील तर पूर्ण शहर जे उत्तन डोंगराखाली शहर आहे त्याचा पूर्ण वातावरण बिघडून जाईल. म्हणून ह्या प्रस्तावाला आमचा पूर्ण विरोध आहे.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब एक विनंती आहे दरवेळी मिरा भाईंदर महापालिका कुठल्या ना कुठल्या हॉटेलसाठी प्रकृतीचा नाश करते हे मात्र पायंडा आता पाडून आहे.

**अशरफ शेख :-**

मरा भाईंदर शहराची वकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अ धसूचना क्र. टीपीएस-**1296/847/**सीआर-**162/96/**युडी-**12,** दि.**14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची वकास योजना शासन अ धसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर-**89/98/**युडी-**12,** दि.**25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे . **मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र** . टीपीएस-**1208/1346/प्र.क्र.267/08/नवि/12,** दि.**29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.**

महानगरपा लका क्षेत्रातील मोर्वा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी दि. 01/12/2007 पासून मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरण यांची वशेष नियोजन प्रा धकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर वकास प्रा धकरणाने अ धसु चत क्षेत्रातील महाराष्ट्र प्रादे शक नियोजन व नगररचना अ धनियम 1966 नुसार (काही भाग वगळून) दि. दि.**13/05/2013** व दि.**03/06/2016** रोजी मंजूरी झालेली आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या क्षेत्रासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. मौजे डोंगरी, स.क्र. 49 क, हिस्सा.क्र. 1/178(ड), 178(ई), 105(2) व 297 या जागेसाठी महानगरपालिका पत्र क्र. मनपा/2866/2007-08 दि. 02/02/2008 अन्वये इमारत प्रकार ए व बंगला (स्टिल+1 ) **मजल्याकरिता 0.2 चटई 0.2** चटईक्षेत्र निर्देशांकानुसार **678.55** चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी दिलेली आहे. तद्नंतर पत्र क्र. मनपा/नर/657/2011-12 दि. 27/05/11 अन्वये हॉटेल व्यवसाय या प्रयोजनार्थ भोगवटा दाखला दिलेला आहे. सद्यस्थितीत जागेवर शुभारंभ रिसॉर्ट प्रा. ल. या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु आहे. सदरचे हॉटेल सन 1977 च्या मंजूर विकास योजनेनुसार **हिल झोन**मध्ये समाविष्ट असून 0.2 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

मौजे डोंगरी, सर्व्हे क्र. 49 क, हिस्सा क्र. 1/178(ड), 178(ई)ए 105(2) व 297 या चारही सर्वे क्र. मधील जागा शुभारंभ प्रा. ल. यांच्या मालकीची असल्यामुळे दि. 10/01/2017 रोजीच्या पत्रान्वये त्याने सदर सर्व जागा डी – झोनमध्ये समाविष्ट करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने टीपीएस-1218/1931/प्र.क्र.112/18/नवि-12 नगर विकास विभाग मंत्रालय याने पत्रान्वये उपरोक्त विषयी मनपाचा फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठवण्यास कळविले आहे.

सदरची जागा संपुर्ण क्षेत्र हिल झोनमध्ये मोडत असल्याने कुठलाही फेरबदल घडवून 1.0 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केले तर पर्यावरणाचा नाश होईल व त्याला मिरा भाईंदर महानगरपालिका व प्रस्ताव मांडणारे कारणीभूत ठरतील. जागतिक तापमानामध्ये वाढ होत असल्याची जाणीव पूर्ण जगात होत आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे सामान्य नागरीकांपासून प्रशासकीय अधिकाऱ्यांचे ही प्रथम कर्तव्य आहे.

मिरा भाईंदर क्षेत्राची विकाय योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 38 नुसार सुधारित करणे बाबत मा. महासभा ठराव क्र. 76 दि. 15/10/2015 अन्वये मंजूरी दिली असून कलम 23(1) नुसार इरादा जाहिर केल्यासंबंधी जाहिर सुचना स्थानिक वृत्तपत्रात व शासन राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे. दरम्यानच्या काळात विकास आराखडा प्रसिध्द होण्याच्या आधीच फुटल्याची चर्चा वृत्तपत्रात प्रसिध्द झाली. शहरातील जागरुक नागरीक व स्वयंसेवी संस्थानी शासन दरबारी तक्रार केली असता तत्कालीन विधानसभा सत्राच्या चर्चेमध्ये शिवसेना पक्षाचे राज्यमंत्री यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने म.भा. मनपा प्रस्तावित आराखडा रद्द करुन नविन आराखडा फेर तयार करण्यास आदेश केले आहे व ते शासन दरबारी प्रलंबित आहे.

**शहरातले आरक्षण वाढती लोकसंख्येक्ष्या , दुरदृष्टीच्या आधारे शहर हितासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. आमचा स्पष्ट आरोप आहे . रद्द झालेल्या विकास आराखड्यामध्ये उपरोक्त विषय फेरबदला चा प्रस्ताव आधीच समाविष्ट होता . नविन विकास आराखडा प्रस्तावित होऊन मंजूर होईपर्यंत विलंब होत असल्याप्रमाणे अशाप्रकारे विषय मंजूरीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 37 अन्वये प्रस्तावित करणे. एका व्यक्तीच्या, संस्थेच्या, स्वयंस्वार्थासाठी करण्याचे कारस्थान असल्याचे दिसत आहे.**

**ज्याअर्थी उपरोक्त विषय प्रशासनाने प्रस्तावित केले आहे त्याअर्थी राजकीय , प्रशासकीय, शासकीय भ्रष्टाचाराचा हित संबंध प्रथम दर्शनीय दिसून येते . मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षणामध्ये कुठलाही बदल करावयाचा असल्यास सुधारित श हरविकास आराखड्यामध्ये प्रस्तावित करावे . शहरविकास आराखडा प्रस्तावित असताना अशाप्रकारचे प्रस्ताव शासन निर्णयासाठी महापालिकेला वर्ग करत आहे . असे अतत्वतित चुकीचे पायंडे प्रशासन जन्माला देत आहे. मि.भा.मनपा प्रशासनाचे प्रस्तावित म.प्र.न.अधिनियम 1966 चे कलम 37/1 अन्वये फेर बदलाचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.**

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम मी दिलेले सर्व्हे क्र. इन्क्लुड करणार की नाही?

**मा. महापौर :-**

कोणत्या विषयाचा?

**गिता जैन :-**

ह्याच विषयाचा.

**मा. महापौर :-**

नाही करणार.

**गिता जैन :-**

का करणार नाही. शेतकऱ्यांचा विषय आहे तुम्ही का करणार नाही आयुक्त साहेब.

**मा. आयुक्त :-**

मॅडम ह्यामध्ये नाही करता येत त्याला वेगळे निर्देश लागतात ऑलरेडी दुसऱ्या सुनावणीमध्ये यांनी आक्षेप घेतला होता. त्यामध्ये आम्ही शासनाकडे रिकमेंडेड केलेले आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. मदन सिंह, अनुमोदन श्री. दौलत गजरे. दुसरा ठराव सुचक श्री. अशरफ शेख, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार. प्रथम दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो. सुचक श्री. अशरफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. मदन सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. मदन सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ६१, विरोधात ०९, तटस्थ ०१ इतकी मते पडलेली आहेत. ठराव बहुमतांनी मंजूर. सचिव महोदय जो पेंडींग विषय होता तो घ्या.

**प्रकरण क्र. ४७ :-**

**मौजे डोंगरी सर्व्हे क्र . ४९क हिस्सा क्र .१/१७८(ड), १७८(ई), १०५(२) व २९७ या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.**

**ठराव क्र. ५३ :-**

मरा भाईंदर शहराची वकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अ धसूचना क्र . टीपीएस-**1296/847/**सीआर**-162/96/**युडी**-12,** दि**.14/05/97** अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि **.15/07/97** पासून अंमलात आलेली आहे . वगळलेल्या भागाची वकास योजना शासन अ धसूचना क्र . टीपीएस-**1298/941/**सीआर**-89/98/**युडी**-12,** दि**.25/08/2000** अन्वये मंजूर झालेली असून दि **.15/10/2000** पासून अंमलात आलेली आहे.

तद्नंतर महाराष्ट्र शासन नगर वकास वभाग अ धसूचना क्र. टिपीपी/4304/सीआर-246/04/न व-11, दि.24/08/2004 अन्वये महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या गावांसाठी शासनाने वशेष नियोजन प्रा धकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरण ( **MMRDA**) यांची नेमणूक केलेली आहे.

महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या अ धसू चत क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन, नगर वकास अ धसूचना क्र. टिपीबी/4307/108/सीआर-29/07/युडी-11, दि.09/04/2007 अन्वये वशेष नियोजन प्रा धकरण म्हणून महाराष्ट्र पर्यटन वकास महामंडळ म. यांची नेमणूक केलेली आहे.

**त्यानं**तर दि**.01/12/2007** पासून मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरण यांची वशेष नियोजन प्रा धकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरणाने उक्त अ धसु चत क्षेत्रासाठी तयार केलेल्या वकास आराखडयास शासनाने अ धसूचना क्रमांक सएमएस/टिपीबी**-4312/**प्र.क्र**.23/2013/**न व**-11,** दि**.13/05/2013** व दि**.03/06/2016** अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सद्यस्थितीत महानगरपा लका क्षेत्रातील डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या क्षेत्रासाठी मरा भाईंदर महानगरपा लका ही नियोजन प्रा धकरण आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागेपैकी स.क्र. 43क (जुना), 49/1 (न वन) या जागेसाठी महानगरपा लकेने पत्र क्र. मनपा/नर/2866/2007-08, दि.26/11/2007 अन्वये रहिवास व रेस्टॉरेन्ट या प्रयोजनार्थ प्राथ मक परवानगी दिलेली आहे. त्यानंतर सदर जागेसाठी मा. जिल्हा धकारी ठाणे यांचेकडील अकृ षक परवानगीचे आदेश प्राप्त झालेनंतर सदर ज मनीसाठी मंजुर वकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे महानगरपा लकेने दि.02/02/2008 अन्वये इमारत प्रकार ए व बंगला (स्टिल्ट + 1) मजल्याकरिता **0.2** चटईक्षेत्र निर्देशांकानुसार **678.55** चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी दिलेली असून या जागेमधील इमारतीसाठी दि.27/05/2011 अन्वये भोगवटा दाखला दिलेला आहे.

सद्यस्थितीत जागेवर शुभारंभ रिसॉर्ट प्रा. ल. या नावाने हॉटेल व्यवसाय सुरु आहे.

वद्यमान हॉटेलची जागा सन 1997 च्या मंजूर वकास योजनेनुसार **Hill Zone** मध्ये सामा वष्ट असून त्याठिकाणी 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होता त्याप्रमाणे 0.2 चटई क्षेत्राच्या मर्यादीत महापा लकेने परवानगी दिलेली आहे.

मुंबई महानगर प्रदेश वकास प्रा धकरणा ने तयार केलेल्या व शासनाने मंजुर केलेल्या वकास योजनेनुसार मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा **Green Zone** मध्ये सामा वष्ट असून स.क्र. 105(2ब) व 178(ड) ही जागा **D-1 Zone** मध्ये सामा वष्ट आहे.

मौजे डोंगरी, स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 297 या जागा **Green Zone** मध्ये असल्याने 0.2 चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच स.क्र. 105(2ब) व 178(ड) या जागा **D-1 Zone** मध्ये सामा वष्ट असल्याने 0.3 मुळ चटईक्षेत्र **+ प्रिमीयमचे 0.2 चटईक्षेत्र असे एकूण 0.5** चटईक्षेत्र अनुज्ञेय आहे.

वरील चारही सर्व्हे क्रमांकामधील जागा मे. शुभारंभ रिसॉर्ट प्रा. ल. यांचे मालकीच्या असल्याने त्यांनी दि.10/01/2018 रोजीच्या पत्रान्वये शासनास सदरील सर्व जागा **D-2 Zone** मध्ये सामा वष्ट करणेची मागणी केलेली आहे.

**त्याप्रमाणे सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 चा प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजुरीकरीता सादर केल्यास शासन त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेणार असल्याचे शासनाने दि.11/12/2018 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविलेले आहे.**

**मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने होत असल्यामुळे व शहरामध्ये पर्यटनाला चालना मिळणेच्या दृष्टीकोनातून मौजे डोंगरी** स.क्र. 49(क), हि.क्र. 1, 178(ड)ई, 105(2ब), 297 या जागा  -2 **झोनमध्ये समाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वयेच्या फेरबदलास व त्याअनुषंगिक सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मंजुरीसाठी फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देत आहेत तसेच इतिवृत्तांताच्या मंजुरीची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे**

**टीप :- सोबत नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे**

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंग अनुमोदक :- श्री. दौलत गजरे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | १) जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | सावंत अनिल दिवाकर | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | शेख रुबिना फिरोझ | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | सपार उमा विश्वनाथ | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | परदेशी गिता हरीश | |
| ९ | गोहिल शानु जोरावरसिंह | ९ | पाटील नरेश तुकाराम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | | | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | | | |
| १२ | सॉंस निला बर्नाड | | | |
| १३ | मोकाशी दिपाली आनंदराव | | | |
| १४ | जैन सुनिता रमेश | | | |
| १५ | नाईक विविता विवेक | | | |
| १६ | भावसार वंदना संजय | | | |
| १७ | बेलानी हेमा राजेश | | | |
| १८ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| १९ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २० | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २२ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २४ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २६ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २७ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २८ | भुप्तानी रक्षा सतीश | | | |
| २९ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३० | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३१ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३२ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३४ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३५ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३६ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३७ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३९ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४० | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४१ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४२ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४३ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४४ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४५ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४६ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | |
| ४७ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४८ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४९ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | | | |
| ५० | ढवण निलम हरिश्चंद्र | | | |
| ५१ | नलावडे दिनेश दगडू | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२ | शिर्के अनंत गेणू | | | |
| ५३ | घरत तारा विनायक | | | |
| ५४ | कदम अर्चना अरुण | | | |
| ५५ | पाटील अनिता जयवंत | | | |
| ५६ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ५७ | भोईर भावना राजू | | | |
| ५८ | पाटील वंदना विकास | | | |
| ५९ | भोईर कमलेश यशवंत | | | |
| ६० | बगाजी शर्मिला विन्सन्ट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता दैनंदिन संचालन देखभालीसाठी देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**शर्मिला बगाजी :-**

तुम्ही पुढच्या सभेला घ्या असे बोलत आहात ना. तुमचे म्हणणे काय आहे की तो त्याच कालावधीत आलेला आहे. त्याला अभ्यास करायला त्यांना वेळ पाहिजे. असे यांचे म्हणणे आहे कमिशनर त्याच्यावर ठाम नाहीत. गोषवारा असेल ते घ्या अदरव्हाईज तुम्ही पुढे रद्द करा विषयच रद्द करा. पुढे घ्या.

**मा. आयुक्त :-**

महासभेचे जे गांर्भिय आहे ते राहीले पाहिजे. कितीही फ्रेंडली असले तरी काही गोष्टीमध्ये कसे आहे............

**जुबेर इनामदार :-**

विषय रद्द करता येत नाही. साहेब निकाली लावावे लागेल.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम आपल्या आढावा बैठकीमध्ये जो विषय झाला होता तुम्ही समक्ष होते. उपमहापौर होते, गटनेते होते सर्व होते सर्वांचे समोर आपला ठराव कोणत्या नावाने बनवता येईल. तुम्हाला माहिती आहे परत त्याच्यात चेंजेस करायची गरज काय.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही विषयपत्रिकेवर विषय घेतला. आम्ही गोषवारा दिला.

**मा. उपमहापौर :-**

असे आहे की त्या नंतरच्याही मागण्या आहेत. मागण्या आहेत परंतु ती ह्याच्यामध्ये नोंद नाही. ज्या विषयामध्ये एकमत नाही. तो विषय एकाचे नाव फायनल करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

आता हा विषय मागे घेत आहोत. एक नाव मागे घेतो. पुढील सभेत आणू........

**मा. आयुक्त :-**

त्यांना विश्वासात घ्या. एकत्र चर्चा करा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

एक नाव मागे घेण्याची गरज काय दोन्ही ठिकाणचे आहे ना. एकच आहे ना शर्मिलाने जे नाव दिले होते.

**मा. उपमहापौर :-**

तो विषयच मागे घेत आहोत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्याचे कारण काय?

**मा. आयुक्त :-**

त्यात दोन विषय आहेत. त्याच्यातले एक मान्य आहे त्याला मान्यता द्या आणि एक जे प्रलंबित आहे त्याला पुढच्या विषयात आणा. तुमची सुचना मान्य आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आमचे म्हणण्याचा उद्देश असा आहे जी संस्था आहे त्या संस्थेचे जे नाव दिलेले होते. त्या संस्थेचे नाव फायनल झाले आहे तर मग परत चेंज करायची गरजच काय.

**मा. आयुक्त :-**

तो तर विषयावर चर्चा चालू आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

त्यांच्याशी चर्चा केली त्यांनी मान्यता दिलेली आहे.

**निलम ढवण :-**

मान्यता दिलेली नाही.

**शर्मिला बगाजी :-**

माझे काय म्हणणे आहे विषयच मागे घ्या.

**मा. उपमहापौर :-**

मागे घेत आहोत ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सचिव प्रशासनाकडून तो विषय मागे घेण्यात येत आहे. पुढच्या सभेत दिला जाईल.

**मा. महापौर :-**

पुढच्या महासभेत हा विषय येईल. तेव्हा आपण निर्णय घेऊ.

**नगरसचिव :-**

प्रशासनाने विषय मागे घेतला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, **मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ७२(२), ७३(१)(२)(३)(४), ७४(१)(२), ७९(१)(३)(४), ७५(१) या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.**

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये मी ॲडीशनल माहिती देतो. मा. प्रधान सचिवांचे यामध्ये असलेल्या बांधकामाच्या बद्दल इन्क्वायरी करण्याचे अजून ॲडिशनल एक पत्र आलेले आहे. म्हणून हा विषय प्रशासनाकडून मागे घेण्यात येत आहे. त्याचे डिटेल अभ्यास करुन पुढच्या सभेत पाठवला जाईल.

**धृवकिशोर पाटील :-**

सगळे विषय परत घ्या ना साहेब ३७ चे सगळे विषय परत घ्या ना.

**मा. आयुक्त :-**

असे तुम्ही म्हणू शकत नाही. प्रशासनाला जे निर्देश द्यायचे आहेत ते दिलेले आहेत तुम्ही याच्यावर ठराव करायला असेल तर ठराव करु शकता.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही पालक आहात तुम्ही एखादा...........

**मा. आयुक्त :-**

नाही असा आर्ग्युमेंटचा विषय नाही. धृवकिशोर पाटील साहेब हा कामकाजाचा विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

सदर प्रकरणामध्ये फेरबदल दर्शविलेला नकाशा सादर केलेला नाही. त्यामुळे फेरबदलाच्या नकाशासह प्रकरण फेरसादर करावे असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**निला सोंस :-**

महापौर महोदया मेरा प्रशासन से सवाल है प्रशासन से मैं कुछ कहना चाहती हूँ सन्मा. कमिशनरजी आज यह विषय आया है अभी बोला गया है की, आगे नकाशा लेके समथिंग विषय वापीस आएगा। मैं सबसे पहले कहना चाहूँगी की हमारे प्रभाग का सबसे वंचित क्षेत्र जो सुविधा नागरीक सुविधाओ से वंचित क्षेत्र मंगल नगर हटकेश और वहाँ के बगीचे को गार्डन को जो ८० टक्के हमारे पास है और हमने पैसा भी लगाया है महापालिकाने डेव्हलप किया है। वहाँ के बगिचे को चेंज करके रेस्टॉरन्ट के लिए आ रहा है। यह अपने आप मैं यह निंदनीय है। प्रस्ताव आना इस सभागृह का अपमान है। आप लोगोने कई बार कहाँ की महाराष्ट्र शासन का लेटर है मैंने लेटर देखा हुआ है इसके साथ भी है लेटर में अगेन कहूँगी कही पर भी नही लिखा हुआ है उन्होंने कहाँ इट इज नॉट पॉसिबल अगर आरक्षण है तो इट इज नॉट पॉसिबल माय पॉईंट इज दॅट गिविंग दॅट डायरेक्शन ॲन्ड गिविंग द डिसिजन......................

**मा. आयुक्त :-**

तुम्ही मराठीत बोला सगळ्यांना चांगले समजेल.

**निला सोंस :-**

सॉरी.

**मा. आयुक्त :-**

प्लीज माय रिक्वेस्ट तुम्ही मराठीत बोला.

**निला सोंस :-**

मैं हिंदी में बोलती हूँ।

**मा. आयुक्त :-**

हिंदीत बोला.

**निला सोंस :-**

मेरा कहने का मतलब यह है की बच्चो के बगिचा को रेस्टॉरन्ट में लाने का विषय है मैं चाहूँगी की इस सभागृह में शांती रहे और मेरा कहने का मतलब यह है की महाराष्ट्र शासन का जो लेटर है डायरेक्शन यानी दिशा देना डिसीजन देने जमीन आसमान का अंतर होता है। सर जो दिशा देता है वह जबाबदार नही होता जो डिसीजन लेता है वह जबाबदार होता है। तो मैं कहना चाहूँगी की यह प्रस्ताव आज आप चाहे निंदनीय है वापस यह प्रस्ताव कभी ना आए। क्योंकी यह जनता के हक्क के गार्डन को निकाल कर रेस्टॉरन्ट में लाना और वह भी पूर्व कमिशनर नरेश गितेजी इसे अवैध घोषित किया हुआ है। इसपे कार्यवाही है यह कोर्ट में मॅटर है कोर्ट में मॅटर होने के बाद सभागृह और जनप्रतिनिधीयो को जबाबदार बनाना यह अपने आप में निंदनीय है और आज कई विषय है जो नगररचना से जुडा हुआ है। नगररचना का एकही पदाधिकारी आज यहाँ नही है यह अपने आप में संदेह पैदा करता है। मेरी प्रशासन से रिक्वेस्ट है और अनुरोध है की, इस प्रकार का विषय लाकर सभागृह को निंदनीय ना बनो और गरीमा बनाए रखे।

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला याचा खुलासा करु इच्छितो शासनाकडून दोन प्रस्ताव आलेले आहेत. हा आरक्षण जो आपला वॉर्ड आहे त्या आरक्षणाच्या समर्थनात कमिशनर आहेत आणि तत्कालीन कमिशनर सुध्दा होते. त्यामध्ये संबंधित विकासकाने ही जागा रवि डेव्हलपर्सकडून घेतलेली आहे आणि नगरपरिषद असताना त्याला परवानगी दिलेली होती. विकास कार्यालयासाठी तो प्रस्ताव त्यांनी भोगवटा दाखल्यासाठी दाखल केला असता आम्ही त्याला रिजेक्ट केलेला आहे आणि आमच्या स्तरावर ते अमान्य केलेले आहे. इव्हन त्याने जे त्याच्या सुधारणा प्रस्तावित केली ते आहे त्या स्टेला आपण मेन्टेन केलेले आहे. त्यामुळे आम्ही महापालिकेचे हित सोडून काही केलेले नाही आणि करणार सुध्दा नाही. तर हा विषय दोन मागे घेतला पहिल्यामध्ये संबंधित विकासकाने शासनाकडे जाऊन ज्यावेळेस पत्र आणले ह्या पत्राच्या आधारे हा प्रस्ताव होता. परंतु त्यामध्ये जी परवानगी दिलेली आहे त्या काळामध्ये त्याच्यानंतर दुसरे पत्र आले आता मी धृवकिशोर पाटीलकडे पाठविलेले आहे. आपल्यालाही देईल. त्याच्यात चौकशी करावी असे मला अधिकार मिळालेले आहेत. त्यामुळे हे कामकाज होण्याचा विषयच नाही. आता तर त्याची सविस्तर चौकशी केली जाईल. त्या काळात त्याला परवानगी कशी दिली होती. म्हणून हा प्रस्ताव मागे घेतलेला आहे.

**निला सोंस :-**

सर में थोडी जानकारी देना चाहूँगी आप तो चौकशी करेंगे ही लेकीन १९९७ में डी.पी. आया और २००० में प्रसिध्दी हुआ या लागु हुई इसके पहले की इतनी सी.सी. है, सी.सी. इज गिव्हन ऑन सबजेक्ट टू उसके बाद कोई प्लिंथ सर्टिफिकेट नही है स्ट्रक्चर को अवैध घोषित कर दिया है और जैसा की आपने बताया...........

**मा. आयुक्त :-**

हम गार्डन बनाने की कोशिया करेंगे।

**निला सोंस :-**

यस सर थँक्यू वेरी मच.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, निला मॅडमने जे सांगितले त्यांनी वक्तव्य केले इनडायरेक्टली त्यांनी आरोपच केलेला आहे की ही निंदनीय बाब आहे. हे बरोबर आहे निंदनीय बाब आहे. आरक्षण बगिचा झाला पाहिजे परंतु वास्तविक जर स्थिती बघितली आयुक्त साहेबांनी पण सांगितले की आम्ही पण ह्या मताशी त्या ठिकाणी बगिचा झाला पाहिजे. सर्व सदस्यांनी पण ह्या ठिकाणी बगीचा झाला पाहिजे. पण वस्तुस्थिती काय आहे हे जर आयुक्त साहेबांपेक्षा टाऊन प्लानिंगच्या अधिकाऱ्याने जर सांगितले तर वस्तुस्थिती वेगळी आहे. आज निला मॅडमच्या बोलल्यामुळे आम्हाला हे क्लेरिफिकेशन करावे लागले की तिकडे बगिचा बनविण्याचा विरोध नाही. बगिचा बनला पाहिजे. परंतु हे बांधकाम झाले हे बांधकाम कधी झाले आणि हे कोणाच्यामुळे झाले साहेब याचा पण उहापोह झाला पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

याची चौकशी करण्याचे अधिकार मिळालेले आहेत. आम्ही ती चौकशी करु. एका दिवसात सगळ्या गोष्टी होत नाही. तो अहवाल आम्ही सभागृहासमोर देऊ.

**धृवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे परंतु हे स्ट्रक्चर आजचे नाही. सर हे स्ट्रक्चर १९९२ चे आहे. १९९७ ला आपले डी.पी. आली म्हणजे डी.पी. यायला अगोदर स्ट्रक्चर झालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

शासनाने स्पष्ट केलेले आहे ३७ चा प्रस्ताव देताना तत्कालीन परवानगी नियमानुसार नाही त्याला पुढे जाता येत नाही. तुम्हाला त्याचे अबाधित ठेवायचे असेल तर त्याला ३७ करावा लागतो.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब तोच प्रस्ताव आम्ही तुमच्याकडे आम्ही तेच म्हणतो आहोत की जर समजा ह्यांनी बांधकाम अगोदर केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तो आता सुधारणा करत आहे ना.

**धृवकिशोर पाटील :-**

बांधकाम अगोदर केलेले आहे नंतर बगिचाचे आरक्षण पडलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम जे म्हणतात आता तो आहे. ते वापरले तर इश्युज नव्हता. पण त्यांनी त्याच्यात सुधारणा करतो आणि तिचा रेस्टॉ करायचा प्रयत्न करतो. तो हा विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

तेच मी तुम्हाला सांगत आहे की महापालिकेच्या अधिकाऱ्यांना महापालिकेच्या आयुक्तांना.

**मा. आयुक्त :-**

इंटरनल कॉन्ट्रावर्सिची बघा अणि ..................

**निला सोंस :-**

कॉन्ट्रावर्सि नही मैं टेक्नीकल बात कर रही हूँ.........

**जुबेर इनामदार :-**

डी.पी. १९९२ साली प्रसिध्द झालेला आहे. डी.पी. प्रसिध्द झालेला आहे. त्याला मंजूरी १९९७ साली झाली आहे.

**मा. आयुक्त :-**

विषय मागे घेतल्यानंतर सुध्दा तुम्ही परत चर्चा करत आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब समजा जर काहींनी चुकीची माहिती दिली असेल तर त्या माहिती क्लेरिफिकेशन केली पाहिजे की नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याचा खुलासा केलेला आहे ना.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसुन जा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

जो विषय मागे घेतलेला आहे त्याच्यावरती किती चर्चा करणार आहेत.

**निला सोंस :-**

सर सिर्फ में एक टेक्नीकल बात कहना चाहूँगी मॅडम सभागृह को भी अच्छा रहेगा जैसा की धृवकिशोर पाटीलजीने कहाँ की, किसी ना किसीको मिला है कोई ना कोई जिम्मेदार है चाहे वह नगररचना में हो जो भी हो लेकिन मैं यह विषय कहना चाहूँगी की अगर १९९३ या १९९४ में मिला होगा आज नया डी.पी. प्लान आता है.........

**मा. आयुक्त :-**

मॅडम इसमें कमिशनर के डिटेल इन्क्वायरी के राईट मिले है तो वी विल रिक्वायर डिटेल्स.

**निला सोंस :-**

सर टोटली आप पे भरवसा है, जनता का कल्याण होगा।

**मा. आयुक्त :-**

आपण त्याला आता परत वेळ घालविण्यात काही अर्थ नाही.

**निला सोंस :-**

ओके. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**गिता जैन :-**

साहेब ह्या विषयाला धरुन बोलते आज विषय निघालेला आहे म्हणून सांगते, आपल्याकडे केवढी अशी वास्तू आहे जे आपण १९९३, १९९४ मध्ये झालेली आहे आणि १९९७ मध्ये आपण त्यावर काही ना काही रिझर्व्हेशन टाकलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तत्कालीन वेळेत डेव्हलपमेंट प्लान होता उदा. नवघर गाव घ्या, गोडदेव गाव घ्या असे रस्ते टाकलेले आहेत की तिथे पूर्ण २-२, ४-४ मजली घरे आहेत. त्या काळात ज्या लोकांनी काम करत होते त्याचे त्यांनी सर्व्हे केला पाहिजे होता त्याला लँड युज प्लान म्हणतात.

**गिता जैन :-**

साहेब माझा प्रश्न फक्त त्या गावासाठी नाही.

**मा. आयुक्त :-**

बऱ्याच ठिकाणी असे इश्युज आहेत. आता नविन डी.पी. ज्यावेळेस होईल ह्या सगळ्या गोष्टी रेक्टीफाय केल्या जातील.

**गिता जैन :-**

होणार साहेब पण हे विषय आणता ना. आपण जैसल पार्कचा मुद्दा का घेतला नाही. जैसल पार्कमध्ये त्या बिल्डींगवर............

**मा. आयुक्त :-**

ह्या २०१७ मध्ये जे अधिकार आहेत तेवढेच आम्हाला आणावे लागते. बाहेरचे काही घेता येत नाही.

**गिता जैन :-**

मी ॲग्री करते साहेब पण विषय जर तुम्ही दिलाच होता तर बाकीचे कशाला..........

**मा. आयुक्त :-**

हे वैधानिक काम आहे इथे विषय शासनाच्या निर्देशावरुन घेतल्यानंतर सुध्दा नेगेटिव्ह चर्चा होते. आयुक्त म्हणून तर मी कसलाही असा विषय आणू शकत नाही.

**गिता जैन :-**

जो अन्याय झालेला आहे तो सुधारायची.............

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे मागणी केली पाहिजे.

**गिता जैन :-**

साहेब कितीदा मागणी केलेली आहे. पत्रव्यवहार तपासून बघा तुमच्याकडे येत नसेल. आता नोटिस पाठविली होती. त्या बिल्डींगला पाडतो म्हणून.

**मा. आयुक्त :-**

कुठली.

**गिता जैन :-**

गिता नगर १९९२ मध्ये झालेली बिल्डींग.....

**मा. आयुक्त :-**

डेव्हलपमेंट प्लानच्या पूर्वीची बिल्डींग आहे का?

**गिता जैन :-**

मी तेच सांगते साहेब तेव्हा आपण चौकशी करत नाही कधी झालेली आहे कधी नाही आणि नाही त्या गोष्टी आपण इथे सब्जेक्ट म्हणून आणतो. साहेब नोटिस दिलेली ती माणसे रात्री झोपले नाही. तुम्ही विचारा नोटिस पाठविली होती की नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण त्याची चौकशी करुन ती रस्त्यातली बिल्डींग नाही ऑलरेडी गावातले बांधकाम आहे.

**गिता जैन :-**

मी गावातली सांगत नाही. १९९२ मध्ये झालेल्या बिल्डींगचे बोलत आहे. जे इथे ब्रिज खाली आहे. त्याला तुम्ही नोटिस पाठवली की तुमची १५ दिवसांच्या आत बिल्डींग पाडली जाणार.

**मा. आयुक्त :-**

त्याला परवानगी आहे?

**गिता जैन :-**

ओ.सी. आहे.

**मा. आयुक्त :-**

कुठला विषय मला काही लक्षात येत नाही आता सरळ अशी चर्चा केली तर कसे लक्षात येईल.

**गिता जैन :-**

साहेब जेसल पार्कमध्ये ४ बिल्डींग अशी आहे.....

**मा. आयुक्त :-**

ते तपासून घेऊ.

**गिता जैन :-**

४ बिल्डींग अशी आहेत ज्यावर गार्डन रिझर्व्हेशन..........

**मा. आयुक्त :-**

पण ३७ ची कारवाई करायला निर्देश लागतात सोमोरा विषय कुठला आणला जात नाही.

**गिता जैन :-**

मी ॲग्री करते. पण एवढे पत्रव्यवहार झाल्यानंतर तो विषय का आला नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांचा येणाऱ्या डी.पी. मध्ये रेक्टीफिकेशन केले जाईल.

**गिता जैन :-**

तसा त्याला जवाब तरी द्या.

**मा. आयुक्त :-**

देता येईल.

**प्रकरण क्र. ४८ :-**

**मौजे घोडबंदर सर्व्हे क्र . ७२(२), ७३(१)(२)(३)(४), ७४(१)(२), ७९(१)(३)(४), ७५(१) या जागेच्या वापराचे बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे.**

**ठराव क्र. ५४ :-**

सदर प्रकरणामध्ये फेरबदल दर्शविणारा नकाशा सादर केलेला नाही. त्यामुळे फेरबदलाच्या नकाशासह प्रकरण फेरसादर करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४९, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र . ३२८ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन सेंट विलफेअर एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत.**

सुरेश खंडेलवाल :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षित आ.क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ) साठी आरक्षित असून मंजूर विकास योजना अहवालानुसार एकूण क्षेत्र 10000 चौ.मी. आणि सदर आरक्षणातील सदर क्षेत्रापैकी 1361 चौ.मी. जागा महापालिकेला हस्तांतरीत झालेली असून उर्वरीत क्षेत्राची मालकी सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचेकडे असल्याने सदरचे आ .क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ) विकसीत करण्याचे सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचा मानस असल्याचे दिसून येते. यास्तव सदर आरक्षणाने बाधीत महानगरपालिकेच्या मालकीची / ताब्यातील जमिन मिळणेकामी त्यांनी विनंती केलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहरातील आरक्षणाचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून व संपूर्ण आरक्षण विकसीत होवून त्याचा लाभ शहरातील जनतेला होणसाठी महापालिकेच्या ताब्यातील जागा शासनाच्या सिध्दशिघ्र गणकाच्या दराच्या 110% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन होवून विकसीत करणेस देणेबाबत महापालिकेने धोरण निश्चित केलेले आहे.**

**सदर आरक्षण क्र.328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या एकुण 10,000 चौ.मी. क्षेत्रापैकी फक्त 1361 चौ.मी. क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात असल्यामुळे व सदर आरक्षण एकत्रित विकसीत होण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या ताब्यातील क्षेत्र महापालिकेने निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेवून विकसीत करणेस देणेसाठी व तसेच सदर आरक्षण क्र.328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) हे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये विकसीत करणेस देणेसाठी ही सभा मंजुरी देत आहे.**

मनोज दुबे :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

मा. महापौर मॅडम ठरावामध्ये एक उल्लेख आहे १३६१ चौ.मी. जागा परत त्या वेल्फेअर एज्यूकेशन सोसायटीला दिल्यानंतर शहरातील मुलांचे भले होणार आहे. मला कळले नाही की ही जागा त्यांना दिल्यामुळे शहरातील मुलांचे काय भले होणार आहे. महापालिकेच्या ताब्यात आलेले आरक्षण टी.डी.आर देऊन ताब्यात घेतलेले आरक्षण परत त्याच संस्थेला द्यायचे.

**मा. आयुक्त :-**

त्याच्याकडून नाही घेतलेले ते थर्ड पार्टीकडून एखाद्या आरक्षणामध्ये मल्टीपल ओनरशिप असते.

अनिल सावंत :-

१३६१ आपल्या ताब्यात आले.

**मा. आयुक्त :-**

ते त्या संस्थेतून आलेले नाही. थर्ड पार्टीकडून आलेले आहे.

अनिल सावंत :-

टोटल आरक्षण १०००० चौ.मी.

**मा. आयुक्त :-**

मुद्दा समजून घ्या. १०००० चौ.मी. मध्ये ३-४ ओनर असतात. काही ओनर त्याची एरिया विकसित करतात त्यांची जागा आपल्याकडे हस्तांतर करतात. पण काही ओनर ती जागा विकसित करत नाही. त्यांची जागा आपल्याकडे न आल्यामुळे ते आरक्षण तसेच अबाधीत पडून राहते. शासनाने निर्णय केला आहे. कोणतेही आरक्षण डेव्हलप करायचे असेल तर मिनिमम ५० टक्के जागा ताब्यात पाहिजे.

**अनिल सावंत :-**

पालिकेला डेव्हलप करायचे असेल तर......

**मा. आयुक्त :-**

पालिकेला कोणालाही त्यांची जागा डेव्हलप करायचे त्याला राईटस आहेत. तसा प्रस्ताव दाखल करु शकतात. त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे एकतर माझा प्रस्ताव अलाऊड करावा आम्ही त्याला थांबवलेले आहे. एकतर तुमची कम्पलीटली जागा आमच्याकडे द्या तर त्याने आमची जागा मागणी केलेली आहे. ह्याच्यावर विचार केला पाहिजे की छोट्या जागेमध्ये आपण काही करु शकत नाही. पूर्ण जागा विकसित झाली तर पूर्ण शहराला त्याचा बेनिफिट होऊ शकतो आणि हे करत असताना जास्तीचा जागा मालक क्लेम करेल ना. त्याच्यामध्ये आपली जी मालमत्ता आहे ते बाजारभावाने त्याच्याकडून पैसे घेऊन वसूल केले पाहिजे. हा मुद्दा नीट समजून घ्या. आपल्या तीन भावाच्या वादामध्ये एखादी जागा किती वर्ष पडून असते तसा हा प्रकार होतो.

**अनिल सावंत :-**

ठीक आहे.

**मा. आयुक्त :-**

म्हणून ह्याच्यामध्ये विषय असा आहे की आपण त्याला १२५ टक्के मार्केट भावाचा आपण आर.आर भावाचा पैसे घेण्याचा प्रस्ताव दिला होता. आपल्या सभागृहाने ११० टक्के केला. हे पैसे घेऊन आपण त्यांना ही जागा जर दिली आणि त्यांनी घेऊन बसायचे नाही. आपल्याकडे फुल डेव्हलपमेंटचा प्रस्ताव दाखल करायचा. त्यानंतर त्याने शाळेचे काम केले पाहिजे हा ह्या मागचा उद्देश आहे. त्यामुळे ते आरक्षण विकसित होऊ शकते. जे विकर सेक्शनचे १० टक्के चे शाळामधले आरक्षण असतात. ते आपण ठेवू शकतो. चर्चा करुन त्याच्यावर जास्तीची जबाबदारी पण देऊ शकतो.

**अनिल सावंत :-**

मला हेच म्हणायचे आहे समावेशक आरक्षण खाली त्यांनी डेव्हलप केल्यानंतर ते आरक्षण महापालिका..............

**मा. आयुक्त :-**

शाळेच्या बाबतीत तसा पर्टीक्युलर निर्णय घेण्याचा आपल्याला अधिकार ही फुल प्लेज डेव्हलप करु शकतो. एखादा ओनर त्याच्या शाळेचा ग्राऊंड असेल...........

**अनिल सावंत :-**

एखादी महापालिकेची प्रॉपर्टी निविदा प्रक्रिया पूर्ण न करता भले तो मार्केट रेट असेल आपण तो एखाद्या व्यक्ती देऊ शकतो का?

**मा. आयुक्त :-**

हा विकास करण्याचा मुद्दा आहे. आऊट राईट प्लॉट निगोशिएशनचा मुद्दा नाही. तुम्ही म्हणता ह्याच्या निविदा काढा. थर्ड पार्टी तो प्लॉट कोणी घेऊ शकत नाही. नॅचरल लॉ प्रमाणे कसे होईल मला सांगा. तो अडून त्याची किंमत एक चर्तुथांश सांगितली. ऑनलाईनमध्ये तर आपण अजून अडचणीत येणार. तुम्ही व्हेरी ट्रान्सप्लान्टली निर्णय घ्या. शहराचे भलं करायचे असेल तर.

**अनिल सावंत :-**

आता तुम्ही रेडी रेकनरचा रेट लावणार?

**मा. आयुक्त :-**

रेडी रेक्नर प्लस जास्तीचे पैसे त्याला आपण लावू.

**अनिल सावंत :-**

रेडी रेकनर आणि मार्केट रेट.

**मा. आयुक्त :-**

तो डिसाइड करण्यासाठी आपण एक कमिटी करा. त्याच्यामध्ये मान्य करु.

**गिता जैन :-**

साहेब मला सांगा त्याआधी तुम्हाला राज्य शासनाची मंजूरी घ्यायची गरज आहे की नाही. मला फक्त अधिनियमाप्रमाणे विचारायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही विषय समजून घेतला पाहिजे.

**गिता जैन :-**

मी विषय समजून घेतला आहे.

**मा. आयुक्त :-**

एखादा प्लॉट मार्केट भावाने जर डिस्पोजल करायचा असेल तर आपल्याला अधिकार आहेत. मार्केट भावाच्या खाली जात असेल तर त्याला राज्यशासनाची परवानगी आवश्यक आहे.

**गिता जैन :-**

मार्केट किंवा रेडी रेक्नर.

**मा. आयुक्त :-**

मी मार्केट म्हटले आहे. रेडी रेक्नर वेगळा विषय झाला.

**गिता जैन :-**

मग तुम्ही सांगता तुम्हाला राज्य शासनाकडे..........

**मा. आयुक्त :-**

राज्य शासनाकडे आपल्याला केव्हा जायला लागेल. मार्केट भावाच्या जर कमी काही निगोशिएशन करत असाल तर त्याला मान्यता लागेल.

**गिता जैन :-**

मी तोच मुद्दा पुन्हा विचारतो की मार्केट भाव डिसाइड कसा करायचा.

**मा. आयुक्त :-**

आपण करु शकतो. आपल्या पाच जणांची कमिटी करा. संबंधित विकासकाला बोलवा. मार्केट भाव काय आहे ते आपल्या सर्वांना माहित आहे. त्याला बोलवून ती अमाऊंट ओपनली...........

**गिता जैन :-**

तुम्ही निविदा त्याला बोलवल्याशिवाय आपण हे करु शकता का?

**मा. आयुक्त :-**

प्लॉट द्यायचा असेल निविदा काढायला लागतो तर तुमचा प्लॉट ७५ टक्के आहे आणि निविदा काढली तो छोटा प्लॉट कोण भरेल. कसा घेईल तो.

**गिता जैन :-**

कायदा काय सांगते तुम्हाला निविदा काढायची आहे. कोण भरेल नाही भरेल ते जाऊ द्या.

**मा. आयुक्त :-**

एक मुद्दा मी ह्यांचा किंवा तुमचा मान्य करु शकतो ११० बेस रेट घेऊन आपण हे कोण घेईल त्याची ऑफर मागवायची ओपन जाहिरात देऊन त्याच्यापेक्षा जास्तीचे देत असेल तर आपण त्याचा निर्णय करायचा असे तुमच्या मनात आहे का?

**अनिल सावंत :-**

साहेब तसेच करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

तसे करु शकतो.

**अनिल सावंत :-**

कॉम्पीटेशन होईल आणि पालिकेचा फायदा होईल.

**मा. आयुक्त :-**

करता येईल. बेस रेट आपण फायनल करायचे ११० पट आणि त्याच्यावर त्याच्याकडून ऑफर मागवायची. तसे धोरण केले किंवा स्टॅन्डींगमध्ये ठेवले........

**जुबेर इनामदार :-**

ज्याच्या हातामध्ये आरक्षण आहे ५० टक्के आरक्षित आहे.

**मा. आयुक्त :-**

६७ टक्के आरक्षण आहे.

**जुबेर इनामदार :-**

शिल्लक राहिलेले ५० टक्के.

**मा. आयुक्त :-**

आपले ५० टक्के नाही कमी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

कमी जास्त जे काय असेल ते अशी तुम्ही जाहिरात काढल्यानंतर निविदा प्रक्रिया केल्यावर कोण येणार फक्त शिल्लक राहिलेले.

**मा. आयुक्त :-**

म्हणून मी म्हणतो व्हेरी ओपनली आपण चर्चा करतो. ते तुम्ही समजून घेतले पाहिजे ह्याच्यामध्ये शाळेचे आरक्षण टाका की इतके विद्यार्थी ठेवले पाहिजेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

आपल्या सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडला विषय असा आहे की समोरच्या माणसाकडे.......

**मा. आयुक्त :-**

ह्याचे ७ प्रोजेक्ट मान्य झाले आहेत. आपली कमिटी करा त्या प्रस्तावाचा आपण अभ्यास करु. वेगळा विषय माझा राहीला.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

महासभेत सर्वांनी मिळून जो शेवटी ठराव केला होता की मॅक्झीमम जागा ज्या जागा मालकाकडे आहे. आरक्षणाची उरलेली जागा त्याला आपल्याला द्यायची आहे. आमचे सहकारी सांगतात टेंडर बिड वगैरे ऑफिशियल प्रोसेस करा. मा. आयुक्त साहेब ११० टक्के महासभेत ठराव केला आता समजा बिड त्याच्यामध्ये टाकली किंवा ओपन टेंडर केली त्याच्यामध्ये मी तुम्हाला सांगतो दोन प्रमाणे ५० पेक्षा जास्त रिर्झव्हेशन असेल तो डेव्हलप करु शकतो. १३६१ मीटर प्लॉट आहे तो कोण घेणार आणि मी सांगतो ज्याला घ्यायचा असेल तसे मी ह्याच्यामध्ये सांगतो अजिबात पॉसिबल नाही.

**मा. आयुक्त :-**

टेंडर काढले की तो कमी रेट भरेल कमी भरले तर आपल्याला देता येणार नाही.

**गिता जैन :-**

तुमचा अधिनियम सांगते बाजार भावापेक्षा खाली देऊ शकत नाही. तो कशाखाली बोलणार तुम्ही बाजारभावापेक्षा देऊ शकत  नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम तुम्ही जे सांगता आपला जो रेडी रेक्नरप्रमाणे ठराव झाला होता. आपण ११० टक्के घेतो.

**गिता जैन :-**

रेडी रेक्नर आणि बाजार भावामध्ये किती फरक आहे ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

बाजार भाव निश्चित करुन बाजार भावाच्या खाली त्याच्याकडून घ्यायचे नाही. हा एक सूझाव मान्य आहे. बाजारभाव कसा निश्चित करायचा...............

**गिता जैन :-**

निविदा काढल्याशिवाय कसे देणार.

**मा. आयुक्त :-**

एक विषय तत्वतः मान्य झाला आहे. बाजार भावाच्या खाली त्याला त्याला कम्पेन नाही करायचे. फक्त कसे डिसाइड करायचे ह्याच्यावर धोरणात्मक निर्णय.............

**जुबेर इनामदार :-**

बाजार भाव जास्त आहे रेडी रेक्नर कमी आहे.

**मा. आयुक्त :-**

काही ठिकाणी रेडी रेक्नर जास्त असतो. बाजारभाव कमी असतो. दोन्हीमध्ये जे हायर असेल ते आपण घ्यायचे. मला वाटते असा निर्णय करा.

**गिता जैन :-**

साहेब १० टक्के घेऊन..........

**मा. आयुक्त :-**

१० टक्के किंवा बाजार भाव ज्याच्यात जे जास्त असेल ते......

**गिता जैन :-**

१० टक्के काय आहे. आय ॲम आस्कींग यू १० टक्के घेऊन काय करायचे?

**मा. आयुक्त :-**

म्हणजे.

**गिता जैन :-**

तुम्ही ह्याच्यात १० टक्के घ्यायचे असे ह्याच्यात सांगितले आहे.

**मा. आयुक्त :-**

कोणी प्रस्ताव देण्याच्या पूर्वी कमीत कमी १० टक्के त्यांनी कन्सेन तर दिली पाहिजे. नाहीतर हवेत कोणी प्रस्ताव देईल आणि तो प्रस्ताव घेऊन यायचा आणि नंतर तो पळून जायचा मग ते होणारच नाही.

**गिता जैन :-**

आपल्या सुविधेसाठी आपण तसेच केले.

**मा. आयुक्त :-**

मॅडम हा विषय तुम्हाला लक्षात आला पाहिजे.

**गिता जैन :-**

मला लक्षात आले कोणीतरी ते तुम्हाला दिले.

**मा. आयुक्त :-**

समजा तुमची ७५ टक्के एका प्लॉटमध्ये जागा आहे. महापालिकेची १५ टक्के जागा आहे. समजा त्याचे आम्ही टेंडर काढले तर कोणी १५ टक्के वाले बाहेरचे भरेल का?

**गिता जैन :-**

पण नियम जे आहे तुम्ही ई-निविदा काढल्याशिवाय हे देऊ शकता का? मी फक्त ते विचारते.

**मा. आयुक्त :-**

आऊट प्राईज एखादा प्लॉट डिस्पोजल करायचा असेल तर बाजार भावाच्या खाली देता येत नाही. ई-निविदा काढली पाहिजे. इथे डेव्हलपमेंटचा विषय आहे.

**गिता जैन :-**

पण तुम्ही प्लॉट देता ई-निविदा काढल्या शिवाय कसा देणार?

**मा. आयुक्त :-**

त्याचा सगळा भाग घेऊन प्लॉट होतो.

**गिता जैन :-**

मी फक्त एवढे विचारते कायद्यात बसणार का? आपण ई-निविदा काढल्याशिवाय जर दिले तर ते कायद्यात बसते का? मी फक्त तेवढे विचारले द्यायला पाहिजे. आय ॲग्री विथ यू प्रॅक्टीकली ते बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

ई-निविदा काढली तरी त्याचा बाजारभावापेक्षा कमी आले तर आम्ही विचार करणार नाही. समजा ई-निविदेच्या नावाखाली तुम्ही नेगेटिव्ह बिड केलात मग आम्हाला तुम्ही कम्पेर करु नका ते आम्ही मान्य करणार नाही.

**गिता जैन :-**

साहेब पण नियम आहे. तुम्हाला ई-निविदा काढायलाच लागेल. मी नियमाचे बोलते. तुम्ही ई-निविदा काढल्याशिवाय त्यांना देऊ कसे शकणार. मी नियमचेच बोलते.

**मा. आयुक्त :-**

हे बायबॅक पॉलिसीमधून धोरण केले होते.

**गिता जैन :-**

मी आयुक्तांना विचारते त्यांना जवाब देऊ द्या.

**मा. आयुक्त :-**

ठीक आहे त्यांचा एक सूझाव आहे.

**गिता जैन :-**

माझा संशय आहे तुम्हाला विचारायचा मला अधिकार आहे. माझा संशय क्लियर करायचा मला अधिकार आहे की नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या माध्यमातून होऊ द्या. काय फरक पडतो.

**मा. आयुक्त :-**

ठीक आहे. ई-निविदेचा त्याच्यात विचार करु. तुमची सुचना मान्य आहे. बाजारभावाचा विचार केला जाणार नाही.

**गिता जैन :-**

साहेब ते नियमामध्ये लिहीलेले आहे. बाजारभावापेक्षा तुम्ही कमी देऊ शकत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

ई-निविदा कशी पॉसिबल आहे. तुम्ही सांगा.

**मा. आयुक्त :-**

मुल्यसाठी.

**धृवकिशोर पाटील :-**

फक्त मुल्यासाठी ओके.

**मा. आयुक्त :-**

पण कमी भरले तर आपण मान्य करणार नाही.

**गिता जैन :-**

मान्य करायचे नाही ते पण नियमामध्ये आहे.

**मा. आयुक्त :-**

कृपया सिरियसली चर्चा करा हा विषय पूढे येणार आहे. सन्मा. माजी महापौरांचे असे म्हणणे आहे बाजारभाव पहिले ई-निविदा काढून डिसाईड करुन घ्या.

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये एक एक्झाम्पल घ्या की गिता मॅडमची एक स्कूल आहे. त्याच्या बाजूला थोडीशी जागा आहे. समजा १०० मीटरचा प्लॉट आहे ७० मीटर ह्यांच्याकडे आहे आणि ३० मीटर तुमच्याकडे आहे. ३० मीटर त्यांनी मागितली ॲज पर लॉ की मी डेव्हलप करु शकते आणि ३० टक्के तुमच्याकडे आहे तुम्ही डेव्हलप करु शकत नाही. एज्यूकेशन पर्पजसाठी. आता तुम्ही सांगितले की मी ई-निविदा काढणार आता मी जर ह्यांचा दुश्मन आहे आणि मला ह्यांना मुद्दामहून लास्टला टाकायचे आहे. मी ई-निविदा भरणार आणि जो रेट समजा १०० रुपये असेल तर मी मुद्दामहून २०० भरेन. तर मग तुम्ही काय करणार? बाजारभाव ऑलरेडी १०० रुपये आहे आणि मला माहित आहे. त्या मॅडमला हा प्लॉट द्यायचा नाही आणि प्रपोजल होऊ द्यायचे नाही आणि मी असंतुष्ट आत्मा आहे. मी तो रेट जास्त लावला मग अशावेळी तुम्ही काय करणार?

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

कम्पलसरी नाही. ५० टक्के पेक्षा जास्त असेल तर डेव्हलप करु शकता.

**गिता जैन :-**

साहेब तुम्ही जे सांगता ते प्रॅक्टीकल आहे. मी त्याला नाकारत नाही. मी नियमाचे विचारते. उद्या कोणी क्वेशन केला की तुम्ही ई-निविदा काढल्याशिवाय तो प्लॉट कसा विकला.

**मा. आयुक्त :-**

व्हेरी ट्रान्सफरन्टली आपण करतो. ह्याच्यात कोणाला अंधारात ठेवून करत नाही.

**गिता जैन :-**

आपण ट्रान्सफरन्टली करतो. पण अधिनियम आहे त्याचे तुम्ही काय करणार?

**मा. आयुक्त :-**

कोणता.

**गिता जैन :-**

जो अधिनियम दिला आहे बाजारभावापेक्षा ई-निविदा काढल्याशिवाय प्लॉट विकू शकत नाही. मी फक्त नियमाचे विचारते.

**मा. आयुक्त :-**

बरोबर आहे त्यामध्ये आऊट राईट पूर्ण प्लॉट जर विकत असेल तर त्याठिकाणी ते लागू होते.

**धृवकिशोर पाटील :-**

महापालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभाव वितरीत करण्याचा अधिकार आयुक्तांना आहे.

**मा. आयुक्त :-**

मी तेच सांगतो. शासनानी विषय दुरुस्ती करुन हा अधिकार आपल्याला दिलेला आहे. नाहीतर ९६ पासून ते प्लॉट असेच पडलेले आहेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

टी.डी.आर देऊन प्लॉटवर एन्क्रॉचमेंट झालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ज्या एरियामध्ये प्लॉट आहेत ना तिथे किती घाण असते तुम्ही बघा. पत्रे लावून ठेवले आहे ते चांगले आहे. जे खुले आहे त्या ठिकाणी किती प्रकारची घाण, माती, रोडा त्याची सर्वपक्षानी एक कमिटी करा. त्या कामकाजाला आमच्या सोबत ठेवा. सगळे कामकाज व्हेरी ट्रान्सफरन्टली केले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त साहेब ऑन द हाऊस ७९ प्रमाणे पालिकेची जी मालमत्ता आहे ती तुम्ही विकू शकता. त्याच्यासाठी ई-निविदा प्रक्रिया काढणे गरजेचे असते.

**मा. आयुक्त :-**

ही मालमत्ता आपण डबघाईला आले म्हणून विकत नाही. गैरसमज होतो. आपल्या शहराचे आरक्षण ज्या पर्पजसाठी आहे ते विकसित झाले पाहिजे आणि लोकांना त्याची फॅसिलीटी भेटली पाहिजे. असा तुम्ही ह्याच्या अदर साईडने विचार करा ना. हा प्लॉट गेले ४०-५० वर्ष पडून आहे. कोणाला लाभ झाला. आज समजा ११० टक्केनी नऊ कोटी रुपये आले, नऊ कोटीचा मंथली इंटरेस्ट किती होतो. इतकी वर्ष ते प्लॉट ताब्यात घेऊन काय केले. ह्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजे. मार्केट कॉस्टनी त्या छोट्या प्लॉटचे ९ कोटी आले. त्याचे मंथली भाडे काय होते. ह्याच्यावर निर्णय न करता हे असेच राहीले तर कोणाचे नुकसान आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

तिकडे एन्क्रॉचमेंट झाले. लोकांनी प्लॉट बघितला पण नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

हा निर्णय नाही केला आणि त्याच्यापुढे गेलो नाही. ते तसेच राहीले तर नुकसान कोणाचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

ठाणे महापालिकेमध्ये हे धोरण चालू केल्यानंतर गेल्या वेळेला देशमुख साहेबांनी ए.डी.टी.पी. असताना इथे विषय आणला होता की दुसऱ्या महापालिकेमध्ये असे धोरण केले आहेत. कारण आपल्या जागेवर एन्क्रोचमेंट चालू आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

एखाद्या प्लॉटमध्ये जैन मॅडमचा ७५ टक्के हिस्सा आहे आणि २५ टक्के हसमुख गेहलोतचा होता आणि त्याने तो डेव्हलप केला आणि त्यांनी माझ्याकडे ५ वर्षाखाली टी.डी.आर नी तो प्लॉट ताब्यात दिला. आज त्या प्लॉटचे मूल्य १० कोटी आहे पाच वर्षापासून तो प्लॉट अजून तसाच पडून आहे. जैन मॅडमची डेव्हलपमेंटची गरज नाही. पर्सनली घेऊ नका आणि तुम्ही भविष्यात कधी डेव्हलपमेंटला येणार माहित नाही. मी तुम्हाला फोर्स करावा तर तुम्ही मला कन्सन देत नाही. अशा परिस्थितीत ती जागा पडून आहे. काही दिवसांनी त्यांचा ७५ टक्के एरिया डेव्हलप करायला आमच्यासमोर येऊ शकतात आणि आम्हाला त्यांना परवानगी द्यायला लागते. ह्याच्यात सुध्दा जे दुसरे तिवारी आहेत त्यांना द्यावे लागेल. त्याचे अडवता येत नाही. विषय असा आहे आमच्या टाऊन प्लानिंगनी आमच्या समोर सादर केला हा प्लॉट जर डेव्हलप केला आणि त्याचे पैसे घेतले आणि फॅसिलिटी घेतली तर अजून सुस्थितीमध्ये तो एरिया डेव्हलप होऊ शकतो. हा बेसिक कॉस्ट झाला आता अशा परिस्थितीमध्ये ही जागा जैन मॅडमला देताना त्याच्या मार्केटच्या खालचे मावेदा आपण घेतला नाही पाहिजे. ह्या मताचा मी आहे आपण आहात. ते करत असताना पुढे कसे जायचे तर हा मुद्दा आहे. आम्ही १२५ आर.आर व्हॅल्यू लावला होता. आपल्या शहराचा आर.आर व्हॅल्यू हा मार्केटशी मिळताजुळता आहे. आपण सगळे व्यवहारीक आहात. तर मी त्यामध्ये २५ टक्के एक्स्ट्रा मार्केट बेनिफिट त्यांना छोटासा प्लॉटची गरज आहे तर त्यांनी २५ टक्क्याचा नुकसान घेऊन आम्हाला दिला पाहिजे. आज समजा त्या २५ टक्केचे १० कोटी रुपये होतात. आज त्यांच्याकडून मला ते १० कोटी रुपये महापालिकेला भेटतात. हा प्लॉट मी तत्वतः त्यांच्या नावे करतो त्यांनी तत्काळ दोन तीन महिन्यात तो प्लॉट आम्हाला प्लान डेव्हलपमेंटला सादर केला पाहिजे. त्याचा विकार कर भेटणार आणि त्यांनी तिथे शाळा करणार आणि फुल प्लेस त्याने शाळा डेव्हलप करणार त्यात सुध्दा आपण आपल्या

विकर सेक्शनच्या मुलासाठी १० टक्के आरक्षण ठेऊ शकतो. हे कायद्यात नाही पण माझा मनोदय आहे आणि संबंधित पार्टीला मी बोललेलो आहे आणि त्यांनी ते मान्य केलेले आहे. तर अशा परिस्थितीत आपण पुढे गेलो तर कोणाचे नुकसान आहे.

**गिता जैन :-**

साहेब मी परत तुम्हाला सांगते मी ॲग्री करते युअर प्रॅक्टीलल वेरी राईटस्. मी फक्त हा विचार करते की उद्या कोणी अटकवायला नको.

**मा. आयुक्त :-**

नाही काही अटकवत नाही.

**गिता जैन :-**

प्रोसिजर केली नाही. मी प्रोसिजर विचारते कारण अधिनियमात हे प्रोसिजर सांगितलेली आहे की तुम्ही ई-निविदा काढा. बाजार भावापेक्षा तुम्ही कमीत विकु शकत नाही. हे अधिनियम आहे आणि आपण ते अधिनियम पाळत नाही तर ते आपले बरोबर होणार का?

**मा. आयुक्त :-**

बाजार भावासाठी आपण क्लॅरिटी करुन घेऊन तो ह्या प्लॉटसाठी म्हणून नाही त्या एरियासाठी.

**गिता जैन :-**

यांच्या प्रश्नाचे एक उत्तर देते साहेब ३० टक्के वाला निविदा भरणार नाही कारण तो डेव्हलप करु शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

३० टक्के भरणार नाही. उदाहरण खतगावकरला तुमच्या बद्दल गॅलसी आहे मी त्याच्यात निविदा भरुन टाकली हे ३०० पटानी घ्या.

**गिता जैन :-**

अट असेल त्यांना देताना अट असेल की तुम्ही ते विकसित करायचे.

**मा. आयुक्त :-**

असे करुन आपण ते करु.

**गिता जैन :-**

मग तो करुच शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

बाजारमुल्य आपण निश्चित करु. बाजार मुल्याच्या कमी हे दिले जाणार नाही.

**दिनेश जैन :-**

आयुक्त साहेब माझे म्हणणे असे आहे की जे आपण ई-टेंडरीग करणार जे पण त्याच्यामध्ये करणार............

**मा. आयुक्त :-**

बाजार मुल्यासाठी............

**दिनेश जैन :-**

माझा तो विषय नाही आपण ई-टेंडरीग केल्यानंतर एखादा कोणी बदल्याच्या भावनेने कोणी टेंडर काढले आणि त्याला टेंडर लागले त्याला आपण विकसीत करणेसाठी परवानगी देणार का ? कारण ई-टेंडरीग करून फायदा नाही. ते कसे होईल आता मी भरले तर आपण परमिशन देऊ शकत नाही आपण ई-टेंडरीग केले त्याला बेनिफिट काय? ज्याला जास्त भाग आहे त्यालाच आपण जास्त रेट रेडी रेक्नर किंवा मार्केट भावाचे व्हॅल्यु करून तो आपल्याला करावे लागेल.

**मा. आयुक्त :-**

जैन मॅडम तुमचा जो मुद्दा आहे की बाजारभाव ई-टेंडरीगचे करावे निगोशिएशन सुध्दा आपण करू शकतो त्याला काही अडचण नाही.

**दिनेश जैन :-**

मैं क्या बोल रहा हूँ की जिसको जादा जगह है उसको अगर देंगे मार्केट रेटसे या आर आर भाव से तो वह विकसीत होगा। अगर ई-टेंडरीग निकाला तो नगरपालिका उसको परमिशन देगी क्या १५ टक्के २० टक्के में नही दे सकती है।

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना तो मुद्दा सांगितला त्यांनी वापस घेतला फक्त त्यांचे म्हणणे आहे की बाजार भावाच्या खाली किमतीला ते पैसे वसुल झाले नाही पाहिजे.

**दिनेश जैन :-**

बरोबर हाच मुद्दा होता.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र. ३२८ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन सेंट विलफेअर एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत.**

ठराव क्र. ५५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षित आ.क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ) साठी आरक्षित असून मंजूर विकास योजना अहवालानुसार एकूण क्षेत्र 10000 चौ.मी. आणि सदर आरक्षणातील सदर क्षेत्रापैकी 1361 चौ.मी. जागा महापालिकेला हस्तांतरीत झालेली असून उर्वरीत क्षेत्राची मालकी सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचेकडे असल्याने सदरचे आ .क्र. 328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ) विकसीत करण्याचे सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांचा मानस असल्याचे दिसून येते. यास्तव सदर आरक्षणाने बाधीत महानगरपालिकेच्या मालकीची / ताब्यातील जमिन मिळणेकामी त्यांनी विनंती केलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहरातील आरक्षणाचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून व संपूर्ण आरक्षण विकसीत होवून त्याचा लाभ शहरातील जनतेला होणसाठी महापालिकेच्या ताब्यातील जागा शा सनाच्या सिध्दशिघ्र गणकाच्या दराच्या 110% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन होवून विकसीत करणेस देणेबाबत महापालिकेने धोरण निश्चित केलेले आहे.**

**सदर आरक्षण क्र.328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या एकुण 10,000 चौ.मी. क्षेत्रापैकी फक्त 1361 चौ.मी. क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात असल्यामुळे व सदर आरक्षण एकत्रित विकसीत होण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या ताब्यातील क्षेत्र महापालिकेने निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेवून विकसीत करणेस देणेसाठी व तसेच सदर आरक्षण क्र.328 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) हे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये विकसीत करणेस देणेसाठी ही सभा मंजुरी देत आहे.**

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल    अनुमोदन :- श्री. मनोज रामनारायण दुबे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५०, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र . २५२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन मे . राहुल एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत.**

धृवकिशोर पाटील :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेल्या विकास योजनेतील आरक्षणाच्या जागा विकासक/ जागामालक यांना महाराष्ट्र शासनाच्या सिध्दशिघ्र गणकाप्रमाणेच्या जागेसाठीच्या दराच्या 110% प्रमाणेची रक्कम भरणा करून घेऊन परत देणेबाबत मा . महासभेने दि. 05/09/2018 ( दि.04/08/2018**

**रोजीची तहकूब सभा ) प्रकरण क्र . 63 ठराव क्र . 64 अन्वये मान्यता दिलेली असून त्याबाबत महानगरपालिकेने धोरण ठरविलेले आहे.**

**सदर धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथिल आ .क्र.252 “प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ” या आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्र स्वत :च्या मालकीचे असल्याचे नमूद करून महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करून घेऊन विकासासाठी मिळणेबाबत मे . राहुल एज्युकेशन सोसायटी यांनी दि.18/06/2019 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे नवघर येथिल आ .क्र.252 “प्राथमिक शाळा व खे ळाचे मैदान” या प्रायोजनासाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र 5000 चौ.मी. आहे. सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी 2149.46 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या मालकीचे असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.**

**सबब सदर प्रकरणी महानगरपालि केने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे मौजे नवघर येथिल आ.क्र.252 “प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ” या आरक्षणापैकी महानगरपालिकेच्या मालकीचे क्षेत्र 2149.46 चौ.मी. मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना महापालिकेच्या धोरणानूसार रक्कमेचा भरणा करुन घेवून देण्यासाठी व सदर आरक्षण क्र .252 “प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ” एकत्रितरित्या विकासकास विकसीत करणेस मान्यता देणेसाठी तसेच त्याअनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणेसाठी मा . आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही मा . महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**तसेच सदर आरक्षण क्र.252 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ) या आरक्षणाच्या डाव्या बाजूला आरक्षण क्र.253 कम्युनिटी हॉल व उजव्या बाजुला आरक्षण क्र .251 पोस्ट ॲन्ड टेलिग्राम ही आरक्षणे विकास योजनेत दर्शविलेली आहेत यास्तव सदर आरक्षण क्र . 251 व 253 शहराच्या विकासाच्या दृष्टीने एकत्रित विकास होणसाठी सदर सदर आरक्षण क्र . 251 व 253 च्या जागा महापालिकेच्या ताब्यात मिळालेल्या असतील व विकासक मे . राहूल एज्युकेशन सोसायटी हे याबाबत तयार असतील तर सदर आरक्षणाची फेरआखणी करुन विकासकास आरक्षण क्र.252 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) हे आरक्षण विकसीत करणेस मंजुरी देण्यात यावी.**

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

२५१ आरक्षण क्र. हे आहे २५२ इकडे आहे २५३ इकडे आहे आणि दोन्ही आपल्या महापालिकेच्या ताब्यात आहेत. ह्यांनी इथे जर बिल्डींग बांधली तर आपल्याला दोन्ही आरक्षण एकत्रित विकसीत करण्यास प्रॉब्लेम होईल. मग आयुक्तांनी जर ठरवले ते ३ प्लॉट आहेत दोघांना जर क्लब केले आणि ह्याला दिले तर कदाचित महापालिकेचा दोन्ही आरक्षण व्यवस्थितरित्या एकाच ठिकाणी विकसीत होऊ शकतात तर त्याप्रमाणे आपण ते आयुक्तांना पण अधिकार दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मी ते कायद्यानं तपासून घेऊ.

**धृवकिशोर पाटील :-**

१०० टक्के बेकायदा अजिबात नाही.

**निला सोंस :-**

मा. महापौर महोदय यह सब जैसा की सबसे रिलेटेड विषय था की स्कूल शैक्षणिक चिजे जल्द से जल्द हो जितने भी।

**मा. आयुक्त :-**

लास्ट टाईम जो विषय आया था उसके बाद मेरे दालन में आके मुझे बोला था की व्हेरी ॲप्रीसिएबल की आपने यह विषय लाया। लेकिन इसको इल्जाम देना चाहिए तो कोई निर्णय होने को टाईम लगता है।

**निला सोंस :-**

ॲग्री लेकीन मैं इतना कहना चाहूँगी की जो १०० टक्के महापालिका के ताबे में है उसमे आपने सक्रीयता करके मिटींग बूलाई उसको की हम जल्द से जल्द विषय लेके आये। दुसरा मै थोडासा कन्फ्यूज हो गई जब डिस्कशन चल रहा था २१४ गार्डन रिर्झव्हेशन में सावंत जी के साथ तब आपण बात बोली थी की अगर ४९ टक्के हमारे पासे है आरै ५०..............

**मा. आयुक्त :-**

गार्डन के बारे में ॲकोमोडेशन डेव्हलपमेंन्ट मे अपने पास कितना भी हो समजो एक के पास ९० है और अपने पास १० है वह १० हम उसको दिया तो मार्केट रेट से पैसे लेना १०० टक्के उसके पास होने के बाद उन्होने जब प्लॅन डालेंगा तो ७० टक्के वह मैदान या गार्डन डेव्हलप करके अपने मालकी में उसको देना पडेगा।

**निला सोंस :-**

अच्छा तो यहा वो सब नही है।

**मा. आयुक्त :-**

वो यहा नही है ऐसे ३० प्रकारके अलग अलग रूल उसमे है उसमे खाली ३० टक्के डेव्हलप करके वा मिलेगा तो वह तो अपने भले में बहूत बडा है २१४ चे जे तुम्ही सांगितले ते प्रोसेस मध्ये आहे.

**निला सोंस :-**

थॅक्स बहोत बहोत धन्यवाद.

**अनिल सावंत :-**

साहेब ई-टेंडरीग मध्ये तुम्ही बाजार भावाचा विषय काढला पण ऑलरेडी गोषवा-यामध्ये तुम्ही बाजार भाव दिलेलाच आहे मग तो कसा डिसाईड केला.

**मा. आयुक्त :-**

आम्ही राज्य शासनाचे जे आर आर व्हॅल्यू राहतात ना.

**अनिल सावंत :-**

म्हणजे हो रेटेबल व्हॅल्यू आहे की बाजार भाव आहे?

**मा. आयुक्त :-**

रेटेबल व्हॅल्यू आहे आणि बाजार भाव त्याला आम्ही २५ टक्के वाढ सुचवली होती तुम्ही १० टक्के केला आहे. तर त्या पार्टीला मी काय करायचे ते.........................

**अनिल सावंत :-**

तुमच्या गोषवा-याचा रेट पकडणार आहेत की वेगळा रेट पकडणार आहेत?

**मा. आयुक्त :-**

ते मी ठरवणार नाही बाजारभाव ठरवणार.

**अनिल सावंत :-**

बघा नाही तर दुसरा कोणी ठरवेल.

**मा. आयुक्त :-**

१०० परसेन्ट

**प्रकरण क्र. ५० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील आरक्षण क्र . २५२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणामधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे रक्कमेचा भरणा करुन घेऊन मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना विकासासाठी देणेबाबत.**

ठराव क्र. ५६ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेल्या विकास योजनेतील आरक्षणाच्या जागा विकासक/ जागामालक यांना महाराष्ट्र शासनाच्या सिध्दशिघ्र गणकाप्रमाणेच्या जागेसाठीच्या दराच्या 110% प्रमाणेची रक्कम भरणा क रून घेऊन परत देणेबाबत मा . महासभेने दि. 05/09/2018 ( दि.04/08/2018 रोजीची तहकूब सभा ) प्रकरण क्र . 63 ठराव क्र . 64 अन्वये मान्यता दिलेली असून त्याबाबत महानगरपालिकेने धोरण ठरविलेले आहे.**

**सदर धोरणाप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथिल आ .क्र.252 “प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ” या आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र**

**वगळता उर्वरीत क्षेत्र स्वत :च्या मालकीचे असल्याचे नमूद करून महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र महानगरपालिकेच्या धोरणाप्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करून घे ऊन विकासासाठी मिळणेबाबत मे . राहुल एज्युकेशन सोसायटी यांनी दि.18/06/2019 रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे मौजे नवघर येथिल आ .क्र.252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " या प्रायोजनासाठी आरक्षित असून मंजूर विका स योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र 5000 चौ.मी. आहे. सदर आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी 2149.46 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या मालकीचे असून महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.**

**सबब सदर प्रकरणी महानगरपालिकेने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे मौजे नवघर येथिल आ.क्र.252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " या आरक्षणापैकी महानगरपालिकेच्या मालकीचे क्षेत्र 2149.46 चौ.मी. मे. राहुल एज्युकेशन सोसायटी यांना महापालिकेच्या धोरणानूसार रक्कमेचा भरणा करुन घेवून देण्यासाठी व सदर आरक्षण क्र .252 "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" एकत्रितरित्या विकासकास विकसीत करणेस मान्यता देणेसाठी तसेच त्याअनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणेसाठी मा . आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही मा . महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**तसेच सदर आरक्षण क्र.252 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या डाव्या बाजूला आरक्षण क्र.253 कम्युनिटी हॉल व उजव्या बाजुला आरक्षण क्र .251 पोस्ट ॲन्ड टेलिग्राम ही आरक्षणे विकास योजनेत दर्शविलेली आहेत यास्तव सदर आरक्षण क्र . 251 व 253 शहराच्या विकासाच्या दृष्टीने एकत्रित विकास होणसाठी सदर सदर आरक्षण क्र . 251 व 253 च्या जागा महापालिकेच्या ताब्यात मिळालेल्या असतील व विकासक मे . राहूल एज्युकेशन सोसायटी हे याबाबत तयार असतील तर सदर आरक्षणाची फेरआखणी करुन विकासकास आरक्षण क्र.252 (माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान) हे आरक्षण विकसीत करणेस मंजुरी देण्यात यावी.**

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५१, **चेना येथील ठाणेकडे जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद रस्त्यापासून पाटीलपाडा , बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स .क्र. ९८ पर्यंतचा १८.०० मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.**

धृवकिशोर पाटील :-

सदर प्रकरणामध्ये फेरबदल दर्शविणारा नकाशा सादर केलेला नाही. त्यामुळे फेरबदलाच्या नकाशासह प्रकरण फेरसादर करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यात राज्य शासनाचे पैसे आलेले आहेत.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ५१ :-

**चेना येथील ठाणेकडे जाणाऱ्या ३०.०० मी. रुंद रस्त्यापासून पाटीलपाडा, बेलकरीपाडा तसेच नदी ओलांडून स.क्र. ९८ पर्यंतचा १८.०० मी. रुंदीचा रस्ता मंजूर विकास योजनेत दर्शविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.**

**ठराव क्र. ५७ :-**

सदर प्रकरणामध्ये फेरबदल दर्शविणारा नकाशा सादर केलेला नाही. त्यामुळे फेरबदलाच्या नकाशासह प्रकरण फेरसादर करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, **पर्यावरण अहवाल माहितीसाठी ,** पर्यावरण माहितीसाठी दिलेला आहे नंतर ह्या सुचनेद्वारे आपणास कळविण्यात येते की मिरा भाईदर महाराष्ट्र महानगरपालिका आयोगामधील अनुसूची प्रकरण २ नियम १ ‘‘ज’’ अन्वये प्राप्त झालेले विषय. प्रकरण क्र. ५३, **सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक 03/08/2019 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर म.न.पा. क्षेत्रातील शौचालय देखभाल , दुरुस्तीचे संचलनाचे कामे वाल्मिक व मेहतर समाजाच्या संस्थांना देण्यांबाबत.**सन्मा.सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दि. ३.०८.१९ रोजीचा पत्रान्वये दिलेले प्रस्ताव मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालय देखभाल दुरूस्तीचे संचालनाचे नावे वाल्मीक व मेहतर समाजाच्या संस्थाना देणे बाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

विषय फेटाळण्यात आलेला आहे.

**स्नेहा पांडे :-**

मॅडम फेटाळण्याचा अधिकार नाही. मी कमिशनर साहेबांशी विचारणार आहे. हे जे टेंडर काढले आहे दि. ०९/०७/२०१९ ला.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये ई-टेंडरींग जे झाले महासभेनेच त्याच्यामध्ये निर्णय दिला की शहरातले जे सगळे शौचालय आहेत दर्जेदार संस्थेकडे द्या. पण त्यामध्ये जे काम करणारे लोक आहेत मेहतर समाजाचे वाल्मीकीचे त्यांनाच तो हक्क राहील. आणि जे केअरटेकर आहेत तेच राहतील पांडेजी मेरे पास आये थे वो समाज के लोग आए थे हमने वैसे ही शुध्दीपत्रक उसमें निकाला है।

**स्नेहा पांडे :-**

आपने टेंडर निकाला है सिव्हील वर्क के साथ।

**मा. आयुक्त :-**

यह काम बडा है ना। यह संस्था के पास रेप्युटेशन नही है। यह लोगो को १०० टक्का काम दिया जाएगा।

**स्नेहा पांडे :-**

कैसे दिया जाएगा? आपने टेंडर सिव्हिल वर्क का निकाला है।

**मा. आयुक्त :-**

साफसफाईचे काम कोणीही घेणे. सफाईचे कामगार आपलेच लोक राहणार आहेत.

**स्नेहा पांडे :-**

ऐसा नही है।

**मा. आयुक्त :-**

तसेच राहणार.

**स्नेहा पांडे :-**

गर्व्हमेंट का जी.आर है की आप वाल्मिकी समाज और मेहतर समाज को ही हम दे सकते है जो की उनका खानदानी पारंपारिक व्यवसाय है। साफसफाई करना आप इस चिज को टेंडर में नही लिया

हुआ है। सिव्हील वर्क के हिसाब से टेंडर निकला हुआ है। दुसरा आपके पास सफाई कर्मचारी का पत्र भी आया हुआ है। आयुक्त साहब आपके पास सफाई कर्मचारी महाराष्ट्र गर्व्हमेंट के तरफ से पत्र भी आया है। इस पर आपने क्या कार्यवाही की?

**दिपक खांबित :-**

मॅडम इसमें महानगरपालिकाने पहला ठराव किया की, शौचालय सफाई, सफाई प्लस देखभाल दुरुस्तीचे एकही टेंडर निकालने का वही हिसाब से एकही टेंडर निकाला हुआ है और उसमें कंडीशन है की सफाई का सारा...........

**मा. महापौर :-**

आपका विषय मैंने फेटाळलेला आहे. आप पर्सनली जाके उससे बात कर सकते है।

**स्नेहा पांडे :-**

मॅडम हर चिज पर्सनली पुछना रहेगा तो आप महासभा मत लगाईए प्लीज यह मेरी रिक्वेस्ट है। (सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

महासभा का अधिकार जो रहेगा वह करेंगे।

**स्नेहा पांडे :-**

यह कौनसा विषय है हम साथ में बैठे है हम युती में बैठे है हम विरोधक नही है। हम आपके हर सही गलत के साथ बैठे हुए है और हमारा एक विषय आएगा तो आप वह एक लाईन में फेटाळते हुए मतलब यह तरीका नही होता है। चर्चा तो होनी चाहिए और यह आपका विषय नही है। यह कमिशनर साहबने टेंडर निकाला हुआ है। प्रशासनने टेंडर निकाला है कैसा निकाला यह जो सिस्टम में नही बैठता है अभी वह टेंडर उन्होंने १८ करोड का निकाला है और ७५ टक्के टर्न ओव्हर जिसका हो गया उसी को दे सकते है। तो ऐसा वाल्मिकी समाज और मेहतर समाज जो शौचालय की साफसफाई देखभाल करता होगा उसके पास १८ करोड की कंपनी होगी क्या? किस तरीके से यह कंपनी देंगे जो टेंडर लेगा वह उनको क्यों देगा साफसफाई करने के लिए।

**दिपक खांबित :-**

महासभा ने ठराव लिया है की शौचालय दुरुस्ती और शौचालय साफसफाई का एकही टेंडर निकालने का वो ठराव के हिसाब से एकही टेंडर निकाला है और हमने कोरीजम डाला हुआ है की इसका सफाई का जो कॉन्ट्रॅक्ट है और जो भी जिसको भी टेंडर लगेगा वह मेहतर वाल्मीकी समाज की जो संस्था है या लोग है उनको यह काम देंगे वैसे हमने उनको आश्वासित भी किया है।

**स्नेहा पांडे :-**

आश्वासन से काम नही होता है।

**दिपक खांबित :-**

आश्वासित भी किया हुआ है कोरिजम भी निकाला है शुध्दीपत्रक से वह टेंडर में कंडीशन है।

**स्नेहा पांडे :-**

आपने कंडीशन में कहा है की, जिसको मिलेगा वह देगा लेकिन किसको मिलेगा वो देगा की नही देगा यह बाद का विषय है। पर आपके गर्व्हमेंट का जी.आर को ताकते रखके महासभा को कुछ भी ठराव करेंगे। सुबह से यही चल रहा है की, महासभा कुछ भी ठराव कर रही है लेकिन महासभा के हिसाब से नही होता। आगे शासन प्रशासन गर्व्हमेंट हर कोई बैठे हुए है ना तो जी.आर के हिसाब से यह कैसा सिव्हील वर्क निकाला गया है उसके बावजुद भी कमिशनर के पास महाराष्ट्र सफाई कर्मचारी डिपार्टमेंट से पत्र आया है की आप ऐसा नही कर सकते है।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम शौचालयाच्या बाबतीमध्ये माझा वॉर्डमध्ये सचिन तेंडूलकर मैदान आहे त्याच्या बाजूला शौचालय आहे. ते चालवतच नाही ते बंदच आहे. दहा वेळेस त्याची रिपेअरींग केली. त्याची देखभाल कोण करणार? मी १० वेळेस लेटर दिलेले आहेत ते बंदच आहे. कनेक्शन नाही त्याची देखभाल कोणी करतच नाही. कोणाकडे हे काम दिलेले आहे?

**दिपक खांबित :-**

नोंद घेतो साहेब.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब आप कैसे देंगे जो.............

**मा. आयुक्त :-**

तुमचा विषय त्यांनी फेटाळलेला आहे. सभागृहात एकतर ते बहुमतांनी कामकाज करा. आपण दालनामध्ये चर्चा करु.

**स्नेहा पांडे :-**

हर चिज फिर दालन में ही समज लेते ना फिर महासभा क्यों लगाया जाता है। हमारा पुरा दिन खराब होता है। कोई भी विषय लेके आए उस पर चर्चा तो होनी चाहिए।

**अनिल सावंत :-**

ते काय हवे ते ठराव करतील. असे कोणी काही ठराव फेटाळू शकतो.

**स्नेहा पांडे :-**

हा टेंडर प्रशासनाचा विषय आहे. महापौर मॅडमला काय परेशानी आहे. तेच मला आजपर्यंत कळले नाही. कुठलाही विषय घेतला की महापौर मॅडम फेटाळतात. विषय प्रशासन से आया है। तुम्ही ते सफाई कर्मचाऱ्यांना कसे काय मिळणार ते आपल्याला पत्र दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमची सुचना आम्ही मान्य केलेली आहे. तुम्हाला कितीही सांगितले तरी तुम्ही लक्षात घेत नाही.

**स्नेहा पांडे :-**

तुमच्याकडे जेवढ्या संस्था आहेत ऑलरेडी वर्किंगमध्ये त्यांना तुम्ही कसे देणार त्यांना तुम्ही लेखी पत्र द्या ना.

**मा. आयुक्त :-**

देऊ ना आम्ही त्या संस्थेला देऊ.

**स्नेहा पांडे :-**

ज्याला भेटणार तो देणार कोणाला भेटणार ते माहित नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला सांगितलेले लक्षातच येत नाही.

**स्नेहा पांडे :-**

मला कळत नाही मी वेडी आहे ना.

**मा. आयुक्त :-**

मी वेडी म्हणत नाही डोन्ट टेक नेगेटिव्ह

**स्नेहा पांडे :-**

नाही पण बोलले की काही पण उत्तर देता. दालनामध्ये या दालनामध्ये या आम्ही कधी पण येऊ मग महासभेचे मतलब काय आहे. महासभेमध्ये विषय कशाला घेतला आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही भावनीक होऊन बोलू नका. तुम्ही विषय जबाबदारीने घ्या. तुम्ही जो मुद्दा मांडला तो मुद्दा आम्ही विचारात घेतला ऑलरेडी मान्य केला आणि आपण टेंडर निविदेमध्ये तशी दुरूस्ती दिली. आपले जे काही कामगार आहेत.

**स्नेहा पांडे :-**

टेंडरमध्ये कधी नमुद केले.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही सांगितलेले समजून तुम्हाला त्या एजन्सीवरच इंटरेस्ट आहे.

**स्नेहा पांडे :-**

टेंडरमध्ये कधी दुरूस्ती केली आहे.

**मा. आयुक्त :-**

तो आमचा अधिकार आहे ना.

**स्नेहा पांडे :-**

कधी केले ते मला माहित नाही ते काढले आहे तेव्हा सिव्हिल टेंडर काढले आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमची जी मागणी होती ती आम्ही मान्य केलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपली मागणी होती की मनपा क्षेत्रातील शौचालय देखभाल दुरूस्ती संचनालयाचे काम वाल्मीक व मेहतर समाजाच्या संस्थांना देण्याबाबत तर हे फक्त सफाईचे काम करतात आणि दुरूस्तीचे होत नाही.

मग दुरूस्तीच्या कामाचा निविदा एकदाच काढल्या परंतू ह्या दुरूस्तीची कामे ज्यांनी दिली आहेत त्यांना स्पेसिफिकली असे मेन्शन केले आहे की त्याचे कंडीशनल टेंडर आहे की त्यांनी स्वच्छतेचे काम सफाईचे काम वाल्मीकी आणि मेहतर समाजाच्या लोकांना द्यायचे जर त्यांनी त्यांच्या कमिटमेंन्ट मध्ये फेल झाले तर त्यांचे टेंडर वरती कारवाई होईल पण तुम्ही जी मागणी केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या शहरामध्ये जितके मेहतर वाल्मीकी समाजाचा बांधव आहे त्यांना .............

**स्नेहा पांडे :-**

दुरूस्तीचे वेगळे टेंडर काढाना कशाला एकामध्ये मिक्स करता. दुरूस्तीचे वेगळेच काढा. सिव्हिल वर्क तर सिव्हिल वर्क ठेवा.

**मा. उपमहापौर :-**

तुमचे अपेक्षित काम झालेले आहे त्यात काही चुकीचे झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या लोकांना आपण कुणालाही गैरसोय होऊ दिली जाणार नाही.

**गिता जैन :-**

साहेब, काय होणार तुम्ही जे टेंडर काढणार दोन वेगळे तर जी त्यांची रक्कम असेल ती पुर्ण भेटणार आणि सब टेंडरने दिलेले त्याच्या मर्जीवर असणार की किती पैसे द्यायचे आणि कदाचित तेव्हा अन्याय होऊ शकतो जर तुम्हाला मेहतर समाज आणि वाल्मीकी समाजाला.........

**मा. आयुक्त :-**

विषय तुम्ही दोन साईटने बोलत आहात ज्यावेळेस प्रस्ताव दिला ह्या सभागृहाने म्हटले एकत्रित टेंडर काढा आता त्यांनी एकटे बोलून कसे चालेल तुम्ही निर्णय बहूमताने वेगळे करता मग आम्ही अंमलबजावणी कशाची करायची.

**मा. उपमहापौर :-**

गीता मॅडम ते काम झालेलेच आहें फक्त त्यांने ती माणसे घ्यावीत त्या समाजाचे लोकांना ॲडजस्ट करावे असा "ज" चा प्रस्ताव आहे.

(सभागृहात गोंधळ)

**स्नेहा पांडे :-**

साहेब तुम्ही बघा शौचालय बांधणे, शौचालयाची स्वच्छता देखभाल व दुरूस्ती गटार बांधकामे तसेच स्वच्छता साहित्य सॅनेटरी खरेदी करणे कामाचे कंत्राट स्थानिक लोक महिला वाहक वाल्मीकी किंवा मेहतर समाजाला कुटुंबीयाची सहकारी संस्था सॅनेटरी स्मार्ट केंद्र प्रथम प्राधान्य देणे. आप इस हिसाबसे क्यो नही टेंडर निकाला सिव्हिल वर्क में क्यो डाले सिव्हिल कंस्ट्रक्शन का काम था दुरूस्तीका उसको अलगही टेंडर निकालना था। यह सफाईका जो आपके यहा ऑलरेडी वाल्मीकी मेहतर समाज के लोग काम करते आ रहे है तीन साल से।

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये सिव्हिल काम म्हणजे नवीन शौचालय बांधायचे नाही.

**स्नेहा पांडे :-**

ते दुरूस्ती आहे ते मला माहित आहे.

**मा. आयुक्त :-**

नॉमिनल तिने कोंडा गेला त्याला खीळा गेला. सिट तुटले मग आता ते दुस-या माणसाने येऊन दुरूस्ती करेपर्यत ते खराब व्हायचे मग किती सदस्यांना गैरसोईने सामोरे जावे लागते. ज्याच्या ताब्यात आहे वर्षभरात त्यांनीच ते मेंन्टेन केले पाहिजे मला काय म्हणायचे आहे तुम्ही फेडरेशन करा त्याचे रजिस्ट्रेशन करा भविष्यामध्ये आपले समाज बांधव जे कोणी आहेत त्यांनी टेंडर भरले पाहिजे. मी त्या समाजाचे जे कोणी आले होते त्यांना सुध्दा मी समजून सांगितले त्याच्यात काही तिसरा माणूस यावे काही उद्देश नाही.

**स्नेहा पांडे :-**

साहेब इतना बडा टेंडर निकाला हूवा है। १८ करोड का की उन लोगो के पास ऐसी संस्था रहेगी क्या?

**मा. आयुक्त :-**

मेरे पास आये थे वो नॉर्मल उसमे उसके जादा काम करने वाले थे वो।

**स्नेहा पांडे :-**

आपके स्थानिक भी होने चाहिए बाहर से उसके नही आये स्थानिक मिरा भाईदर के ही लोग होने चाहिए और उनका टर्न ओव्हर आय ७५ पर्सन्ट तीन सालका मांग रहे है।

**मा. आयुक्तः-**

महासभा में एकत्रित निविदा निकालो बोल के निर्णय किया। आप उसमे उस टाईम कोई कमेंट नही किए ।

**स्नेहा पांडे :-**

मैने पहलेही बोला था साफसफाई सेपरेट रखीए और दुरूस्तीका अलग निकालो।

**मा. आयुक्त :-**

उसके उपर आपके साथ चर्चा करके हम निर्णय लेंगे।

**निलम ढवण :-**

साहेब, पूर्वीपासून जे साफसफाईचे काम होते त्या लोकांना तुम्ही रिपेंयरींगची वैगेरे अट घातली नव्हती. मग त्या लोकांनाच घालायची होती ना एकाकडचे केल्यानंतर त्यांची पण मोनोपॉली सूरू होणार आहे. सगळ्यांना संधी मिळू द्या ना सगळी कॉन्ट्रॅक कोणाला असेल एकाच्याच ताब्यात द्यायची आणि एकानेच बघायची मग त्यानी ती मोनोपॉली चालू होणार आहे बाकीचे एवढे मिरा भाईदर मध्ये लोक आहेत जे काही समाजाचे आहेत बचतगट आहेत महिलांना पण त्याच्यात प्रोत्साहन मिळेल कशा गोष्टीसाठी त्याचा विचार केला जात नाही. कोणाचे हितसंबध असलेले टेंडर टाकतात तेच केले ई-टेंडरीग हे सगळे प्रकार इथे होत असतात अशा काही संस्थाना द्याना. महिलांच्या संस्था आहेत बाकीच्या आहेत बचतगट आहेत त्या समाजांना द्याना.

**मा. आयुक्त :-**

पुढे त्यांना आपण मदत करू.

**निलम ढवण :-**

ज्यांना अटीशर्ती जास्त वाढविल्या जातात अटीशर्ती नका वाढवू त्यांना खरोखर इच्छा असेल तर तशा अटीशर्ती टाकू नका.

**मा. आयुक्त :-**

बेसीकली हे सार्वजनिक संडास बांधले तेव्हा...........................

**निलम ढवण :-**

संडासाच्या बाबतीत म्हणत नाही कूठच्याही गोष्टीत जेव्हा तुम्ही हे करतात तेव्हा तुम्ही बाकीच्या पण लोकांचा विचार करावा ह्या गोष्टीसाठी.

**मा. आयुक्त :-**

बरोबर ठिक आहे.

**निलम ढवण :-**

बाकीच्यांना देताना अटीशर्ती खूप वाढलेल्या असतात असे नको त्यामुळे खरोखर तुमचा उद्देश त्या दृष्टीने चांगला असेल त्या महिलांना देखील संधी द्या. त्यांच्या संस्था आहेत काही बचतगट आहेत त्यांना देखील प्राधान्य मिळेल त्या गोष्टीसाठी.................

**जुबेर इनामदार :-**

साहेब शिटप्रमाणे का नाही करत शौचालयाप्रमाणे एकत्र तुम्ही काढता ना त्या एका शौचालयाला देखभाल दूरूस्ती संचालप साफसफाई त्या संस्थेने करायची एकत्र काढली म्हणजे त्याचा व्हॅल्यू मोठा होतो. मोठी कूठली पार्टी आणावी लागेल. छोटी मोठी लोक करूच शकणार नाही. शिटप्रमाणे तुम्ही ते करू शकता.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

विषय ५१ नंबरचे काय झाले?

**निलम ढवण :-**

आयुक्त साहेब तुम्ही आपण त्याच्यावरती काहीतरी स्पष्टीकरण दिले होते त्याचे गव्हरमेंन्ट कडून पैसे पण आले. मग हे विकासकाचे कामे नाही आहेत का? आम्ही सहकार्य करायचे मग जर हे विषय का अडविले जात आहेत.

**हरिशचंद्र आमगावकर :-**

महासभा कशाला घ्यायची तुम्ही तुमच्या पध्दतीने कामे करा.

**निलम ढवण :-**

व्यक्तिगत विषयांना प्राधान्य दिले जाते आणि हे जर विकासकाचे काम रस्ते जर रुंदीकरणाचा विषय आहे हा विकासाचा मुद्दा नाही आहे का? मग खरोखर विकासालाच प्राधान्य आहे की विकास ह्या व्यक्तिला प्राधान्य आहे.

**मा. महापौर :-**

जे विषय आहेत ते आपण आता घेत आहोत.

**प्रकरण क्र. ५३ :-**

**सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे यांचा दिनांक 03/08/2019 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर म.न.पा. क्षेत्रातील शौचालय देखभाल, दुरुस्तीचे संचलनाचे कामे वाल्मिक व मेहतर समाजाच्या संस्थांना देण्यांबाबत.**

**ठराव क्र. ५८ :-**

सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

२ ''के'' खाली प्रस्ताव जो सुरूवातीला आपल्याकडे प्राप्त झालेला आहे प्रशासन कडून तो आपण घेत आहोत. बारवी धरण प्रकल्प बाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने मिरा भाईंदर महापालिकेच्या आस्थापनेवर नेमणूक करणे बाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

**मिरा भाईंदर शहरास सद्यस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन 90.00 द.ल.लि. व स्टेम प्राधिकरणाकडून 86.00 द.ल.लि. असा एकुण 176.00 द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे . मिरा भाईंदर शहराची सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 8.14 लक्ष इतकी व सध्याची लोकसंख्या सुमारे 12 लक्ष इतकी आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार शहरास सुमारे 208 द.ल.लि. पाणी पुरवठा अपेक्षित आहे.**

**मिरा भाईंदर शहराची सन 2021 पर्यंतची पाण्याची मागणी सुमारे 225.00 द.ल.लि.पूर्ण करण्यासाठी मिरा भाईंदर शहराकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त 75.00 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. मात्र, त्यापैकी सद्यस्थितीत फक्त 40.00 द.ल.लि पाणी पुरवठा होत आहे. मिरा भाईंदर शहराची सध्याची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी दि .25 जून, 2019 रोजी मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाक्षेवि ) यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आलेली होती.**

**मा.मंत्री महोदयांनी सदर बैठकीतील चर्चेनुसार एम.आय.डी.सी. यांचे मालेकीचे बारवी धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर मिरा भाईंदर शहरास एम .आय.डी.सी. मार्फत 35.00 द.ल.लि. पाणी पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

**त्यामुळे सन 2019 च्या पावसाळी कालवधीपुर्ते एम .आय.डी.सी. अंबरनाथ यांना मिरा भाईंदर शहरासाठी तात्पुरत्या स्वरुपात 25.00 द.ल.लि. अतिरिक्त पाणी उचलणेस मान्यता देण्यात आलेली आहे.**

**बारवी ध रणाच्या प्रस्तावित वाढीव उंचीचा वापर कैल्यास एकुण सहा गावे व पाच वाडया विस्थापीत होणार असून, या विस्थापीतांचे पुर्नवसनाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे.**

**या प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या 1163 कुंटूंबांना प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण 1163 लोकांना नोकरी द्यावयाची आहे. बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे विस्थापीत झालेल्सा प्रकल्पबाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने सेवेत सामावून घेण्यास शासन निर्णय क्र . ठामपा-2117/प्र.क्र.63/नवि-23, दि.18 सप्टेंबर, 2017 नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे.**

**बारवी धरणाची वाढलेल्या उंचीमुळे मिरा भाईंदर महानगरपालकिस अतिरिक्त 75 द.ल.लि. प्रतीदिन एवढया वाढीव पाणी पुरवठयानुसार येणारी एकुण 15 टक्केवारीनुसार 179 एवढी पदे मिरा भाईंदर**

**महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने नेमणूका करणेची कार्यवाही करण्यात यावी . असे मु ख्य कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी कळविले आहे.**

**त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग -03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर बारवी धरण 179 प्रकल्प बांधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत सामावून घेणे आवश्यक आहे.**

**तरी मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडून बारवी प्रकल्पबांधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्पबांधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापने वर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता ही सभा मान्यता देत आहे. आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रभात पाटील :-**

साहेब, एक शंका आहे १७९.

**मा. आयुक्त :-**

११६९ आहेत बारवीचे ज्याला ज्याला पाणी जाते ज्या प्रमाणात जाते राज्य शासनाचा निर्णय सुध्दा झालेला आहे आणि आपल्या आस्थापनेवर प्रकल्प बाधीतच्या नावाखाली ते कम्पलसरी सामावण्याचे शासन निर्णय झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

मग एवढ्या फिगरमध्ये........

**मा. आयुक्त :-**

तेवढे आपल्याकडे येणार नाहीत. ५० ते ६० च्या जवळपास आपल्याकडे येतील. तेवढे लोकच नाहीत एखाद्या फॅमिलीमध्ये पात्र आहे आई वडील आहेत, मुलाचे लग्न झालेले आहे. नोकरीला कोणीच लागण्यासारखे नाही त्याला काय करणार तर त्याचा शासन वेगळा निर्णय घेणार.

**प्रभात पाटील :-**

२०० लोक एका वेळेला आपल्याकडे भरतो. आपल्या आस्थापनेवर त्याचा किती परिणाम पडणार आहे याचा पण विचार व्हायला हवा.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला पाणी टॅक्स भागाचे याचे ऑलरेडी निर्णय झालेले आहेत. शासनाकडून निर्णय झालेले आहेत त्याचा जी.आर मी आपल्याला देतो.

**प्रभात पाटील :-**

शासनाकडून निर्णय झालेला आहे. मला मान्य आहे पण ह्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती किती आहे किती सक्षम आहे नाही आहे.

**मा. आयुक्त :-**

ते सगळे तपासून केलेले आहे ना.

**दिनेश नलावडे :-**

मा. आयुक्त साहेब आज बारवी धरणाच्या बाबतीमध्ये आपल्याला जो पाणी येणार आहे. महापौर मॅडम बारवी धरणाचा पाणी किती महानगरपालिकेला जाणार आहे. उल्हासनगर, भिवंडी, ठाणे महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका, नवि मुंबई देखील ह्याच धरणामध्ये आहे. ठाणे जिल्ह्यातल्या सर्व महानगरपालिका त्याच्यामध्ये आहेत. महापौर मॅडम, त्यांच्याकडे किती कामगार जाणार आहेत. तिकडचे प्रस्तावित झालेले.

**मा. आयुक्त :-**

शासनाचा जी.आर आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब आपण शेवटचे आहोत छोटी महानगरपालिका आहे. आपले अगोदरचेच कर्मचारी जास्त आहेत.

**मा. आयुक्त :-**

नलावडे साहेब शासनाने आपला रिझर्व्हेशन कोट्यावरती फायनल केलेला आहे आणि त्याची जी.आर. ची कॉपी सर्व सदस्यांना देतो.

**दिनेश नलावडे :-**

साहेब आपल्याकडे कमी कोटा आहे. आपल्याकडे कोटा कस काय जास्त दिला.

**मा. आयुक्त :-**

आपण कमीत कमी घेण्याचा प्रयत्न करु.

**दिनेश नलावडे :-**

कमिशनर साहेब, महापौर मॅडम पाणी द्यायचं. हे राज्य शासनाचं काम आहे आपण तिकडचा पाणी घेतो. म्हणून शासन आम्हाला सांगेल की महानगरपालिकेमध्ये आमचे तिकडचे एवढे कर्मचारी घ्या. महापौर मॅडम, तिकडचे किती कर्मचारी आपल्या महानगरपालिकेत आहेत. त्यावरती तुम्ही नमूद करा. सर्व २५ टक्के कर्मचारी त्या विभागातून आलेले आहेत. हा पण आराखडा घ्या ना. इथल्या स्थानिकांना काय आम्हाला स्थानिकांना काही जागा ठेवणार की नाही की सर्व बाहेरचेच घेणार तिकडे सर्व काही निश्चित करा. ह्या इथे कोण भरणार या ठिकाणी अभ्यास करा प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये तिकडचे किती आलेले आहेत. बारवी धरणाच्या विभागातून महापौर मॅडम कमीत कमी तिकडची संख्या इकडे घ्या. सर्व महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होऊ द्या. एवढी मोठी संख्या जर तिथे आली तर आमचे.........

**मा. आयुक्त :-**

तुमची सुचना मान्य आहे नलावडे साहेब.

**मा. महापौर :-**

बारवी धरणाचा ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ५४ :-**

बारवी धरण प्रकल्प बाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने मिरा भाईंदर महापालिकेच्या आस्थापनेवर नेमणूक करणे बाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

**मिरा भाईंदर शहरास सद्यस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन 90.00 द.ल.लि. व स्टेम प्राधिकरणाकडून 86.00 द.ल.लि. असा एकुण 176.00 द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे . मिरा भाईंदर शहराची सन 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 8.14 लक्ष इतकी व सध्याची लोकसंख्या सुमारे 12 लक्ष इतकी आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार शहरास सुमारे 208 द.ल.लि. पाणी पुरवठा अपेक्षित आहे.**

**मिरा भाईंदर शहराची सन 2021 पर्यंतची पाण्याची मागणी सुमारे 225.00 द.ल.लि.पूर्ण करण्यासाठी मिरा भाईंदर शहराकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त 75.00 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. मात्र, त्यापैकी सद्यस्थितीत फक्त 40.00 द.ल.लि पाणी पुरवठा होत आहे. मिरा भाईंदर शहराची सध्याची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी दि .25 जून, 2019 रोजी मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाक्षेवि ) यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आलेली होती.**

**मा.मंत्री महोदयांनी सदर बैठकीतील चर्चेनुसार एम.आय.डी.सी. यांचे मालेकीचे बारवी धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर मिरा भाईंदर शहरास एम .आय.डी.सी. मार्फत 35.00 द.ल.लि. पाणी पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

**त्यामुळे सन 2019 च्या पावसाळी कालवधीपुर्ते एम .आय.डी.सी. अंबरनाथ यांना मिरा भाईंदर शहरासाठी तात्पुरत्या स्वरुपात 25.00 द.ल.लि. अतिरिक्त पाणी उचलणेस मान्यता देण्यात आलेली आहे.**

**बारवी धरणाच्या प्रस्तावित वाढीव उंचीचा वापर कैल्यास एकुण सहा गावे व पाच वाडया विस्थापीत होणार असून, या विस्थापीतांचे पुर्नवसनाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे.**

**या प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या 1163 कुंटूंबांना प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण 1163 लोकांना नोकरी द्यावयाची आहे. बारवी धरणाची उंची वाढल्या मुळे विस्थापीत झालेल्सा प्रकल्पबाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने सेवेत सामावून घेण्यास शासन निर्णय क्र . ठामपा-2117/प्र.क्र.63/नवि-23, दि.18 सप्टेंबर, 2017 नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे.**

**बारवी धरणाची वाढलेल्या उंचीमुळे मिरा भाईंदर महानगरपा लकिस अतिरिक्त 75 द.ल.लि. प्रतीदिन एवढया वाढीव पाणी पुरवठयानुसार येणारी एकुण 15 टक्केवारीनुसार 179 एवढी पदे मिरा भाईंदर**

**महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने नेमणूका करणेची कार्यवाही करण्यात यावी . असे मुख्य कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी कळविले आहे.**

**त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग -03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर बारवी धरण 179 प्रकल्प बांधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत सामावून घेणे आवश्यक आहे.**

**तरी मा .जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडून बारवी प्रकल्पबांधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्पबांधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता ही सभा मान्यता देत आहे. आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. उपमहापौर :-**

सचिव साहेब सभा संपली नाही. आजचा दिवसभराचा कामकाज शांततेत पार पडला. सभागृहासमोर एखादा विषय सभाशास्त्राचा नियमाप्रमाणे एखाद्या विषयाचा ठराव झाल्यानंतर त्याच्यात फेरबदल करता येत नाही. फक्त जम्याची बाब अशी आहे की आपली सभा अजून सुरु आहे. आपल्याला आता ठराव बदलता येईल का. सचिव साहेब सांगा नसेल तर त्या दोन्हीचे नकाशे बनवण्याचे अधिकार मा. आयुक्तांना द्या आणि त्यांना निर्णय करु द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

वैती साहेब जर आमगावकर साहेबांची भूमिका अशी तर दोन्ही विषय घ्या.

**मा. उपमहापौर :-**

दोन्ही विषय घेवून मा. आयुक्तांना अधिकार द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये आपण प्रकरण क्र. ४८ च्या ठरावामध्ये दुरुस्ती करतो.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

हा मोघम विषय कसं काय आला.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदय, प्रशासनाने हा विषय मागे घेतला म्हणून त्यांना सांगितला होता. त्या उपरोक्त त्यांनी ठराव करु शकतात. ह्यामध्ये प्रधान सचिवांनी इन्क्वायरी करण्याचा अधिकार मला दिलेले आहेत. इन्क्वायरी करण्याचा अधिकार मला दिलेले आहेत. इन्क्वायरी पहिले पूर्ण करुन राज्य शासनाला अहवाल दिला जाईल. त्याच्यानंतर याच्यावर विचार केला जाईल.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय म्हणजे हा विषय मागे घेतला गेलेला आहे.

**गिता जैन :-**

प्रशासनाने मागे घेतलेला विषय तुम्ही परत घेऊ शकता का ते सांगा.

**धृवकिशोर पाटील :-**

हा विषय आपण केलेला आहे. मी ठराव मांडला होता. साहेबांनी मागे घेतलाच नाही.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब आपण समजून घ्या. सभागृहाने जरा शांतपणे ऐका. प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट केली की माझ्याकडे ह्या प्रकरणाची काही चौकशी आहेत. आयुक्त महोदयांनी सांगितल धृवकिशोर पाटील साहेबांना त्यांनी तसा व्हॉट्स अप दिला. इनामदार साहेबांनी गिता जैन मॅडमनी तो व्हॉट्स अप मागितला. परंतु हा विषय आपल्या विषय पटलावरती आहे. आणि जर ह्या विषयाला आपण ठराव जरी झाला तरी आयुक्त साहेबांना ह्या चौकशीचे आदेश मिळाले आहेत. त्याची चौकशी करतील असे त्यांनी सांगितले आहे. तुम्हाला हे सांगण्याचं खुलासा करण्याचे कारण असं की तुम्ही आता सचिव महोदयांकडे

बघून बोलत होतात की तो ठराव झाला नाही. परंतु सभाशास्त्राच्या काही नियमावली आहेत. आपल्याला माहिती आहेत.

**अनिल सावंत :-**

साहेब मला एक सांगा ही सभा चालवतो कोण? त्यांनी ठराव करुन नकाशे नाहीत म्हणून ठराव मागे घेतला आणि आता फोनाफोनी झाली. मग ही सभा चालवतो कोण?

**जुबेर इनामदार :-**

पुढचा विषय घ्या. असा महापौरांनी आदेश दिला. रेकॉर्डींग ऐका.

**मा. उपमहापौर :-**

मी स्पष्ट सांगतो आमच्या युतीतील.

**अनिल सावंत :-**

साहेब स्पष्ट सांगु नका ही सभा चालवतो कोण एवढं उत्तर द्या आम्हाला.

**मा. उपमहापौर :-**

सहका-यांना एक ठरावाबद्दल त्यांची चर्चा होती.

**जुबेर इनामदार :-**

असं होत नाही आयुक्तांनी निवेदन केल्यानंतर महापौर मॅडमने तो पुढचा विषय घ्या. सचिवांना तसे आदेश केले. सचिवांनी पुढचा विषय वाचला याचा अर्थ तोच झाला की तो विषय थांबला. तो रद्द करण्यात आला. परत दुबारा विषय आणायचा असेल तर पुढच्या सभागृहामध्ये रद्द करण्यात आला. आयुक्तांनी तशी मागणी केली. कमीत कमी तशी सूचना केलेली आहे. गोषवारा आयुक्तांचा आहे तसा असत नाही.

**निला सोंस :-**

महापौर महोदय मे कहना चाहूँगी की, फिर से विषय वापस आया हमारा प्रभाग का विषय है। जैसा की, मैंने कहाँ मंगलनगर, अपना शहर का विषय है। मंगल नगर हाटकेश क्षेत्र जो की बहुत ही नागरिक सुविधा से वंचित है। मुझे सबसे ज्यादा आश्चर्य यह लग रहा है की कमिशनरजी आपकी कार्यप्रणाली पर पुरा भरोसा है। न्याय मिलेगा जनता को लेकिन मैं कहना चाहूँगी की आश्चर्य यह लग रहा है की वही व्यक्ती वापस ठराव कर रहा है ऐसा मत परिर्वतन भले एक खाजगी आदमी एक रेस्टॉरन्ट के लिए एक ऐसा कौनसा फोन आ गया हम क्यों चेंज कर रहे है।

**धृवकिशोर पाटील :-**

इस विषय का जो आरक्षण करना है आपने ठराव बराबर सुना नही हमने पुरा किया की वहाँ पे बगिचा होना चाहिए। सदर आरक्षण क्र. ३५० बगीचा शासन धोरणाप्रमाणे समावेश आरक्षण तरतुदीनुसार विकसित करण्यास आम्ही मंजूरी दिलेली आहे. म्हणजे तिथे बगीचा होणार. तिथे शंभर टक्के बगीचा होणार.

**जुबेर इनामदार :-**

सभा शास्त्राप्रमाणे अशाप्रकारे करता येत नाही.

**निला सोंस :-**

वहाँ पर बगीचा है इट इज जस्ट पार्ट जो हमने जैसे की मैंने कहाँ कमिशनर ने भी उसे अवैध घोषित किया। कोर्ट में भी प्रलंबित है। और ऐसे कही विषय है आय मीन आरक्षण को होटल और उस पर सभागृह में निंदनीय शब्द खुद धृवकिशोर पाटीलजी ने भी कहाँ की हा यहा विषय नही आना चाहिए था और दुबारा इसमें ठराव कर रहे है। यह मुझे नही लगता इसका किसी कोई लॉजिक समज में आ रहा है क्यों हो रहा है।

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला कुठलाही विषय मागे पुढे क्रमांक करायचा असेल तर सभागृहाने तशी मागणी करवी. एकदा विषय झाल्यानंतर त्या विषयाला परत तुम्हाला आणता येत नाही. कुठलाही विषय असो तुमचा क चा प्रस्ताव सर्वात शेवटी होता.

**मा. महापौर :-**

अभी लिया है।

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, आपसे फीर से विनंती करती हूँ की ऐसा निर्णय ना ले यह शहर के हित में नही है।

**जुबेर इनामदार :-**

काय नविन पायंडा करता तुम्ही कुठलाही काहीही कराल......

**दौलत गजरे :-**

महापौर मॅडम त्याच्या बाजूला ३०५ गार्डन आहे आणि ते गार्डनची उद्या जर रेस्टॉरन्ट झालं. तर त्या गार्डनची पण अवस्था होईल आणि ते गार्डन पण खराब होईल त्यामुळे तिथे रेस्टॉरन्ट होऊ नये नगरपालिकेने त्याच्यावर कारवाई केलेली आहे. एकदा परत तो विषय पास करायचा हे योग्य नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला शासनाचे साहेब त्याच्यामध्ये नविन इनपूट आलेले आहेत. तुम्हाला परत विषय मांडायचा आहे तो मांडावाच लागेल. अशा परिस्थितीमध्ये अशा प्रकारचा ठराव तुम्ही कसा करु शकता आणि महापौर मॅडम सचिवांना तुम्ही पुढचा विषय घ्यायला सांगितलं होतं. याचा अर्थ तो विषय तिथे संपला. आयुक्तांच्या निवेदनानंतर तो विषय तिथल्या तिथे संपून गेला.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, आपसे निवेदन है सचिव महोदय भी यहाँ पर है आप इसे पुछ लिजीए की नियम के अनुसार अगर ऐसा हो सकता है की एक बार ठराव आपने पढ लिया और पढने के बाद फिरसे एक बार ठराव किया। मैं आपकी बात रख लेता हूँ। फिर जो भी महापौर मॅडम और आयुक्त की और सचिव महोदय बता दे और नियम के हिसाब से अगर ऐसा हो सकता है तो ठराव वापीस कर सकते है। ऐसा नियम के हिसाब से तो आप हमें सुचित किजीए हम करते है। अगर यह नियम से हिसाब से नही होता है। तो उसे ठराव वापीस पढने के लिए यहाँ तो उसे ठराव रखने के लिए नही होता है तो मैं महापौर मॅडम से अनुरोध करुंगा की विशेष सभा लगाई जाए और यह दोनो प्रस्ताव फिर से सभागृह के सामने लाया जाए।

**मा. उपमहापौर :-**

सभाशास्त्राप्रमाणे मी तेच सांगतो की सभा पटलावरती तो विषय आहे. तोपर्यंत आपण थोडे पुढे गेलो. सभाशास्त्र ह्या सर्व गोष्टींना मान्यता देत नाही. जर आता आमचे गटनेत्यांनी सूचना केलेली आहे की ह्या विषयाला आपण विशेष सभा लावावी. येणाऱ्या दोन दिवसात पाच दिवसात सात दिवसात लावावी.

**मा. आयुक्त :-**

दोन्ही कामकाजावर महापौरांनी रुलिंग दिलेले आहेत. खात्री करा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

रुलींग दिलेली नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपला सभा कामकाज सभाशास्त्राप्रमाणे चालते. आपण थोडे पुढे गेलो ही गोष्ट निश्चित आहे. परंतु सभागृहाचीच मान्यता नसेल तर नियम मोडून आपण असे कामकाज करु शकणार नाही. त्यासाठी मी अशी विनंती करते जर आमच्या गटनेत्यांनी प्रस्ताव ठेवला असेल आमगावकर साहेब, निलम ताई पुढचा विषय डावलण्याचा किंवा दमटवण्याचा नाही. आपण पुढच्या लगेच ताबडतोब दोन चार दिवसात मिटींग लावली तरी चालेल तुम्ही तारीख आज ठरवली तरी चालेल. त्या विषयांसाठी आपण विशेष सभा लावूया. परंतु किंवा आणखीन शहरातील २-३ महत्वाचे विषय असतील त्याच्यावरती करु. पण आज सभागृहाने आपण चुकीचा पायंडा पाडला तर आपल्याला वारंवार यांचे दुष्परिणाम भोगावे लागतील. आज आम्ही सशक्त आहोत आम्ही बोलतो उद्या तुम्ही सशक्त असाल उद्या तुम्ही बोलाल. तर तसे पर्याय करु नका शांतपणे घ्या. आपल्याला निश्चितपणे हे सभागृहाचे कामकाज नियम आणि कायद्याला अनुसरुन करायचा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम एका विषयाला रिलेटेड दुसरा विषय कशाला घ्यायचा. सचिव साहेब पहिला विषय झाला होता त्या विषयाला तुम्ही दुसऱ्या विषयाला तुम्ही रिलीफ दिला नव्हता. मग दुसरा विषय तुम्ही घेऊ शकता. तुम्ही तो असेल तर तो घ्यायचा तो असेल तर तो घ्यायचा याला काय अर्थ नाही ना असे थोड चालतं का. आयुक्त साहेब तो विषयाला रुलींग दिली नव्हती. सभागृहाची मान्यता नाही दिलेली.

**मा. आयुक्त :-**

ज खालचा प्रस्ताव झाला.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

साहेब विकास कुठे गेला. रस्त्याचा विषय होता तो रस्त्याचा विषय नाही म्हणून तो आणि तो घेतला तर तो पण घ्या. हे विषय झाल्यामुळे हा वादग्रस्त झाला विषय.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

दोन्ही विषयावर रुलिंग दिलेली आहे.

**निला सोंस :-**

महापौर महोदय कमिशनर महोदय हमारे प्रभाग का विषय है। मैं कहना चाहूँगी की सभागृह पब्लीक इन्ट्रेस्ट के लिए होता है। नॉट फॉर द प्रायव्हेट इन्ट्रेस्ट विषय महासभा एक हॉटेलवाले के लिए किए जा रही है। बच्चो का अधिकार गार्डन हम उसे छिन के आरक्षण चेंज कर रहे है। यह निंदनीय है। इस प्रस्ताव को भी हमने निंदनीय बोला है। विशेष महासभा पब्लीक इन्ट्रेस्ट के लिए होनी चाहिए। नॉट फॉर द इंडस्ट्रीयल इंट्रेस्ट दॅट सील.

**अनिल सावंत :-**

आमचा ठराव आहे कस काम मंजूर करता आम्हाला चर्चा करायची आहे. तो प्रस्ताव मागे घ्या. ५१ चा अगोदर घ्यायला पाहिजे होता. किती दिशाभूल कराल. तुम्हाला ५-५ मिनिटाला फोन येतील आणि ५-५ मिनिटाला तुम्ही निर्णय बदलत राहता. असा विषय होऊ शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम रस्त्याचा विषय तुम्ही त्या विषय का रिलेटेड करता मला कळत नाही. रस्त्याचा विषय आणि तुम्ही त्या पर्सनल विषय जोडता का तुम्ही ते जोडू नका ना तो असेल तस हा हे चुकीचं आहे ना.

**मा. महापौर :-**

पुढची विशेष महासभा घेऊ नंतर आपण करु आता सभा संपली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

कोल्हापूर, सांगली, सातारा व इत्यादी ठिकाणी पुरग्रस्तांमध्ये ज्यांचे दुःखद निधन झालेले आहे अशा हुतात्म्यांना शांती मिळो यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करुया.

**दुःखवठा ठराव क्र. ६० :-**

कोल्हापूर, सांगली, सातारा व इत्यादी ठिकाणी पुरग्रस्तांमध्ये ज्यांचे दुःखद निधन झालेले आहे अशा हुतात्म्यांना शांती मिळो यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करुन त्यांचा दुःखवठा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ संध्या. ०७.०० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका